कड्यावरची गढी

चांगल्या गोष्टी, चांगल्या कविता, चांगली गाणी सर्वांपर्यंत पोचावीत या हेतूनेच प्रस्तुत लघुकादंबरीचा उदय झाला. डॉफने ड्यु मॉरीयर यांच्या The House on the Strand या फारशा प्रसिद्ध नसलेल्या पण अत्यंत रसाळ कादंबरीचा हा स्वैर अनुवाद आहे.

मुळ तेराव्या शतकातील इंग्रजी वातावरणाचा मराठे-शाहीतील एका काळाशी संबध जोडताना मूळ कादंबरीतील कथानकात काही फेरफार करावे लागले.

अत्यंत गीचमीड अक्षराची फोड करून त्याची वाचता येईल अशी हस्तलिखित प्रत माझी मुलगी सौ. नंदीनी हीने करून दिली व माझी पत्नी सौ. शीला हीने वेळोवेळी सुचना दिल्या म्हणून या दोघींचाही मी आभारी आहे.

सौ. मंजुषा राउत यांनी कादंबरी पूर्ण वाचून व त्यातील चुका दुरुस्त करून दिल्या म्हणून मी त्यांचाही पण आभारी आहे.

औरंगाबादः परशुराम रामचंद्र गोखले.

१६.०४.०६.

## प्रकरण पहिले

मी फारशी अपेक्षा केली नव्हती. फार तर थोडीशी गुंगी  येईल किंवा थोडी जाणीव मंद होईल असे वाटले होते. पण घडले ते वेगळेच. सगळ्या वस्तु इतक्या प्रखर पणे जाणवतील असे मला वाटले नव्हते. सगळ्या वस्तु जणु काय अंगावर येऊन आदळत होत्या. प्रत्येक जाणीव तीव्र होती. सगळी ज्ञानेंद्रीये अधिक तीव्र झाली होती. सगळ्या गोष्टी खूप तीव्रतेने जाणवत होत्या फक्त स्पर्श नव्हता. मला जमीनीचा पण स्पर्श जाणवत नव्हता. खर तर माधवने मला याची कल्पना दिली होती. त्याची सुचना अगदी स्पष्ट होती. '' निर्जीव वस्तुचा स्पर्श तुला जाणवणार नाही. तु चालु शकतोस, उभा राहु शकतोस, बसु शकतोस. तुला काही जाणवणार नाही. न जाणवता करता येणारी ही हालचाल, ही तर नुसती सुरवात आहे. खरी मजा तर पुढेच आहे. घाबरु नकोस. मजा कर. '' मी हे सगळे थोतांड समजलो होतो. प्रयोगासाठी एक माध्यम म्हणून मला जाळ्यात पकडण्याची एक क्लुप्ती समजलो होतो. पण त्याचे बोलणे खरे ठरले होते.

मी पुढे जायला सुरवात केली. मी चालत नव्हतोच नुसता तरंगतच होतो. मी डोंगराच्या उतरणीवरून समोर जाण्यास सुरवात केली. थोड्यावेळापूर्वी भरून आलेले आकाश आता अगदी स्वच्छ होते. समुद्राला ओहटी पडली होती आणि रेती उघडी पडली होती. मघाशी किनाऱ्यावरल्या झोपड्या ठळकपणे दिसत होत्या पण आता सर्व काही पुसून गेले होते. घरांच्या रांगा, त्यांची धुरांडी, पुल, चर्चचे मनोरे सगळ काही नाहीस झाले होते. दिसत होते ते फक्त

हिरवेगार माळरान, जवळ वाटणारा डोंगर आणि किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटा. मी कड्याचे टोकाशी जाऊन पाहिले. खालून जाणारा रस्ता, कडेची खानावळ , कोपऱ्यावरच्या झोपडीतील हॉटेल, कशाचा, कशाचा पण पत्ता नव्हता. सगळे समुद्राच्या पाण्याने जणु काही व्यापले होते. मी डोंगर उतरून खाली येऊ लागलो. खाडी जवळ येऊ लागलो. मी रस्त्याच्या खुणा लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करून पाहिला पण सगळे व्यर्थ होते. डोंगर, दरी आणि समुद्र याशिवाय कशाचेच अस्तित्व जाणवत नव्हते.

माझ्या औषध घेण्याचे आधी उन्हाळ्याचे शेवटचे दिवस होते. आकाशात ढग जमा व्हावयाला लागले होते. पण आता मात्र माझ्या भोवती हिवाळ्यातली सुखद दुपार होती. पश्चिमेला सूर्य उतरणीला लागला होता आणि थोड्याच वेळात अंधार पडला असता.

खोल श्वास घेऊन मी थंड हवेने छाती भरून घेतली. नुसत्या श्वासोश्वास करण्यातली मजा  इतकी सुंदर असते याची मी कल्पनाच केली नव्हती. एक प्रकाराची न अनुभवलेली जादुच होती. मनावर नियंत्रण ठेवणे शक्य नव्हते. सगळे काही एकदम लाटेसारखे आपटत होते.

मी आता आपल्याच तंद्रीत किती वेळ उभा राहिलो असतो कोण जाणे. मी सहज मान वळवली आणि तो माझ्या नजरेस पडला. घोड्यांच्या टापांचा  आवाज मी ऐकला नव्हता. कदाचित तो माझ्यासारखाच तरंगत आला असावा. पण जेंव्हा तो पुळणीवरून येऊ लागला तेंव्हा टापाखाली चुरडल्या जाणारा रेतीचा आवाज येऊ लागला.

घोडेस्वार माझ्या रोखाने येत होता. मी चटकन मागे सरकलो. किनाऱ्याशी त्याने घोडा थांबवला आणि भरतीचा अंदाज घेतला. आता प्रथमच मला भीतीची जाणीव झाली. कारण समोरचा घोडेस्वार म्हणजे एक खरी गोष्ट होती. टापाखाली चुरडण्याची मला भीती वाटत नव्हती. पण आमच्या दोघांतील शेकडो वर्षांची दरी एकदम मिटणार होती. घोडेस्वाराने सरळ माझ्याकडे रोखून पाहिले. त्याने मला नक्कीच ओळखले होते. हसत हसत त्याने घोड्याला टाच मारली आणि खाडी ओलांडून तो पलिकडे गेला.

तो मला पाहणे शक्यच नव्हते. तो भूतकाळात होता आणि मी वर्तमान काळात होतो. मग नजरेतील ती ओळखीची चमक का? खाडी ओलांडून जातांना तो मागे वळून कां पहात होता? हिम्मत असेल तर ये माझ्या पाठोपाठ असे एक प्रकारचे आव्हानच होते ते. खाडीतील पाण्याचा मी अंदाज घेतला. घोड्याच्या घोट्यापर्यंत होते ते. कपडे भिजण्याची तमा न बाळगता मी पाण्यात शिरलो. पलीकडच्या तीरावर पोचल्यावर मला कळले मी माझे कपडे मुळीच ओले झाले नव्हते. पाण्याचा स्पर्श पण मला जाणवला नव्हता.सकाळी मी ज्या नागमोडी वाटेने आलो होतो त्याच वाटेने घोडेस्वार जात होता. तो डोंगर चढत होता. साम्य येवढेच होते. माझ्या काळातील रस्त्याच्या दोन्ही बाजुने असलेली झाडी आता इथे नव्हती. दोन्हीकडे नांगरलेली शेती पसरली होती. आणि मधूनच एखादे माळरान दिसत होते. थोड्याच वेळाने नांगरणी करणारा एक शेतकरी दिसला. त्याने हात उंचाऊन घोडेस्वाराला नमस्कार केला. मी आता घोडेस्वाराच्या अगदी जवळ पोचलो होतो. घोड्याचा घामाचा वास, त्याची कातरलेली आयाळ, घोडेस्वाराची तंग सुरवार, टोकदार चढाव आणि रेखीव चेहरा व

मानेवर  लोंबणारे दाट काळे केस हे वास्तव होते आणि मी परका होतो.थोडासा हात लांब करून घोड्याची पाठ थोपटण्याची मला इच्छा झाली पण माधवची ताकीद आठवली. '' भूतकाळातील कोणी व्यक्ती भेटली तर कृपाकरून स्पर्श करू नकोस. निर्जीव वस्तूना स्पर्श केलास तर चालेल पण सजीव वस्तूना स्पर्श करु नकोस. इतका जोरदार झटका बसतो की सहन होत नाही. मला अनुभव आहे.''

घोडेस्वार समोर जात होता मी पाठोपाठ होतोच. रस्ता माळरानावरून खेड्याकडे वळला. वस्ती जाणवु लागली. ओचापदर खोचलेल्या, डोक्यावरून पदर घेतलेल्या बायका भिंतीशी उभ्या होत्या. घोड्याचे येण्याने गडबड उडाली. कुत्री भुंकु लागली आणि बायकांचा कलकलाट सुरु झाला.

घोडेस्वार डावीकडे वळला आणि एका तटबंदी वाड्यासमोर उतरला. जमीनीत रोवलेल्या एका खांबावर लागाम फेकून तो उंच देवडीतून आत गेला. दरवाज्यावर गणपतीची मूर्ती होती . मी नकळतच हात जोडले. तेवढ्यात लांबवर घंटानाद झाला. ही गढी म्हाणजे एक मठ होता. समोरच्या पटांगणात दोन पोरगेलेसे सन्यासी एका लहान सन्याशाला सतावत होते. त्यांचा खेळ पहात घोडेस्वार क्षणभर थांबला आणि दार ठोठावून परवानगीची वाट न पहाता आत शिरला. आतली खोली अस्ताव्यस्त होती. कोपऱ्यात एक खाट होती. खूपसे सामान त्यावर रचून ठेवले होते.

'' प्रणाम महाराज''  घोडेस्वार म्हणाला.

कोपऱ्यातल्या अंधारातून एक माणूस उठून बसता झाला. तो एक वयस्कर, गोबऱ्या गालाचा महंत होता. '' मला उठवावयाचे नाही अशा मी सुचना दिल्या होत्या.'' रागाने महंत म्हणाला. महंताने अंगावरचे पांघरूण अजून आवळून घेतले. '' मला विश्रांती हवी. मिळेल तेवढी विश्राती मी घेतली पाहिजे तरच मुख्य महंतांचे स्वागत करण्यास मला बळ येईल. '' मुख्य महंत येणार आहेत हे माहित आहे ना तुला?'' महंत म्हणाला.

'' नेहमीच अशा वावड्या उठत असतात''

'' ही वावडी नाही. सरदार जानकोजींनी स्वतः निरोप पाठवला आहे. मोठ्या महंतानी कळवण गाव सोडले आहे आणि सोमवारी रात्री मुक्कामाला ते इथे असतील. ''

'' मोठे महंत अगदी योग्य वेळीच येत आहेत म्हणावयाचे. जेवणाचा नामी बेत असेल. नंतर पोटावर हात फिरवत सुखात निद्रासुख घेतील. त्यात काळजी करण्यासाखे काय आहे '' घोडेस्वार म्हणाला.

'' काळजी करायचे काही कारण नाही असे कसे म्हणतोस? अरे या सगळ्या टग्यांना काबूत ठेवणे म्हणजे एक कसरत आहे. आणि मोठे महंत तर माझी इथून उचलबांगडी करावयाला एका पायावर तयार आहेत.''

'' टग्यांना तुम्ही बक्षीसाचे अमिष दाखवले की ते नीट वागतील. काही करून तुम्ही सरदार जानकोजीरावांची मर्जी संभाळली पाहिजे. '' घोडेस्वार म्हणाला.

'' जानोजीरावांना फसवणे सोपे नाही. '' महंत म्हणाला. '' ते आमचे यजमान आहेत पण म्हणून माझी बाजु घेतीलच अशी खात्री बाळगता येत नाही.''

''सुभेदार हैबतराव सुभ्याचे मुख्य आहेत.त्यांचा अधिकार जानकोजी रावांपेक्षा मोठा आहे. ते तुमचा अपमान होऊ देणार नाहीत''  घोडेस्वार म्हणाला '' माझी खात्री आहे ते यावेळी मंदिरात गुडघे टेकून करूणा भाकीत असतील ''.

थोड्याशा रागाने महंत म्हणाला '' सुभेदारांचा असा अपमान करणे बरोबर नाही. त्याच्या लाडक्या हुजऱ्याला तर ते मुळीच शोभत नाही. सुभेदार हैबतराव खूप धार्मिक आहेत हे लक्षात असु दे ''

घोडेस्वार हसून म्हणाला '' महंत ! म्हणणे सोपे आहे पण वागणे कठीण असते. असो, या वायफळ गप्पा करण्यात काय हशील आहे. मी एका महत्वाच्या कामाकरिता आलो होतो. चंद्रराव मोऱ्यांचे गलबत कळवणला नांगरून पडले आहे. भरतीची वाट पहात. ते एक दोन दिवस तेथे राहील . काही खलिता वगैरे द्यावयाचा असेल तर द्या. ''

महंत गडबडीने पांघरूण बाजूला सारीत म्हणाला '' मग हे आधिच नाही का सांगावयाचे? तो जवळच्या मेजावरचे कागद उसकटु लागला. गुढग्यापर्यंत पोचणाऱ्या त्याच्या कफनीतून त्याचे बेढब पाय, फताडी बोटे मोठी चमत्कारिक दिसत होती. महंत चिडून म्हणाला '' हा ज्योतीबा वेळेला कधीच हजर नसतो.'' महंताने जोरात टाळी वाजवली. त्याची गडबड पहात घोडेस्वार हसत उभा राहिला. टाळीचा आवाज ऐकून एक तरूण सन्यासी दार उघडून आत आला. कदाचित तो दाराला कान लाऊन ऐकतच असावा. '' आज्ञा महाराज'' सन्याशी म्हणाला आणि दाराकडे जात असलेल्या घोडेस्वाराला एक इशारा केला. ''

शुंभासारखा उभा राहु नकोस.चटकन कागद आणि लिहण्याचे साहित्य घेऊन ये.खलीता पाठवावयाचा आहे.'' महंत ओरडला.

सन्यासी लिहीण्याचे साहित्य आणावयास  घोडेस्वाराजवळून जातांना पुटपुटला '' रात्री मी खलिता घेऊन येतो आणि या बाप्याला पण तयार करतो ''

घोडेस्वाराने खोट्या गांभिर्याने महंताला नमस्कार केला '' येतो मी आता. मोठ्या महंताच्या येण्याने तुमची विश्रांती खराब करून घेऊ नका. ''

'' बर आहे रावजी. नीट संभाळून जा '' महंत म्हणाला.

आम्ही महंताच्या खोलीतून बाहेर आलो.सरळ बाहेर न जाता रावजीने एक दार उघडून डोकावून पाहिले. आतमध्ये काही संन्याशी देवासमोर ध्यानस्थ बसले होते. एक दोन जण तर चक्क झोपले होते. एका तेजस्वी रुबाबदार ध्यानस्थ बसलेल्या व्यक्तीने माझे लक्ष वेधून घेतले. सुभेदार हैबतराव असावेत ते.   रावजीने दार ओढून घेतले. तो गढीचे बाहेर पडला. माळरान आता रिकामे होते. मघाच्या बायका वगैरे आता कोणीही नव्हते. आमचा प्रवास कालातीत होता. स्पर्शाची मला जाणीव नव्हती. मी अगदी सहज पणे तरंगत रावजीचे मागे जात होतो. आम्ही डोगराचे उतरणीला लागलो. मी सध्या राहत असलेल्या घराकडेच आम्ही जात होतो. सुटीकरिता माधवने मला वापरावयाला दिलेले घर झाडीचे पलिकडेच होते. थोड्यावेळाने आम्ही एका झोपडीजवळ पोचलो.अंगणात गुरेढोरे बांधली होती. टापांचा आवाज ऐकताच एक तरूण पोरगा बाहेर आला. रावजीने लगाम त्याचे हाती दिला आणि तो आत वळला. झोपडी लहान  असली तरी आंत एक स्वयंपाकघर आणि माळवद पण होते.

चुलीपाशी एक पोरगेलेशी बाई स्वयंपाक करीत होती. रावजी सरळ शिडीवरून माळवदावर गेला. मी पण माळवदावर गेलो. अचानक तो माझ्याकडे वळला. माझ्याकडे टक लाऊन पाहु लागला. त्याचा श्वासोश्वास माझ्या चेहऱ्यावर जाणवत होता इतका तो जवळ होता. तो मला काही करणार या भावनेने मी त्याला दूर ढकलण्याकरिता एक ठोसा मारला.माझ्या हाताला वेदना होऊ लागल्या. बोटांतून रक्त वाहु लागले आणि काचा फुटल्याचा आवाज आला.

ते माळवद वगैरे आता तेथे काहीच नव्हते. मी ठोशाने कळवणमधल्या माधवच्या जुन्या स्वयंपाकघरातील खिडकीची काच फोडली होती. काचा लागून माझा हात रक्तबंबाळ झाला होता. माझ्या पोटात मळमळत होते. मला तोल सावरत नव्हता. सर्व अंग थरथरत होते आणि वर टेलिफोनची घंटा वाजत होती.

## प्रकरण दुसरे

मळमळ थांबण्यास कमीतकमी १० मिनीटे लागली. स्वयंपाकघरात लाकडाच्या ढीगावर मी बसलो होतो. आलेला थकवा विलक्षण होता. गरगरल्यासारखे होत होते. उभे राहण्याची हिम्मत नव्हती. हात बराच कापला होता आणि खाली अंगणात फुटलेल्या काचा पडल्या होत्या. माळरानावर मला वेड्यासारखे हिंडतांना पाहून लोक काय म्हणाले असतील? मी नक्कीच माळरानावर होतो. बरबटलेले बुट, फाटलेली ओली विजार आणि दरदरून आलेला घाम ही त्याची साक्ष होती.

थोड्या वेळात मला बरे वाटु लागले. न्हाणीघरात जाऊन मी आरशात पाहिले.चेहरा किंचित थकलेला दिसत होता बस इतकच. कडक कॉफी घेतली की बरे वाटेल म्हणून मी स्वयंपाकघरात जाऊन कडक कॉफी बनवली आणि दिवाणखान्यात येऊन पुनःविचार करीत बसलो तोच टेलीफोनची घंटा पुनः वाजली. एका खुर्चीत स्वतःला झोकून दिले आणि फोन कानाला लावला.

फोन माधवचाच होता. '' गेल्या तासभर मी तुला सारखा फोन करित होतो. होतास कुठे तू ? साडेतीन वाजता तू फोन करावयाचे ठरवले होतेस ना? '' माधव रागावून विचारत होता.

'' फोन करावयाचे मी विसरलो नव्हतो.जरा दुसऱ्या कामात गुंतलो होतो.'' माधवला जरा ताटकळत ठेवणे मला आवडले असते. पण फार ताणण्यात अर्थ नव्हता. '' हो मी तू दिलेले औषध घेतले. परिणाम खूपच होतो.  मला वाटते मी ३००-४०० वर्षे मागे गेलो होतो. पण रावजीला दूर करायला गेलो आणि असा झटका बसला की बस. खुप थकवा आला आहे. डोक पण जड झाले आहे. '' सगळा वृतांत त्याला सांगत मी म्हणालो.

'' अरे डोक दुखणे वगैरे फार शुल्लक बाब आहे. पण मजा आली की नाही? '' माझ्या तक्रारी कडे दुर्लक्ष करत माधव म्हणाला.

माधव समोर असता तर मी खूप जोरात भांडलो असतो पण तो ३०० मैल दूर होता आणि मला पण या प्रकारात गोडी निर्माण झाली होती. स्वतःला नकळत मी माधवला सर्व हकीकत पुनः पुनः रंगवून सांगु लागलो. इतकच नव्हे तर  तळघरातील त्याची प्रयोग शाळा, तिथे असलेले काचेच्या बरण्यातले माकडाचे डोके, इतर प्राण्यांचे अवयव हे देखील कसे आवडले हे मोठ्या उत्साहात सांगु लागलो. '' तू सांगितल्या प्रमाणे बाटल्या अगदी चटकन सापडल्या. लेबले पण बरोबर होती. ABC. तुझ्या सुचने प्रमाणे A लेबल असलेल्या बाटलीतील तीन डोस घेतले आणि परिणामाची वाट पाहु लागलो. थोड्यावेळ काहीच झाले नाही. मग मी बगीच्यात गेलो. पण काहीही परिणाम नाही. मग जरा भटकून यावे म्हणून डोंगराकडे निघालो''

''मूर्खा! मी तुला घरातच थांबावयला बजावले होते ना? काही भलते सलते झाले असते तर? '' माधव रागावून म्हणाला.

'' बरोबर आहे. अरे पण औषधाचा काहीच परिणाम होत नव्हता. मला वाटले तू माझी नुसती गंमत केली असशील म्हणून मी बाहेर पडलो. असो, पण नंतर काय रामायण घडले ते मी तुला सांगितलेच आहे.'' गुळमुळीत स्वरात मी सांगितले. फोनवर दुसऱ्या बाजूने काहीच आवाज येत नव्हता. '' अरे तू फोनवर आहेस ना? '' मी घाबरून विचारले

फोनवरून गंभीर स्वरात माधव बोलु लागला '' उत्तम फारच छान. म्हणजे मी शोधून काढलेले नवीन औषध खरेच माणसाला भूतकाळात घेऊन जाते तर. आणि नुसते भूतकाळात नेत नाही तर त्या काळातील घटनांशी, व्यक्तींशी संबंध पण जोडता येतो. आणि या प्रयोगात आपले आपल्यावर पूर्ण नियंत्रण असते. फक्त काही पथ्ये पाळावी लागतात. ती तू पाळली नाहीस म्हणून थोडा त्रास झाला. तुला सांगीतले होते ना? सजीव वस्तुला हात लावायचा नाही. पण तू ऐकले नाहीस. असो. एकंदरीत मजा आली ना? आता दुसरा प्रयत्न कधी करणार? ''

'' हे बघ माधव !दुसरा प्रयत्न करण्याचा मी विचारच करु शकत नाही. पहिल्याच वेळी इतके रामायण घडले आता दुसरा प्रयत्न करण्याची आपली काही हिम्मत नाही बुवा'' मी कोरडे पणाने सांगीतले.

'' ठीक आहे. पाहु काय होते ते? '' माधव मिश्कीलपणे म्हणाला. त्याला माझा स्वभाव पूर्णपणे माहीत होता. एकदा एखादी गोष्ट करावयाला मी सुरवात केली की त्याचा शेवट काय होतो हे जाणण्याची माझी उत्सुकता त्याला पूर्णपणे माहीत होती. आणि म्हणुनच त्याने मला पटवण्याचा काहीच प्रयत्न केला नाही.

" तू  स्वतःवर प्रयोग केला होतास का?'' मी विचारले.

'' अर्थात. मी स्वतःवरच प्रथम प्रयोग केला. पण मला जो अनुभव आला तो माझ्यापुरताच आहे की काय हे मला जाणून घ्यावयाचे होते. म्हणून तुझी निवड केली. तुझ्यासारखा खरा प्रयोगशील कोण मिळणार?''

'' म्हणजे ! मला जे दिसले ते तुला पण दिसले? ''

'' हो.मी साधरणतः १६,१७ शतकात जाऊन पोहोचलो होतो. व्यक्तिंच्या पोषाखावरून तसा अंदाज बाळगता येतो. तुझा रावजी, महंत मला पण भेटले होते. पूर्वीच्या काळी असलेल्या तळासरीतील मठाशी याचा संबध पोहोचतो. महत्वाची गोष्ट म्हणजे या औषधाने स्मरण शक्तिवर काही परिणाम होतो का? एका विशिष्ट काळापर्यंतच का आपण मागे जातो? एक दिवस, एक वर्ष, १००० वर्ष का मागे जात नाही? मला वाटते औषध घेणाऱ्याच्या मेंदुवर कोरलेल्या पहिल्या घटनांचा याच्याशी काही संबध असावा, किंवा मागील जन्मातील घटनांचा काही संबंध असावा. आपण दोघांनी एकच घोडेस्वार पाहिला. त्याचे मागोमाग जाण्याची दोघांनाही तीव्र इच्छा झाली. असे का? हे मला शोधून काढावयाचे आहे. आणि या करिता फक्त तुच योग्य आहेस. मी बरेच वेळा माझ्यावर हा प्रयोग केला आहे आणि प्रत्येक वेळी रावजी हजर असतोच. बघ पुढच्या वेळी तुला रावजी भेटतो की नाही? मला तुझ्यासारखा त्रास झाला नाही. कारण मी एकतर घरीच थांबलो होतो. आणि कशाला हात पण लावला नाही. तू माझं ऐक,  खरी गंमत पुढेच आहे'' जोराने हसत माधवने फोन बंद केला.

मी स्वतःवर पुन्हा प्रयोग करून घ्यावयाला तयार होईन याची माधवला खात्री होती आणि मला त्याचे काही आश्चर्य वाटले नाही. आमच्या बऱ्याच वर्षाच्या मैत्रीत हे ठरूनच गेले होते. त्याने सांगावयाचे आणि मी करावयाचे. आमच्या शालेय जीवनात कितीतरी चमत्कारिक प्रयोग आम्ही दोघांनी केले असतील देव जाणे! मी शिक्षण संपल्यावर प्रकाशनाकडे वळलो आणि तो प्रख्यात जीव-भौतिक शास्त्रज्ञ झाला.

तीन वर्षापूर्वी माझे वीणाशी लग्न झाले मी संसारात गुंतलो आणि आमचे संबध थोडे दुरावले पण  या वेळी मी माझी सुट्टी त्याच्या कळवणच्या घरी घालवावी असा माधवचा अचानक फोन आला तेव्हा मला थोडे आश्चर्यच वाटले. पण मी माधवला चांगला ओळखत होतो. यात काहीतरी गडबड आहे हे मी सहज ओळखले. आणि मग त्याने हा प्रयोग करावयाचा प्रस्ताव समोर ठेवला. मी ताबडतोब तयार झालो. एकतर मी माझा प्रकाशन व्यवसाय बंद करून वीणाच्या भावाच्या धंद्यात सहभागी होण्याच्या विचारात होतो आणि हाताशी काहीच काम नव्हते. मी पूर्वीपण कळवणला गेलो होतो आणि माधवच्या घरी राहिलो होतो. फार सुंदर घर होते ते. आजुबाजुचा परिसर पण सुंदर होता. वीणाला आणि मुलांना कोकणात सुटी घालवायला खूप आवडेल. पण मुलांच्या परीक्षा संपावयाला थोडा वेळ होता आणि मला पण प्रयोग करावयाला एकटेपणा हवा होता. म्हणून मी आधी जाऊन घर साफसुफ करून घ्यावे आणि वीणा व मुलांनी नंतर यावे असे ठरले . त्याप्रमाणे अस्मादिकांची स्वारी प्रयोगाकरिता गिनी पिग म्हणून हजर झाली होती.

मी पुनः माधवला फोन लावला '' हे बघ माधव आज मी या प्रयोगाला तयार झालो कारण मी एकटा होतो पण आता वीणा आणि मुले येतील तेंव्हा मला प्रयोग करणे जमेल असे वाटत नाही. ''

'' केव्हा येत आहेत मंडळी? ''

'' मुलांच्या परीक्षा सुरु आहेत. या आठवड्यात संपतील की लागलीच येतील''

'' अरे मग खूप वेळ आहे. तेवढ्या वेळात प्रयोग पूर्ण होईल. उद्या पुनः मी याच वेळी फोन करीन तेंव्हा सांग काय घडले ते '' आणि माधवने फोन बंद केला. मी नुसताच फोन कानाला लाऊन बसलो होतो. त्याची माझ्याशी वागायची ही नेहमीची पद्धत होती. त्याने सांगायचे आणि मी ऐकायचे. मी म्हणजे खेळातले एक प्यादे होतो. या औषधाने इतर काय परिणाम होतील हे मला काहीच सांगीतले नव्हते. कदाचित मी वेडा होईन, पांगळा होईन हे काहीच माहीत नव्हते. ''मरो ते औषध आणि खड्ड्यात गेला तो प्रयोग '' असे बंद फोनमध्ये ओरडून मी फोन जोरात आपटला. भिजलेली , फाटलेली प्यॅंट बदलावी, शॉवर खाली मस्त आंघोळ करावी म्हणजे बरे वाटेल असा विचार करून मी त्या कामाला लागलो. एवढे मात्र खरे की माधवचे घर खरोखरच खूप सुंदर होते आणि सर्व सजावट पण खूप छान होती.

आंघोळ करून आरामात नोकराने दिलेल्या गरमगरम काफीचे घुटके घेताघेता मी माधव बरोबर घालवेल्या मागच्या संध्याकाळची आठवण काढु लागलो. प्रथम त्याने अगदी

सहज सुचवले होते की त्याचा कळवणचा बंगला रिकामा आहे. मुलांच्या सुटीत मी तो आरामात वापरु शकतो. मी दिल्लीला वीणाला फोन केला. मुंबई ,पुणे दिल्ली या सारख्या वातावरणात वावरलेल्या वीणाला कळवणचे खेडवळ वातावरण आवडणे शक्य नव्हते. कळवणला सिनेमे, क्लब, मंडळे वगैरे काही नव्हती. कोकणात पाऊस खूप असतो. खेड्यात चांगले जेवण पण बनवता येणार नव्हते. तीचे एक ना दोन मु-े मी खोडून काढले मग ती कशीबशी येण्यास राजी झाली. माझी धडपड मी माधवला सांगीतली तर तो माझी कीव केल्यासाखा हसून म्हणाला '' लग्न होऊन तीन वर्षे झाली. पुनः हे तुझे पहिले आणि तिचे दुसरे तरी इतका तिच्या कह्यात गेलास ना !''

माझ्या लग्नाचा काहीसा वादग्रस्त विषय मी सफाईने टाळला. वादग्रस्त होण्याचे कारण की वीणाला वाटत होत की मी दिल्लीला स्थिर व्हावे आणि मला पुण्याच्या सदाशिव पेठी वातावरणाची सवय होती. पण याचा माधवशी काही संबध नव्हता. माधवने नंतर कळवणच्या घरात नवीन केलेल्या सुधारणा सांगण्यास सुरवात केली. शेवटच्या भेटीत खऱ्या मूळ उ-ेशाची त्याने चांगली तयारी करून ठेवली आणि मी त्याच्या जाळ्यात बरोबर सापडलो.

'' एका संशोधनात मला अचानक यश मिळाल्यासारखे वाटते आहे. एका विशिष्ट वनस्पतीच्या अर्काने माणसाच्या स्मरणसंस्थेवर फार वेगळाच परिणाम होतो असे मला आढळून आले आहे. '' माधवच बोलण अगदी स्पष्ट होते. महत्वाची गोष्ट तो अगदी सहज पणे सांगतो.

'' मला वाटते मादक द्रव्याचा पण असाच परिणाम होतो. दारु घेतली की माणूस अगदी स्वर्गलोकात पण पोचतो नाही का?'' मी हेटाळणीच्या स्वरात म्हणालो.

'' औषध घेतल्यावर मी ज्या काळात गेलो तो भास नव्हता. ती वस्तुस्थिती होती. ती एक सत्य गोष्ट होती ''

'' कोणत्या काळात गेला होतास तु? कोणते जग होते ते? कोण कोण भेटले तुला तेथे? तुला तुझी पूर्वीची सगळी पापे भेटली का?''

'' हे बघ. मुर्खासारखे फालतु विनोद करु नकोस. माझा त्या काळाशी काही संबंध नव्हता. मी केवळ एक प्रेक्षक होतो तिथे. '' माधव ठामपणे म्हणाला. '' जाऊ दे, सर्व हकिकत सांगून तुझ्या अनुभवातील मजा मला घालवावयाची नाही''

'' माझ्या अनुभवातली मजा? म्हणजे मी पण ते तुझे औषध घेऊन स्वतःवर प्रयोग करू म्हणतोस? नाही बाबा. मला ते मुळीच जमावयाचे नाही. तुझे काय? तू एकटा सडा फटिंग  मला बायको,पोर आहेत. काही करता काही होऊन बसायचे. '' मी अगदी निक्षून सांगीतले.

'' हे बघ मी काही तुला आत्महत्या करावयला नाही लावत आहे. हा एक प्रयोग आहे. अगदी सेफ आहे. काही पण होणार नाही. आणि मी आहे ना!. आणि सध्या तुला काही काम नाही. वीणा दिल्लीला गेली आहे आणि मुले परिक्षेत गुंतली आहेत. चांगला एकटा सडाफटिंग आहेस. कळवणला जा. मस्त मजा कर आणि एक मजेदार अनुभव पण घे. ''

घाईघाईन मी माझी पुण्यातली कामे आवरली आणि शेवटी हो ना करत कळवणला येऊन दाखल झालो. कळवणचे घर खरच खूप छान होते. स्वयंपाकाला जवळच्या खेड्यातल्या कालिंदीबाई होत्या आणि वरच काम करावयाला सखाराम होता. सामान-सुमान सगळे चांगले भरून ठेवले होते. मला खूप आराम वाटला आणि औषधाचा एक प्रयोग पण केला.

## प्रकरण तिसरे

दुसऱ्या दिवशी उजाडल्यापासूनच पावसाची झड लागली होती. रात्री झोप छान झाली होती. अगदी फ्रेश वाटत होत. पण बाहेर पडणे शक्य नव्हते. सबंध दिवस घरात बसून वेळ कसा घालवायचा हेच कळत नव्हते. वीणाने पण याच वातावरणाची धास्ती घेतली होती आणि तिचे म्हणणे आता मला पण पटत होते.कालिंदीबाईची स्वयंपाकाची तयारी सुरु होती. न्याहारी झाली होती. दुपारी परत येउन त्या गरम गरम पोळ्या करून जेवायला वाढणार होत्या. पावसाब- ल संताप व्यक्त करून त्या पण निघून गेल्या. जाताजाता माधवची प्रयोग शाळा पाहण्याचे सुचवून गेल्या. प्रयोग शाळेत जाण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. पेपर वाचण्यात मी बराच वेळ घालवला. वेळ जात नव्हता आणि मन सारखे औषधाच्या प्रयोगाकडे वळत होते.माझ्या आणि माधवमध्ये काही मानसिक संज्ञा प्रवाह होता का? लहानपणी आम्ही टेलिपाथीचे बरेच प्रयोग करत असु. म्हणजे मला आलेला अनुभव आणि माधवला आलेला अनुभव एकच असण्याची ती पण एक शक्यता होती. औषधाच्या

परिणामाने आपल्या मेंदुतील काही जुन्या आठवणी जाग्या होतात का? पण कुठल्या आठवणी ? या जन्मातल्या की मागच्या जन्मातल्या? मग एका विशिष्ट जन्मातल्याच का? की रावजीच्या अस्तित्वाच्या काही खूणा अजून या घरात शिल्लक आहेत? लहानपणी याच घरात घालवलेले काही दिवस मी आठवु लागलो. काही कारण नसतांना मी एकदा माधवच्या आईला '' हे घर झपाटलेले आहे का हो?'' असे विचारून खूप बोलणी पण खाल्ली होती. घर तसे खूप जुने होते. चौदाव्या शतकात बांधलेली ती एक गढीच होती.  खालचे तळघर हीच काय ती एक जुन्या काळची वास्तु शिल्लक होती. बाकी सर्व घर बरेच नवीन करण्यात आले होते. तळघरात ती माधवची भयंकर प्रयोगशाळा होती. विचाराच्या तंद्रित मला डुलकी केंव्हा लागली ते कळलेच नाही. कालिंदीबाई जेवणाचे करून निघून गेल्या. मी पण दोन तीन पत्र खरडण्यात थोडा वेळ घालवला. जेवण उरकून घेतले. घरात कोणीच नव्हते, वेळ जात नव्हता, बाहेर पाऊस पडत होता आणि संपूर्ण दिवस जावयाचा होता. माधवचा अंदाज बरोबर होता. मी पुनः प्रयोग करावयाला तयार झालो होतो. पण मी या वेळी एक काळजी घेणार होतो. औषध घरात घेणार नव्हतो. माधवला मी औषध केंव्हा घेणार ते माहीत नव्हते. म्हणजे तो टेलीपाथीने माझ्या अनुभवावर परिणाम करु शकणार नव्हता. पुरातन अवशेषांचा पण परिणाम होणार नव्हता. मी माधवच्या प्रयोग शाळेत गेलो. एका रिकाम्या बाटलीत औषधाचे तीन डोस भरून घेतले. गॅरेज मधून गाडी बाहेर काढली. काल भूतकाळात जिथे रावजीची गाठ पडली होती त्या ठिकाणाचा अंदाज घेत मी निघालो. तळासरीला जाण्याचे रस्त्याने मी जात होतो. तळासरीच्या मंदिरासमोर मी गाडी उभी केली. गाडीतच बसून औषध

घ्यावे की बाहेर पडून याचा विचार करण्यात थोडा वेळ घालवला. पावसात मंदिरात कोणी येणार नव्हते. मी गाडीतून उतरलो. मंदिराच्या पायरीवर आडोशाला बसलो आणि एका दमात पूर्ण बाटली रिकामी केली. सगळीकडे कसे निवांत होते. किती वेळ मी असा बसून होतो माहीत नाही. कुठेतरी घड्याळात तीनचे ठोके पडले.माझे घड्याळ थोडे मागे होते ते मी बरोबर केले. इतक्यात लांबून वाद्यांचा आवाज आला.नसतीच कटकट निर्माण झाली होती. कोणाची तरी वरात मंदिराकडे येत होती. माझी गाडी भर रस्त्यात उभी होती. मला ती हलवावी लागणार होती. मी पायरीवरून उठून मंदिराच्या दरवाज्याकडे निघालो.  मी दरवाजाजवळ पोहोचलोच नाही. दरवाजाच तिथे नव्हता. मी मठीच्या एका झरोक्यातून डोकावुन पहात होतो. मठाच्या चौकाचे मोठे प्रवेश दार उघडे होते. माळरानावर बरेच लोक जमले होते. सुशोभित बंद घोडागाडीच्या चाकांचा आवाज येत होता. गाडीच्या खिडक्यांना किनखापी पडदे सोडले होते. कमानीवर जडावाचे काम केले होते. पडदे बाजूला सारून आतील भगवे वस्त्र घातलेल्या रुबाबदार माणसाने हात वर करून जमलेल्या लोकांना आर्शिवाद दिला. जयजयकाराचा घोष वाढला. रावजी व महंत ज्यांची वाट पहात होते तेच हे मोठे महंत असावेत. महंत गाडीतून उतरु लागले. एकदम सर्वत्र शांतता पसरली. सगळा समुदाय हात जोडून शांत उभा होता. प्रकाश तीव्र झाला होता. माझ्या सगळ्या गात्रातील संवेदना नष्ट झाली होती. औषधाच्या परिणामाची मला मुळीच भीती वाटत नव्हती. मी या वातावरणाशी पूर्ण एकरूप झालो होतो.

मोठे महंत गाडीतून खाली उतरले.महंत आणि इतर परिवार त्यांचे स्वागत करण्यासाठी समोर गेले. मंहत मठात शिरले. दरवाजा बंद झाला. मी मागे वळून पाहिले. एका सुशोभित तक्तपोशी असलेल्या दिवाणखान्यात मी उभा होतो. २५-३० लोक दिवाणखान्यात जमले होते. त्याच्या पोषाखावरून ते सुभ्यातले मानकरी असावेत.

'' माझे शब्द लक्षात ठेव. आज ती बया काही येत नाही. आणि आलीच तर काही जास्त नखरा करणार नाही'' कुणीतरी अगदी माझ्या कानात पुटपुटले.

माझा घोडेस्वार माझ्या मागेच उभा होता. हे शब्द मला उ`ेशून नव्हते तर त्याच्या जवळच उभ्या असलेल्या दुसऱ्या तरुणाकरिता होते. त्याने हसु लपवण्याकरिता तोंड पटक्याने झाकून घेतले.

'' नखरा करो वा न करो पण जानकोजीराव असे नामी पाखरु थोडेच हातचे जाऊ देणार आहेत? अशी नामी संधी पुनः लवकर थोडीच येणार आहे? वाघजईच्या जत्रेची धमाल आहे, खाशी मंडळी लांब बोरगावला आहेत '' तो तरूण म्हणाला.

'' तू म्हणतोस ते बरोबरच आहे म्हणा. पण हैबतराव कुठे गेले तरच ते जमणे शक्य आहे. मोठे महंत इथे असतांना हैबतरावांचा डोळ्याला डोळा लागणे शक्य नाही''

वदंता, अफवा, कुचाळक्या या सगळ्या काळातच असतात. हाही काळ त्याला अपवाद नव्हता. माझ्या काळात असे बोलणे कानावर पडले असते तर मी त्याकडे फारसे लक्ष दिले नसते. पण मी या काळात एक प्रेक्षक होतो. सर्व काही नीट ऐकण्याची व पाहण्याची

खूप इच्छा होती. मी मोठ्या उत्सुकतेंने त्या नखरेल बाईची वाट पाहू लागलो. दरवाजाशी चार पुरुष, तीन स्त्रिया आणि दोन मुले उभी होती. पेहरावावरून उच्च कुळातील दिसत होती. मोठ्या महंताचे खासगीतील दर्शनासाठी आली असावीत. स्त्रियांनी नाकापर्यंत पदर ओढले होते त्यामुळे नखरेल स्त्री कोण ते ओळखणे कठीण होते. पुरुषांपैकी सुभेदार हैबतराव चटकन ओळखू आले. मंदिरात ध्यानस्थ बसले तेच हे होते. पण उरलेल्या तिघांपैकी रंगेल जानकोजीराव कोण ते समजले नाही. रावजी आणि त्याच्या सोबत्यामधे अजून एकाची भर पडली. भटजी सारखा त्याचा पोषाख होता. तांबरलेल्या डोळ्यावरून नुकताचा शांभवीचा प्रसाद सेवन केलेला दिसत होता.

'' कोणी कुठे उभे राहावयाचे? सुभेदार साहेबांचा उपाध्याय म्हणून मी पण या मंडळीत सामील झाले पाहिजे नाही का? '' अडखळत भटजीबुवा म्हणाले.

रावजीने भटजीबुवांच तोंड आपल्याकडे वळवले आणि दटावून म्हणाला '' अशा अवस्थेत तुम्ही मोठ्या महंतासमोर आणि हैबतरावांसमोर गेला तर तुमचे उपाध्येपण जागेवर राहणार नाही. गुमाने त्या कोपऱ्यात जाऊन बसा.'' थोडसे कुरकुरतच भटजीबुवा कोपऱ्यात जाऊन बसले.

'' उत्तमराव बोरगावकर सरदारांनी आता कसे इकडे तोंड दाखवले? '' रावजीचा साथीदार म्हणाला '' मागच्या त्यांच्या पुंडाईनंतर मोठ्या महंताच्या दर्शनाला ते येतील असे वाटले नव्हते. ''

'' मोठ्या महंताना मठाची तपासणी करण्यात आणि राजकारणात काही रस नाही. त्याचे सगळ नीट चालले की बस.'' नीट वर जोर देत रावजी म्हणाला. '' आणि बोरगावकर सरदार आज इथे हैबतरावांचे भावकीतले म्हणून आले आहेत. हैबतरावांची मंडळी जानकीबाई या बोरगावकर सरदारांची बहीण आहेत. शिवाय जानकोजीरावांचा मान पण ठेवावयाला हवा ना ! ''

मोठे महंत आत आले.सर्वजण आदबशीर पणे उभे राहीले. महंतांनी सर्वांकडे हसून पाहिले. महंत समोर येऊन खाश्या स्वाऱ्यांना पेश करु लागले. '' कळवणचे सुभेदार हैबतराव. '' महंत पुटपुटले. हैबतराव समोर आले. '' आणि या आमच्या मंडळी. एक स्त्री समोर आली आणि वाकून पुनः तिनदा नमस्कार केला. मोठ्या महंतानी आर्शिवाद दिला. अच्छा ! म्हणजे आज नखरा न करणारी हीच ती स्त्री होती ती तर! नमस्कार करतांना डोक्यावरचा पदर थोडा खाली सरकला आणि मला तिचा रेखीव सुंदर चेहरा दिसला. खरोखरच सुंदर होती ती. आणि तिच्या डोळ्याच्या हालचाली वरूनच तिचा छंदीफंदीपणा स्पष्ट जाणवत होता. '' आमचे थोरले चिरंजीव विश्वासराव'' एका मोठ्या मुलाला समोर करित हैबतराव म्हणाले. विश्वासराव समोर आला. वाकून नमस्कार केला.'' सरदार बोरगावकरांची मंडळी म्हणजे आमची बहीण मंगला'' हेबतराव पुढे म्हणाले.

फार जवळच्या नात्यातील मंडळी होती ही. बोरगावकर सरदार आपल्याला एकदम आवडला. जानकीबाईंच्या वळणावरच होती स्वारी खानदानी पणा लपत नव्हता. मंगलाबाई मात्र जरा बुजरीच वाटली. बोरगावकर सरदरांनी मग आपल्या मुलाची, हिरोजीची ओळख

करून दिली. एव्हांना तीसरी व्यक्ती बरीच चुळबुळ करीत होती. मोठ्या महंतासमोरून बोरगावकर सरदार बाजूला होत नाहीत तोच ती व्यक्ती समोर आली. मोठ्या लगबगीने महंताने आदरपूर्वक ओळख करून दिली '' सरदार जानकोजीराव, आमचे यजमान. यांचे आश्रयानेच आमचा मठ चालतो. '' अच्छा ! तर हे आमचे गुलजार जानकोजीराव होते तर. चांगल्या गुलजार पुरुषाची मी अपेक्षा केली होती. पण त्याच्यामधे खास असे काहीच नव्हते. जानकीबाईची निवड फारच साधी होती.

'' महाराज आपल्या येण्याने आम्ही अत्यंत उपकृत झालो आहोत. आमची सेवा गोड मानून घ्यावी '' मोठ्या मानभावीपणाने जानकोजीराव म्हणाले. मोठ्या महंतांच्या शोधक नजरेने सगळे काही टिपले होते. जानकोजीरावांनी नंतर चौथ्या पुरुषाची व बाईची ओळख करून दिली. '' आमचे धाकटे बंधु कुडतोजीराव व त्यांची मंडळी इंदुमतीबाई'', कुडतोजीराव देखील भटजीबुवांच्या संगतीत बरेच काळ असावते असे वाटत होते. तेवढे सोडले तर कुडतोजीरावांची मुर्ती मोठी रुबाबदार होती. त्याच्या पाठोपाठ इंदुमतीबाईंनी वाकून तिनदा नमस्कार केला.

'' निवडच करावयाची झाली ना तर मी हीचीच निवड करीन'' रावजी माझ्या कानाशी पुटपुटला .पण मला नाही. माझ्या विचारांना चालना देण्याचे त्याचे सामर्थ्य मात्र अजब होते. त्याची निवड खरोखरच अप्रतिम होती. मला वाटते तिला पण रावजीच्या नजरेची जाणीव झाली असावी कारण नमस्कार करून मान वर करतांना तिने आमच्या दिशेने रोखून पाहिले. इतर स्त्रियांचे मानाने ती बरीच लहान होती. फार तर १६,१७ वर्षाची

असावी. पण इतका सुंदर आणि तीतकाच म्लान चेहरा मी पाहीला नाही. प्रत्येक माणसाचे आयुष्यात असा एखादा चेहरा पक्का रुजला असतो. योगायोगाने त्या चेहऱ्याचे मालकाची गाठ पडली की अभिलाषा निर्माण होते. पण माझ्या बाबतीत हे घडणे शक्य नव्हते. मी काही शतकापूर्वीच्या चेहऱ्याकडे पहात होतो. त्या चेहऱ्याची मालकीण मला कधीच भेटणार नव्हती...

'' कुडतोजीरावांबरोबर किती दिवस ही नीट संसार करते याचा संशयच आहे मला'' रावजी पुटपुटला. मी जर रावजीच्या जागी असतो तर मला पण असेच वाटले असते.मी हैबतरावांची नोकरी सोडली असती आणि कुडतोजीरावांकडे हजर झालो असतो.

'' अजून मुलबाळ दिसत नाही? '' रावजीचा सोबती म्हणाला.

'' तीन सावत्र मुले आणि दोन सख्ख्या मुली आहेत. ''

'' वाटत नाही ना? . पण एक मी तुला नक्की सांगतो बोरगावरकर सरदरांची हिच्यावर नजर आहे. जो पर्यंत तो जानकोजीरावांचा मिंधा आहे तो पर्यंत तो काही हालचाल करणार नाही.''

''पाच होनाची पैज. ती त्याच्याकडे ढुंकुनसुद्धा पाहणार नाही '' सोबती म्हणाला

'' लागली. आणि पैज जिंकली तर त्यांचा मध्यस्थ म्हणून जरूर काम करीन. तसा मला बराच अनुभव आहे.''

खासगी दर्शन संपले होते. सायंप्रार्थनेची वेळ झाली होती. रावजी, त्याचा सोबती व मी यांना प्रार्थनेत काहीच गम्य नव्हते. त्या दोघांचे पाठोपाठ मीपण बाहेर पडलो. बाहेर

जत्रा गच्च भरली होती. सगळीकडे नुसता गडबड गोंधळ होता. थोडावेळ जत्रेतून फिरून आम्ही पुनः मठाजवळ आलो. प्रार्थना संपली होती. मोठे महंत विश्रांतीसाठी वर गेले होते. खाशा स्वाऱ्या निघण्याचे तयारीत होत्या. समोरच सरदार जानकोजीराव उभे होते. त्याचे बाजूस जानकीबाई होत्या. ''उद्या सकाळी मोकळ्या आहात का बाईसाहेब ?'' जानकोजीराव त्यांचे कानात पुटपुटले.

'' बहुतेक जमेल. मी निरोप धाडते.''

जानकोजीरावांनी वाकून मुजरा केला आणि नोकराने आणलेल्या घोड्यावर बसून टाच मारून वेगात निघून गेले.

'' कुडतोजीराव आणि त्यांची मंडळी आज मुक्कामाला आहेत. रावजीकडे वळून जानकीबाई म्हणाल्या. '' ते लोक जितक्या लवकर जातील तितके बरे'' जमीनीवर पायाचा ठेका देत ती बराच वेळ जानकोजीरावांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात होती. रावजी मठात शिरला. आतून बोलण्याचे आवाज येत होते. एका सन्याशाला विचारता कुडतोजीराव आत फराळ करित आहेत आणि  बाईसाहेब खाली मंदिरात आहेत असे समजले.

रावजी थोडावेळ थांबला. मग गाभाऱ्याकडे वळला. गाभाऱ्यातील समई मंद झाली होती. आत अंधार होता. दोन व्यक्ती एकमेकांना खेटून उभ्या होत्या. निरखून पाहता त्या दोन व्यक्ती म्हणजे बोरगावकर सरदार आणि इंदुमतीबाई होत्या. चेहऱ्याची म्लानता पार गेली होती. एकदम वर मान करून ती बोरगावकर सरदारांकडे पाहून गोड हसली. रावजीने माझ्या खांद्यावर थोपटले.

'' आपल्याला नीट दिसत नाही. दिवा लावु का? '' पण आवाज रावजीचा नव्हता तो केव्हांच लुप्त झाला होता. मी मंदिराच्या दक्षिणेकडील दरवाजाशी उभा होतो. पागोटे आणि बंडी घातलेला एक माणूस माझे जवळ उभा होता. ''मी या मंदिराचा पुजारी आहे. मी मगापासून तुम्हाला आवारात फिरतांना पाहत आहे. चला तुम्हाला मंदिर दाखवतो. फार जुने मंदिर आहे हे. '' पुजारी म्हणाला. त्याने बटण दाबून दिवा लावला. मी घड्याळात पाहीले. साडेतीन वाजले होते. मला चक्कर येत नव्हती व मळमळत पण नव्हते.

## प्रकरण चौथे

काल बदलाचा काहीच परिणाम जाणवत नव्हता. मी वर्तमान काळातून भूतकाळात अगदी सहज गेलो होतो आणि भूतकाळातून वर्तमान काळात अगदी सहज आलो होतो. कोणताही शारीरिक, मानसिक परिणाम जाणवत नव्हता. फक्त एकच अडचण होती. भूतकाळातून वर्तमान काळात आल्यानंतर वास्तविक गोष्टींची सुसंगती लावणे कठीण जात होते. थोडेस गोंधळल्यासारखे होत होते. माझा हा वैचारिक गोंधळ माझ्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत असावा पण त्याची दखल न घेण्याइतका पुजारी सुसस्कृंत होता. धीर करून मी म्हणालो,'' खर तर मंदिर बघण्याची मला फारशी उत्सुकता नव्हती. पण मला असे सांगण्यात आले की फार पूर्वी इथे एक मठ होता. त्याच्या काही खाणाखुणा दिसतात का ते मी पहात होतो.

'' मठा ब- ल म्हणता होय !. त्याला खूप वर्षे झाली. आता त्याच्या खुणा पण सापडणार नाहीत. काही लोक म्हणतात की डौंगराच्या पायथ्याशी जी आमराई दिसते ना, तिथे मठ होता. काही सांगतात की मंदिराच्या जागी मठ होता.''

'' खूप बदल झाला आहे नाही ?''

'' बदल! हो गेल्या शतकात मंदिराची पूर्ण नवीन उभारणी केली हे खरे  पण तुमच्या लक्षात कसे आले ते मात्र समजत नाही''

विषय बदलून मी म्हणालो '' तुम्हाला या भागातल्या काही जुन्या घराण्यांची माहिती आहे का? सरदार, सुभेदार वगैरे''

'' सांगोवांगी जे काय चालत आले तेवढेच. तळासरीच्या गढीचा काही लोक उल्लेख करतात.  कड्या वरची गढी म्हणत असत तिला. सरदार कुडतोजीरावांची मालकी होती त्याच्यावर. त्याचा शेवटचा वारस त्याची बायको इंदुमती. तिने गढी चौसाळकरांना विकली. हे सर्व १३व्या शतकात घडले असे बोलतात. नंतर गढीचे अनेक मालक झाले.''

'' इंदुमती '' मी जवळपास आच्श्रार्याने ओरडलो.

'' हो. सरदार कुडतोजीरावांची बायको. त्यांचा काळ झाल्यावर गढीची मालकी इंदुमतीबाईंकडे आली. पण इतर फारशी काही माहिती नाही. कदाचित वाचनालयात काही माहिती मिळेल. तुम्ही नवीन दिसता गावात? उतरलात कुठे?''

'' कळवणला माधवराव मराठेंच्या घरात माझा मुक्काम आहे. उन्हाळ्याची सुट्टी इथे घालवावी असा विचार आहे. ''

'' छान. फारच छान. ओळखतो मी माधवरावांना. फार मोठे शास्त्रज्ञ आहेत ते. तुमचे स्नेही वाटते. ठीक, येत जा मधून मधून. काही लागले सवरले तर जरूर सांगा.''

पुजाऱ्याचा निरोप घेऊन मी गाडीत बसलो. औषधाचा काहीच परिणाम झाला नाही याचे मला बरे वाटले. मंदिर आणि समोरचा रस्ता भूतकाळात मुळीच बसत नव्हता. भूतकाळात तिथे माळरान होते. भूतकाळातल्या गोष्टींची मी वर्तमान काळात मांडणी करु लागलो. पण कशाचाच मेळ लागत नव्हता. एक मात्र बरे, मला भलताच उत्साह जाणवत होता. गावातील सार्वजनिक ग्रंथालयात जाऊन मी जुन्या सरदार घराण्यांचा इतिहास काढला. खरच त्यात जानकोजीराव,हैबतराव आणि इंदुमती, हो, इंदुमती पण होती. म्हणजे केवळ कल्पनेतली स्त्री नव्हती ती. मी सुन्न होऊन स्तब्ध बसलो. मी भूतकाळात खरच गेलो होतो. त्या मंडळींना मी प्रत्यक्ष पाहिले होते. हा नुसता संज्ञाप्रवाह नव्हता. मी भूतकाळात खरच जाऊ शकत होतो. त्या भूतकाळातल्या व्यक्तींशी माझी एक जवळीक साधली होती. मी घरी पोचलो आणि माधवला फोन केला.

'' छान. कसे काय घडले ते मला सांग''

'' काय घडायच? काही घडले नाही. बाहेर सारखा पाऊस पडतो आहे. '' मी समजून उमजून मु-ाम म्हणालो.

'' हवा पाण्या बाबत मी नाही विचारले. '' माधव हसत म्हणाला'' तुझा दुसरा प्रयोग कसा काय झाला?''

मी पुनः प्रयोग करीन याची माधवला खात्री होती. पण लागलीच करीन हे त्याने गृहित धरावे हे मात्र मला आवडले नाही. '' मी पुनः प्रयोग करीन याची एवढी तुला खात्री होती?''

'' एकदा प्रयोग केला की माणसाला पुनः प्रयोग करावासा वाटतोच.'' माधव अगदी शांतपणे म्हणाला.

'' तसे घडले खरे. पण माझी पुनः प्रयोग करावयाची मुळीच इच्छा नव्हती. पण मला एका गोष्टीची शहानिशा करून घ्यावयाची होती. तुझ्यात आणि माझ्यात काही सुप्त संज्ञाप्रवाह आहे की काय हे मला तपासून घ्यावयाचे होते. म्हणून या वेळी मी औषध तुझ्या स्वयंपाकघरात न घेता बाहेर घेतले. आणि तुला न कळवता देखील. तरी पण मला तुझ्यासारखाच अनुभव आला. स्वयंपाकघरात तुझ्या काही स्मृती रेंगाळत असतील अणि म्हणून तुला नी मला एकच अनुभव येतो असे मला वाटत होते पण तसे काही दिसत नाही. कारण मी औषध एका बाटलीत भरून घेतले. गाडी काढली आणि मंदिरात गेलो. ''

'' छद्मीपणे हसत माधव म्हणाला '' मी पण दुसऱ्या वेळेला मंदिरातच औषध घेतले होते. फक्त तु पायरीवर बसून घेतले असशील मी मात्र आत जाऊन देवाच्या साक्षीने घेतले. '' मी औषध घेतल्या पासून ते पुजाऱ्याची गाठ पडेपर्यंत सर्व माधवला सांगीतले. माझे बोलणे माधवने शांतपणे ऐकून घेतले

'' एकंदरीत तुझी दुसरी वारी छानच झाली म्हणावयाची. मला मात्र तुझी ती राजकन्या नाही भेटली''

'' म्हणजे,  तुला पण माझ्या सारखाच अनुभव आला?''

'' नाही, नाही रे बाबा. मला फक्त काही सन्यासी आणि महंत भेटले. रावजी मात्र होता हं. एखाद्याचे नशीब. त्यांच्या त्यांच्या आवडीप्रमाणे माणसे भेटतात नाही का?. ते जाऊ दे, एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? आपल्याला जे अनुभव येतात ते रावजीच्या माध्यमातून येतात. रावजी आपला त्या काळातला दुवा आहे. ''

'' आहे खर तसे. पण रावजीचा आणि आपला काय संबंध?''

'' तेच आपल्याला शोधून काढावयाचे आहे. तुला बरेच प्रयोग करावे   लागतील. पुढच्या एक दोन भुतकाळातील प्रवासानंतर सगळे स्पष्ट होईल असे वाटते. ''

'' हे बघ माधव! त्या रावजीचा पाठलाग करणे खरे कंटाळवाणे होते आणि तो पण मदत करावयाला उत्सुक दिसत नाही. आणि ती सुभेदारीण बाई पण आपल्याला आवडत नाही''

'' अरे ती चमकदार डोळ्याची जराशी मध्यमवयीन स्त्री तर नाही?''

'' तिच जानकीबाई. पण तू तीची फारशी अपेक्षा करु नकोस. तीच मन आधीच दुसरीकडे गेले आहे. ''  आमच्या मूर्खपणाचे आम्हाला एकदमच हासु आले. दोन शतकापूर्वी होऊन गेलेल्या व्यक्तीसंबंधी आम्ही किती वास्तवात बोलत होतो! त्या काळाशी किती एकरूप झालो होतो!. मला जरा भीतीच वाटु लागली.

'' अरे! आणखी एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? ते लोक फार जुनी रांगडी भाषा बोलतात पण आपल्याला समजावयाला काहीच अडचण होत नाही ?फार काय! ते

विचित्र पण वाटत नाही. भूतकाळात जाताना बुद्धीची आणखी किती चक्रे उलटी फिरतात कोण जाणे. मन मात्र भूतकाळावर जडत जाते नाही का !''

'' माधव! औषधाचा इतर काही वाईट परिणाम होत नाही ना? मला खूप भीती वाटते. यावेळी उलट्या, चक्कर येणे वगैरे काही झाले नाही पण उत्साह मात्र खूप वाटतो. काही धोका नाही ना?''

'' हे बघ आपल्याला तेच तपासून पहावयाचे आहे. त्या औषधाचे व्यसन लागण्याची शक्यता आहे. औषधाचा परिणाम संपल्यावर वाहन वगैरे चालवणे धोक्याचे आहे. बुद्धीला तरलता येते. म्हणूनच मी तुला औषध घरातच घ्यावयाला सांगीतले होते. आणि हे बघ ती बी लेबलची बाटली ताबडतोब माझ्याकडे पाठव. मी त्याचे माकडावर प्रयोग करून पहाणार आहे. बर, मी फोन बंद करतो''

'' माधव! ''मी ओरडुन म्हणालो '' वीणा कधीही येण्याची शक्यता आहे''

मी बंद फोनवर ओरडत होतो. माधवने फोन बंद केला होता. मी प्रयोगशाळेत जाऊन बी लेबलची बाटली एका खोक्यात पॅक केली. बाकी सर्व ठीक ठाक आहे की नाही हे पूनः  एकदा नीट पाहिले. एक बाटली काढल्यामुळे अे लेबलची बाटली चटकन नजरेत भरत होती. मघाचची रिकामी शिशी जवळच पडली होती. एखाद्या पक्क्या दारुड्याप्रमाणे मी अे बाटलीतले तीन डोस शिशीत भरून घेतले. बाटली खिशात टाकली आणि पॅक केलेला खोका घेऊन बाहेर पडलो. चारचे डाकेने वीणाचे पत्र आले होते. बुधवारी ती विमानाने मुंबईला निघणार होती. रात्री १० वाजेपर्यंत ती मुंबईच्या फ्लॅटवर पोहोचणार होती. माझे उत्तर पडले

असणार अशी तिने आशा बाळगली होती. वीणाचे हे नेहमीचेच आहे. पत्र तिने आठ दिवसापूर्वी लिहले होते आणि पोष्टात पडायला सहा दिवस लागेले होते. माझे उत्तर तिला मिळणे शक्य नव्हते. म्हणजे पुढच्या एक दोन दिवसात वीणा आणि मुले इथे येऊन थडकणार होती. मग आमचे प्रयोग बोंबलले. इंदुमतीच पुढ काय होणार? वीणाचे येणे लांबवावयाला हवे. पाच वाजत आले होते . पोष्ट बंद होण्याची वेळ आली होती. घराची आवरा आवर करावयाची आहे, सामान नीट लावायचे आहे, अशी बरीच कारणे सांगून तिचे येणे पुढच्या बुधवार पर्यंत लांबेल असे पत्र तयार केले. खोका आणि शिशी घेतली आणि पोष्टाकडे सुटलो. दारातच कालिंदीबाईनी गाठले. वीणा आणि मुले पुढच्या बुधवारी येत आहते असे नुसते त्यांना सांगीतले तर त्यांनी सामानाची एक यादी हातात टिकवली. कसेबसे पोष्ट वेळेवर गाठले. वीणाचे पत्र पोष्टात टाकले, पार्सल केले आणि सुटकेचा निश्वास टाकला. चला म्हणजे आता प्रयोग करावयाला तब्बल एक आठवडा मिळाला होता.

## प्रकरण पाचवे

आज बुधवार होता. सामान आणावयाचे होते म्हणून गाडी किराण्याच्या दुकानाकडे वळवली. दुकानातच कालचे पुजारी भेटले. '' काय लागला का काही पत्ता? ''

'' थोडासा लागला पण इंदुमतीबाई बाबत थोडा गोंधळ होतो. कदाचित दोन इंदुमती असाव्यात.''

'' असेल, असेल'' असे बोलून  पुजारीबुवा पडशी घेऊन चालु लागले.

'' पुजारीबुवा! तुमच्या देवळात वाघजईची यात्रा आजकाल होते नाही का? माळावर खूप धमाल होत असेलं नाही?''

पुजारीबुवांनी माझ्याकडे नीट नीरखून पाहीले. मी थट्टा वगैरे करित नाहीना अशी त्यांना शंका आली असावी. त्यांची खात्री पटली असावी की तसा माझा काही उ॓श नाही '' वाघजईची यात्रा बंद होऊन दोन तीनशे वर्षे झाली. त्या काळी व्याघ्र देवता मानणारे काही मठ असावेत. त्या काळी ही यात्रा भरत असावी. आणि माळरान म्हणता तसे काही नाही. मंदिरात नवरात्रीचा उत्सव होतो. मला वाटते त्याच वेळी वाघजईची यात्रा भरत असावी'' माझ्याकडे पुनः एकदा नीट पहात पुजारीबुवा निघाले

'' असेल असेल. '' कसे बसे सावरून घेत मी म्हणालो '' मी नागपूरकडचा ना . आमचे कडे कालीमातेचा, दुर्गामातेचा उत्सव साजरा होतो. वाघ वगैरे रंगवतात म्हणून वाघजईची यात्रा असे चुकुन तोडांतून निघाले असावे''

पुजारीबुवांचा चेहरा बराच निवळला. माझा गोंधळ त्यांना पटला असावा.

'' तसे वेडेविद्रे प्रकार इथे होत नाहीत. इथे सतत नऊ  दिवस दिपमाळ जळत असते'' मोठ्या अभिमानाने सांगून ते चालते झाले.

सामानाच्या पिशव्या मी डीगीत टाकल्या. रात्रीच्या जेवणाला बराच वेळ होता. घरी जाण्याची मुळीच घाई नव्हती. मी तळासरीच्या रस्त्याने निघालो. भुतकाळातील गोष्टींची वर्तमानकाळाशी सांगड घालणे सुरु होते. नागमोडी वळण घेत मी पठारावर येऊन पोहोचलो. रेल्वेचा आवाज आला. तळासरीच्या बोगद्यातून गाडी बाहेर पडत होती. लहानपणी कितीतरी

वेळा आम्ही कल्याण ते तळासरी असा प्रवास केला  होता. बोगदा आला की सामान आवरून आम्ही तयार व्हावयचो तोच स्टेशन यायचे. गाडी निघून गेल्यावर सर्व पुनः कसे शांत झाले. खिशातली शिशी चाचपडत मी एका टेकाडावर जाऊन बसलो आणि एखाद्या सराईत दारुड्यासारखी बाटली तोंडाला लावली. वीणाचे येणे बुधवार पर्यंत लांबले होते.

यावेळी मात्र मी वर्तमानकाळातून भूतकाळात जाण्याचा संक्रमणाचा क्षण पकडण्याचा निश्चय केला होता. डोळे बंद करून अगदी शांत चित्ताने मी बसलो होतो. किती वेळ असा बसलो असेन माहित नाही. झोप पण लागली असावी. झाडावर कोकिळेची कुहुकुहु ऐकु आली. भर उन्हाळ्यात ? मी दचकून डोळे उघडून पाहिले. वसंताची सुंदर संध्याकाळ पसरली होती. संक्रमणाचा क्षण माझे हातून निसटला होता. खालून जाणारा रस्ता लुप्त झाला होता. डोंगराचे पायथ्याशी समुद्राच्या लाटा येऊन आदळत होत्या. लांबून एक मचवा माझ्याच दिशेने येत होता. मचवा जवळ आला तसे त्याच्यावरच्या माणसांचा आवाज ऐकु येऊ लागला. मचवा किनाऱ्याला लागला. मचव्यातील माणसांना काही सूचना देऊन एक प्रौढ माणूस आणि एक मुलगा डोंगर चढु लागले. ते जवळ आले तसे मी त्यांना ओळखले. बोरगावकर सरदार आणि त्यांचा मुलगा होते ते. दोघांचे चेहरे गंभीर होते. अभिवादनासाठी त्यांनी हात वर केले. इतके स्वाभाविक होत ते की मीपण प्रत्युत्तर म्हणून हात वर केला. त्यांनी मला पाहणे शक्यच नव्हते. जवळ जवळ मला खेटूनच ते पुढे गेले. मी मागे वळून पाहिले. गढीचा दरवाजा माझे मागेच होता आणि रावजी त्यांच्या स्वागताला दारात उभा होता.

'' काय खबर आहे? '' सरदारांनी विचारले.

नीराशेने मान हलवत रावजी म्हणाला '' काही आशा नाही. काही घटकांचेच सोबती आहेत. जानकीबाईसाहेब जवळ आहेत. बोर्डीहून सरदार विसाजीपंत पण आले आहेत. मंजुळाबाईपण आहेत. तसा हैबतरावांना त्रास काही नाही पण शक्ती मात्र क्षीण झाली आहे. ''

'' आणि निदान?''

'' तसे काहिच नाही. थोडे पावसात भिजण्याचे निमित्त झाले. पण क्षीणता मात्र खूप आहे. वातात बडबड पण खूप करतात. मठातील जनार्दनस्वामिंचे तीर्थ फक्त घेतात. दुसरे कुठलेच औषध घ्यावयाला ते तयार नाहीत. '' सरदार साहेबांना आणि मुलाला आत जाण्याकरिता रावजी बाजूला झाला. आत मी पण गेलो. गढीची भव्यता आता जाणवत होती. कचेरीत दोन मुले आणि एक मुलगी म्लान चेहरा करून बसली होती. बोरगावकरांना पहाताच पोरे धावत येऊन त्यांना बिलगली. बोरगावकरांनी त्यांचे पाठीवर हात फिरवला, थोपटले. '' जा बाळांनो तुमच्या बरोबर हिरोजींना पण घेऊन जा''

कचेरीतील इतर व्यक्तिंकडे मी पाहिले. एका जोडप्याला मी पूर्वी कधीच पाहिले नव्हते. हे नक्कीच विसाजीपंत आणि मंजुळाबाई असाव्यात. तिसरी व्यक्ती इंदुमती होती. पांढऱ्या पोषाखात फारच आकर्षक पण म्लान दिसत होती. उत्तमराव बोरगावकर तिच्याकडे वळले तेंव्हा ती रागानेच म्हणाली '' बरेच लवकर उगवलात म्हणायचे!. नदी पार करण्याकरिता इतका वेळ लागतो हे माहित नव्हते मला. का मासे पकडण्यात वेळ गेला?''

तिच्या रागाकडे दुर्लक्ष करित त्याने वाकून मुजरा केला. मागे उभ्या असलेल्या विसाजीपंतांकडे वळून ते म्हणाले '' सरदार साहेब ठीक आहेत ना? आमचे मुक्कामापासून एका घटकेत येऊन पोहोचलो म्हणजे उशीर म्हणावयाचा का?''

'' जाऊ द्या हो. काय लक्ष देता तिच्याकडे. आणि लवकर येऊन तरी काय करणार होतात म्हणा!''

'' काही कसं करणार नाही. '' मंजुळाबाई म्हणाल्या '' प्रसंग पडला तर तेच मदतिला धावून येतील इतक बरीक लक्षात असु द्यावे. त्या भांगेच्या तारेत असलेल्या उपाध्यायाला आणि त्या लुच्च्या स्वामीला बाहेर हेच काढु शकतील''

बोरगावकर इंदुमतीकडे वळले. वागण्यातील दुरावा नजरेने मिटवण्याचा प्रयत्न जरूर होता. मी मनातल्या मनात अंदाज केला. मागे मी जेव्हा त्यांना गाभाऱ्यात एकत्र पाहिले होते तेंव्हा पासून जवळपास सहा महिने उलटले असावेत. मधल्या काळात बरेच काही घडून गेले होते. नाहीतर हा असा चोरटेपण का? माझे विचार भूतकाळाशी एकरूप झाल्याचा हा पुरावाच होता.

'' जानकीबाई वरच असतील ना?'' बोरगावकर म्हणाले.

'' हो. हैबतराव, तो स्वामी आणि जानकीबाई यांच्याशिवाय कोणालाच जवळ येऊ देत नाहीत. तळासरीचे वैद्य येऊन गेले पण हैबतराव इतर कोणाचेच औषध घेत नाहीत. आणि स्वामींच्या त्या तीर्थाने काहीच परिणाम होत नाही. आता तर हैबतराव बेशुद्ध आहेत. आणि शेवट काही फार दूर नाही.''

'' हैबतरावांना वेदना नाहीत हे काय कमी आहे ?त्यातच आपण समाधान मानावे'' बोरगावकर म्हणाले.

'' ते आहेच म्हणा. आणखी एक अडचण आहे. हैबतरावांनी सगळ्यांना सांगून ठेवले आहे की मरणोत्तर त्याचे क्रियाकर्म, अस्थी विसर्जन वगैरे मठाजवळच्या समुद्रातच करावयाचे. परंपरेप्रमाणे हे सर्व काशीला जाऊन करावयाला हवे नाही का? '' मंजुळाबाई म्हणाल्या.

'' हे बघा त्यांच्या मनाप्रमाणे करु. आणि अजून हैबतराव गेले नाहीत तोच याची चर्चा कशाला? आणि लोकांचा काय घेऊन बसलात काही दिवस बोलतील आणि सर्व विसरतील.'' बोरगावकर म्हणाले.

'' बरोबर आहे म्हणा तुम्हाला ! पेशव्यांशी बंड करून पुनः गादीशी स्वामीनिष्ठा दाखवीणाऱ्यांना लोकांची काय पर्वा म्हणा ! पण आमचे काय? लोक शेण घालतील आमचे तोंडात'' मंजुळाबाई रागानेच म्हणाल्या.

'' बायकांचे बोलणे मनावर घेऊ नका सरदारसाहेब'' समजावणीच्या सुरात विसाजीपंत म्हणाले. '' आणि आपण पण या गोष्टीची आता चर्चा करु नये. जुन्या जखमांवरची खपली काढण्यात आपल्याला पण काय आनंद मिळतो?''

'' हो, ही चर्चा आताच केली पाहिजे का? '' जरा रागानेच इंदुमती बाई म्हणाल्या. '' वरती हैबतराव बरिक मरणोन्मुख अवस्थेत आहेत पण अजून गेले नाहीत ना? मग आधीच क्रियाकर्माची चर्चा कशाला?''

इंदुमतीचा आवाज मी प्रथमच ऐकत होतो. आवाजात किनरी झाक होती पण स्वरूपाला आवाज साजेसा होता.त्यांच्या बोलण्याने सर्वांचा गोंधळ उडाला. मंजुळाबाई रडु लागल्या सरदार साहेब इकडे तिकडे येरझाऱ्या घालु लागले.माझ्या मागे उभ्या असलेल्या रावजीने इंदुमतीबाईकडे पहात सांगीतले '' बोरगावकर सरदार आल्याची वर वर्दी देऊन येतो'' कोणीही त्याला प्रतिसाद दिला नाही. थोड्या वेळ वाट पाहून रावजी माडीवरच्या दालनाकडे निघाला. मी पण पाठोपाठ होतोच.

हैबतराव दालनात एका मंचकावर झोपले होते. शेजारच्या मेजावर औषधाच्या काही कुप्या आणि पात्रे होती. जानकीबाई हैबतरावांच्या पायथ्याशी बसल्या होत्या. स्वामी हैबतरावांची नाडी पहात होता. रावजीकडे न पहाता जानकीबाईंनी विचारले '' सगळे जमले का?''

'' ज्यांना ज्यांना निरोप दिले होते ते सगळे आले आहेत . आल्यापासून त्यांच्यात कुरबुरी सुरु आहेत. फक्त जानकोजीराव अजून आले नाहीत.''

'' ते कदाचित येणार नाहीत. त्यांनी न येणेच बरे. उगीच लोकांना बोलावयाला निमित्त. '' स्वामींना त्यांनी विचारले '' अजून किती वेळ आहे? '' स्वामींनी नाडी धरलेला हात सोडून दिला. हैबतरावांचे थिजलेले डोळे बंद केले. '' संपले सगळे. तुम्ही आता शोकाचा उमाळा आणावा ते बरे. हुकमी रडणे तुम्हाला जमणार नाही तेंव्हा हैबतरावांचे छातीवर डोके टेकवून तोंड लपवणे बरे राहील. रावजीला सगळ्यांना बोलवावयाला सांगावे.''

'' काय दिले तुम्ही त्यांना?'' रावजीने विचारले.

'' नेहमीचेच रसायन. फक्त मात्रा जरा वाढवली एवढेच''

'' मला वाटते लोक येण्यापूर्वी मेजावरच्या कुप्या आणि बाटल्या हालवल्या तर बरे. उगीच बोभाटा नको.''

'' ठीक आहे. आवर ते सगळे आणि बोलाव सगळ्यांना.''

पडदे बाजूला सारून रावजी बाहेर पडला. मी मागे होतोच. आतल्या कोंदट वातावरणातून बाहेरचा सूर्य प्रकाश एकदम डोळ्यांना  खुपला. बोरगावकर सरदारांच्या मचव्याची शीडे वाऱ्यावर फडफडत होती आणि हीरोजी आपल्या चुलत भावांना काहीतरी सांगत होता. माझे या प्रसंगी या लोकांत हजर असणे किती चमत्कारिक होते नाही? त्यातील विकृती मला प्रथमच जाणवली. माझे अस्तित्व नव्हते त्या काळातील घटनांना मी साक्षीभूत होत होतो. त्यांच्या उत्सवात आणि हेव्यादाव्यात सहभागी होत होतो.   कुप्यांची आणि पात्रांची पडशी घेऊन जिन्याने रावजी मागच्या पडवीत गेला. पडवीत बरेच नोकर जमा झाले होते. रावजीला पहाताच चटकन इकडे तिकडे पांगले. त्यातल्याच एका तरूणाला खूण करून रावजीने जवळ बोलवले. त्याच्याकडे पडशी देऊन म्हणाला '' हैबतरावांचा काळ झाला आहे. मठात जाऊन वर्दी दे . तसाच नंतर घरी जा आणि ही पडशी तळघरात नीट ठेऊन दे. '' पहिल्या वेळी झोपडीत पाहिलेला तोच तरूण होता तो. रावजी पुनः दिवाणखान्यात आला. कोणाही कडे न पहाता म्हणाला '' जानकीबाईसाहेबांनी वर बोलावले आहे. मी मुलांना बोलावतो.''

'' हैबतरावांचे जास्त आहे का?'' बोरगावकर सरदार विचारते झाले.

'' हैबतरावांचा काळ झाला. पुनः शुद्धीवर आलेच नाहीत. ''

'' ठीक आहे. देवाची इच्छा. आमची बहीण हे कसे काय सहन करणार देव जाणे! चला मंडळी वर जाऊ.''

दारातून मुले आणि रावजी आत आले. अशुभाची त्यांना लागलीच चाहूल लागली असावी. चेहरे गोरेमोरे झाले होते. विश्वासरावांच्या चेहऱ्यावर नको ते गांभीर्य उमटले होते. आपल्या भावांकडे वळून ते म्हणाले '' बाबांचा देहांत झाला आहे. माझे मागून चला'' पोरे पण नीमूटपणे मागून जाऊ लागली.

'' बाईसाहेब आपण अंत्यदर्शनाला चलणार नाही का?''इंदुमती बाईकडे पहात रावजीने छद्मीपणे विचारले.

प्रथमच इंदुमतीबाईंनी वळून रावजीकडे सरळ पाहिले . तिच्या नजरेत तिरस्कार ओतप्रोत भरला होता '' मृत्युची अशी परवड करणे मला आवडत नाही''

'' आपण आला तर हैबतरावांच्या आत्म्याला शांती मिळेल. ''

'' हैबतरावांच्या आत्म्याला शांती मिळेल की नाही ते मला माहीत नाही. पण त्यांचा आत्मा बऱ्याच दिवसापासून तडफडत होता हे मात्र बरिक खरे''

'' हैबतराव बऱ्याच दिवसापासून आजारी होते. त्र्यंबकेश्वरी जाऊन आल्या पासून त्यांना सारखा क्षीणपणा जाणवत होता. बोपर्डीकर सरदारांना पण तोच विकार जडला होता म्हणे. यावर काहिच उपाय नाही म्हणतात''

'' बोपर्डीकरांचे मला काही सांगु नकोस. ते शेवटपर्यं शुद्धीत होते आणि वातात असे बरळत नव्हते''

'' माणसामाणसात फरक असतो. प्रत्येकाची रोगाशी झगडण्याची शक्ती सारखीच नसते. त्यातून हैबतरावांची शक्ती अगदी क्षीण झाली होती'' समजावणीच्या सुरात रावजी म्हणाला.

'' हो ना. आधीच प्रकृती क्षीण आणि त्यात तुमच्या त्या स्वामीच्या मात्रा आणि काढे. मला दुधखुळी समजु नका. मला पण त्या हरामखोर स्वामी इतकी काढ्यांची आणि मात्रांची माहिती आहे.''

इंदुमतीबाईंच्या उघड उघड आरोपाने रावजी जरा गडबडलाच. पण स्वतःला सावरून पुनः मानभावीपणे म्हणाला '' बाकी सर्व लोक सध्या शोकमग्न आहेत. या बाबतीत आपण जानकीबाईंशी बोलला तर बरे. माझा यात काहिच संबध नाही''

'' हो ना! तुझा काय संबध? पण मला काही समजत नाही अस बरिक समजु नकोस म्हणजे झाले''

अचानक वरून मुलांच्या रडण्याचा आवाज आला. रडत रडत जिना उतरून विश्वासरावांचा धाकटा भाऊ इंदुमतीबाईंना बिलगला. '' सर्व जण म्हणतात की बाबा गेले म्हणून. खोटे आहे ते. बाबांनी डोळे उघडून माझ्याकडे पाहिले आणि पुनः डोळे मिटले. मला बोलावत होते का ते?''

मुलांच्या पाठीवरून हात फिरवीत रावजीकडे तिरस्काराने पहात इंदुमतीबाई म्हणाल्या '' या घरात जर काही वेडाविद्रा प्रकार घडला असे असेल तर त्याला तुच जबाबदार आहेस हे लक्षात ठेव. या जन्मात नाही जमले तर पुढच्या जन्मात नक्कीच तुला याचा जाब द्यावा लागेल हे लक्षात असु दे''

रावजी एकदम पुढे सरकला. मला वाटले तो मुलाला इंदुमतीबाईंकडून हिसकावून घेणार. मी एकदम दोघांच्या मध्ये जाऊन उभा राहीलो. आता माझ्या भोवती कुणीच नव्हते. एका जुन्या मुरुमाच्या खाणीत मी उभा होतो. आजुबाजुला बराच कचरा पडला होता. कसाबसा एका वेलीचा आधार घेत मी वर आलो. पोटात भयंकर मळमळत होते. डोके गरगरत होते. बोगद्यातून गाडी जाण्याचा आवाज येत होता.   खाण बरीच खोल होती आणि चढणे पण कठीण होते. माझ्या अशा अवस्थेत वर चढणे खूप त्रासदायक होते. पण तरी कसाबसा मी वर रस्त्यावर येऊन पोहोचलो आणि एका दगडावर बसकण मारून डोळे मिटून घेतले. असा किती वेळ मी बसलो असेल कोण जाणे. माझ्या खांद्यावर हात ठेऊन कोणीतरी विचारत होते '' काय झाले? चक्कर वगैरे आली का?''

''हो, पण बरे वाटते आहे आता''

लटपटत मी उभा राहिलो आणि गाडीकडे जाऊ लागलो. त्याने मला आधार दिला. माझ्याच वयाचा गृहस्थ होता तो. '' किल्ल्या आहेत ? '' बापरे! आता जर किल्ल्या खाणीत पडल्या असल्या तर आली का पंचाईत. गडबडीन मी खिसे चाचपडु लागलो. सुदैवाने त्या खीशातच होत्या. बराच प्रयत्न करून सुद्धा मी गाडीला किल्ली लाऊ शकलो नाही.

'' राहु द्या. किल्ल्या द्या माझ्याकडे. मला वाटते या अवस्थेत तुम्ही गाडी चालवणे शक्य नाही. तुम्ही माझे काही पेशंट नाहीत. पण तरी मला वाटते की तुम्ही गाडी इथेच सोडून द्या. नंतर बोलावून घ्या. मी तुम्हाला सोडतो घरी. कुठ राहता तुम्ही?'' माझा सोबती विचारू लागला. नवागत डॉक्टर आहे हे समजल्यावर मी जरा गडबडलोच. मला आलेली साधी चक्कर नसून हा औषधाचा परिणाम आहे हे त्याच्या लागलीच लक्षात आले असते. आणि त्यातून बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या असत्या. '' नको कशाला उगीच तुम्हाला त्रास. जवळच तर कळवणला जावयाचे आहे मला. जाईन मी सावकाश''.

''पहा बुवा! मला वाटते तुम्ही माझे बरोबर यावे. मला पण कळवणला जावयाचे आहे. ठीक आहे तुम्ही म्हणता तर चालवा गाडी. तुमची गाडी समोर असु द्या. मी मागून येतो. काही अडचण वाटली तर खूण करा'' असे म्हणून डॉक्टर आपल्या गाडीत बसले. सर्व अवधान गोळा करून मी गाडी सुरु केली. हात हलवून डॉक्टरना खूण केली आणि घराकडे निघालो. रस्त्यावर नजर स्थीर ठेवणे कठीण जात होते. पण दुसरा उपाय नव्हता. हळु हळु माझा आत्मविश्वास वाढु लागला. घराकडे जावयाच्या वळणावर आल्यावर मी डॉक्टरना हात हालवून निरोप दिला . डॉक्टर बरेच समजुतदार दिसले. त्यांना टाळण्याची माझी इच्छा त्यांना कळली. ते देखील हात हलवून निघून गेले. गाडी गॅरेजमध्ये लावून मी सरळ प्रयोग शाळेत गेलो. शिशी टेबलावर ठेवली आणि दिवाणखान्यात येऊन आरामखुर्चित स्वतःला झोकून दिले.बऱ्याच वेळाने मला हुशारी वाटु लागली. अचानक मला औषधांच्या पडशीची आठवण झाली. ताडकन उठून मी गॅरेज कडे धावणार होतो पण पुनः

एकदम आठवले की रावजीने पडशी माझ्याकडे नाही तर त्याच्या भावाकडे दिली होती. मी पुनः मटकन आरामखुर्चित बसलो. भूतकाळ आणि वर्तमानकाळ याची मी गल्लत करित होतो. यापूर्वी असे घडले नव्हते. भूतकाळ वर्तमानकाळाला छेदून जात होता. इतका थकवा आणि चक्कर येणे हे पण घडले नव्हते. आताची परिस्थिती खूपच गंभीर होती. माझे माझ्यावरचे नियंत्रण दुबळे झाले होते. भूत काळाला मी वर्तमान काळापासून वेगळे ठेऊ शकत नव्हतो. काय झाले होते मला ? माझे परत येणे, मला डॉक्टर भेटणे , शिशी परत जागेवर ठेवणे ही वस्तुस्थिती होती. मरणोन्मुख हैबतराव, इंदुमतीकडे रागाने चाल करून जाणारा रावजी हे पण मला खरे वाटत होते. भास आणि सत्य यांची मी गल्लत करित होतो. मी खूप घाबरलो. स्वतःवरच खूप रागावलो. या नसत्या उद्योगात मला अडकवणाऱ्या माधवचा पण मला खूप राग आला.

माधवला औषधाच्या परिणामाची पूर्ण कल्पना नव्हती. म्हणूनच त्याचे ते माकडावरती प्रयोग ! पण मला औषधाचा काय परिणाम होतो हे अगदी पूर्ण पणे समजले होते. मळमळणे, चक्कर येणे हे मी समजु शकत होतो पण भूत काळ आणि वर्तमान काळ एकामेकांना छेदणे हे फारच भयंकर होते. मरो तो माधव आणि त्याचे ते प्रयोग. या पुढे प्रयोग बंद करण्याचा मी मनाशी निश्चय केला. रागाने मी नुसता धुमसत होतो. तेवढ्यात फोन वाजला. फोन माधवचाच असणार या खात्रीन मी फोनवर जोरात ओरडलो '' खड्ड्यात गेले तुझे ते प्रयोग. तुझ्या तालावर नाचणारा काय माकड समजला की काय मला? या पुढे सर्व बंद''

अपेक्षेने मी माधवच्या प्रत्त्युतराची वाट पाहु लागलो. पण पलीकडे सर्व शांत होते.

'' वा! बायकोचे स्वागत करावयाची छान पद्धत आहे तुमची. तुमच्या मित्राने तुमचे माकड करण्यापर्यंत वेळ आणली वाटते?. '' फोनवर वीणा होती.

मूर्खासारखा मी फोन हातात धरून उभा होतो. फोन खरेच वीणाचा होता की पुनः काळाची गडबड ?

'' अहो! फोनवर आहात ना तुम्ही? सर्व ठीक आहे ना? '' वीणाचा पुनः आवाज आला. मी स्वतःला सावरले आणि म्हणालो '' अग! मला वाटले माधवचा फोन आहे. सॉरी हं. या माधवने असे सतावून सोडले आहे. नुसता सगळा पसारा करून ठेवला आहे. तू कुठून बोलतेस?''

'' मुंबईच्या विमानतळावरून. प्लेन जरा लवकर आले. शेजारचे पाळंदे न्यावयाला येणार आहेत. त्यांची वाट पहात होते. वेळ होता म्हणून तुम्हाला फोन केला. खरच सर्व ठीक आहे ना? ते प्रयोग वगैरे काय म्हणत होता? तुमची तब्बेत ठीक आहे ना ? आवाज पण घाबरल्या सारखा येत होता''

'' नाही ग सर्व ठीक आहे. प्रयोग वगैरे काही नाही. प्रयोगशाळा म्हणत होतो मी. काय भयंकर वस्तु आहेत त्या प्रयोग शाळेत म्हणून जरा घाबरलो होतो. आणि त्यात पुनः माधवने हा असा करून ठेवलेला पसारा. तुझे पत्र आजच मिळाले. मी उत्तरात सविस्तर सगळे

लिहले आहे. या बुधवारी न येता पुढच्या बुधवारी तुम्ही या. तो पर्यंत सगळे आवरून घेतो.
''

'' असे कसे होईल? तुम्ही तेथे जवळपास आठवडाभर आहात आणि अजून आवरले नाही म्हणता? मोलकरीण तर आधीचीच आहे असे तुम्ही सांगीतले होते मग कसली अडचण आहे? का तिला स्वयंपाकपाणी येत नाही?''

'' नाही ग तसे काही नाही. कालिंदीबाई छान स्वैपाक करतात. तु आल्यावर कळेलच तुला. खरी अडचण आहे ती हा पसारा आवरण्याची. पण पुढच्या बुधवारपर्यंत नक्कीच सर्व आवरून घेतो. मुले कशी आहेत. ?''

'' तुम्हाला खरेच काही झाले नाही ना? अहो मी विमानतळावरून बोलते आहे सांगीतले ना. अजून मुलांची भेट झाली नाही. मला त्या पसाऱ्याचे काही खरे वाटत नाही. पुढच्या बुधवारी मात्र आम्ही नक्की येतो आहोत. फोन बंद करते. पाळंदे आले आहेत''

कपाळावरचा घाम पुशीत मी सुटकेचा निश्वास टाकला. वीणापासून सर्व लपवणे सोपे नव्हते. तिला नक्कीच काही तरी संशय आला होता. चला आता बुधवार पर्यंत वेळ मिळाला होता. तोपर्यंत सगळे कळणार होते. मनातल्या विचाराची जाण होताच मी दचकलो. थोड्या वेळापूर्वी मी प्रयोग करणे बंद करणार होतो आणि आता लगेच मी बुधवार पर्यंत प्रयोग करावयाला वेळ मिळाला म्हणून आनंदलो होतो. मी त्या औषधाच्या नादी लागलो होतो. मला स्वतःला सावरावयाला हवे. मी माधवला फोन केला तो घरी नव्हता.दुसऱ्या

दिवशी टपालात दोन पत्रे होती. एक माझ्या आईचे होते. कळवणला सुटी घालवण्याची कल्पना तिला आवडली होती. मुलांची खुशाली विचारली होती. दुसरे पत्र माधवचे होते.

" प्रिय दिगु,

माझ्या एका सहकाऱ्याने काही जुनी दप्तरे चाळली. तुला इंटरेस्ट वाटेल म्हणून सापडलेले संदर्भ देत आहे. आज दुपारी मी तुझाच विचार करीन . पाहु संज्ञाप्रवाह कसा काम करतो ते. रावजी तुला कुणाची भेट घडवतो याची मला खूप उत्सुकता आहे. एक मात्र लक्षात ठेव . आंगचटीला जाउ नकोस हं . तुझा माधव.-सोबत जोडलेले कागद मी वाचु लागलो. १३२९ साली मोठ्या महंतानी काढलेले एक आज्ञापत्र होते ते. " आमच्या असे नजरेस आले आहे की तळासरीच्या महंतानी सुभेदार हैबतराव यांचे क्रियाकर्म आणि अस्थी विसर्जन तळासरीला करण्यात सक्रीय भाग घेतला आहे व घराण्याची परंपरा मोडली आहे. अशा प्रकारे महंताची वर्तणूक मठाला शोभणारी नाही. महंताचे वर्तन रीतिला धरून नाही. यापुढे असे वर्तन महंताकडून होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी नाहीतर कडक इलाज करावा लागेल." दुसरा कागद म्हणजे कुळांची यादी होती. त्यात रावजीच नांव शाईने अधोरेखित केले होते. म्हणजे भूतकाळात माझा प्रवेश ही एक सत्य घटना होती.

## प्रकरण सहावे

कपडे करून मी गॅरेजमधून गाडी काढली. कालच्या भूतकाळातील भेटीतील गढी वर्तमानकाळात कोठे बसते का याचा शोध घेण्याचा प्रयत्न होता माझा. नेहमीच्या रस्त्याने न जाता मी पठाराकडच्या आडवळणाने निघालो. पूर्वी भेटलेला एक गावकरी फाटकाशी उभा होता. '' काय सापडली का तुम्हाला तुमची गढी ? '' त्याने विचारले.

'' तसे काही फारसे सापडले नाही. विचार केला पुनः प्रयत्न करावा. एका हाकेच्या अंतरावर जरा उजवीकडे काहीतरी पडझड झालेली दिसते'' अंदाजाने उगवतीकडे हात करित मी म्हणालो. '' काय प्रकार आहे तो ?''

'' घराट म्हणात होय तुम्ही? पण तेथे तुम्हाला काही सापडणार नाही. फार पूर्वी शहाबादी फरशीची खाण होती ती. आता पडीत आहे.''

'' मग घराट का म्हणातात तिला?''

'' काय की बुवा? पण होम हवन असे काहीतरी तेथे चालत असे असे फार जुन्या काळापासून लोक बोलत आले आहेत.

त्याचा निरोप घेऊन मी पुनः खाणीजवळ आलो. गेल्या दोन तीन शतकापूर्वी इथेच कुठेतरी हैबतराव मरणोन्मुख अवस्थेत पडले असावेत. पुनः मनात तेच विचार येत होते. थोडा वेळ थांबून मी घरी परत आलो. वेळ जाण्यास काहीच साधन नव्हते. मी कालच्या प्रयोगाचे इतिवृत्त लिहून माधवला पाठवून दिले. कोणाचा फोन आला नाही की मी पण कोणाला फोन केला नाही. वेळ जात नव्हता. विचार चक्र चालु होतेच. रावजीच्या भावाने

कुप्या नष्ट केल्या की नाही. केल्या असल्या पाहिजेत नक्कीच कारण अस्थिविसर्जन तळासरीत झाल्याचा कगदोपत्री पुरावा माझे हातात होता. दुसऱ्या दिवशी सकाळीच माधवचा फोन आला. माझी न्याहारी सुरु होती. '' काय म्हणते तब्बेत? ''

'' फारच थकलो बुवा मी. काल रात्री झोप पण नीट लागली नाही. ''

'' हरकत नाही. दुपारी मस्त आरामात झोपून काढ. चांगले थंड असते कळवण. इथे मात्र खूप गरमी होते आहे''

''माझे पत्र मिळाले का''

'' हो. म्हणून तर फोन केला. तिसऱ्या प्रयोगाब- ल अभिनंदन. नंतरच्या परिणामाची फारशी काळजी करु नकोस. आणि त्याला तुच जबाबदार आहेस . मी तुला स्पष्ट बजावले होते की औषध घरातच घे. पण ऐकेल कोण?''

'' असेल असेल. पण नंतरच्या गोंधळाचे काय? ''

'' खरे आहे. मला पण मनाच्या गोंधळाचे आश्चर्य वाटते. एकदम भूत काळातून वर्तमान काळात येणे जरा गोंधळाचेच होणार नाही का? मला वाटत तुझ्या दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रयोगात एकदम ५-६ महिन्यांचा कालावधी गेला असावा. आठ दहा दिवस सुटी घेऊन तुझ्याबरोबर प्रयोग करावा असे वाटते. पाहु कसे जमत ते. ''

माधव येणार म्हंटल्यावर मला खूप बरे वाटले. पण लगेच वीणाचा विचार आला. मी तसे माधवला बोलून पण दाखवले. '' अरे इकडे तिकडे पाठवून दे त्यांना २-४ दिवस की झाले.''

'' जमणे कठीण आहे''

'' बर पाहु काय होते ते. पण मला तुझ्या इंदुमतिला पाहण्याची खूप उत्सुकता आहे. '' त्याच्या थट्टेने मला पण जरा बरे वाटले. '' ती आणि विलासराव चुलत भाउबहीण असावेत असे वाटते. ''

'' आणि इंदुमतीचे यजमान कालच्या प्रसंगी गैरहजर होते ना? ते मंजुळाबाईंचे नात्यातले दिसतात.''

'' तसे दिसते खरे''

'' मी अस करतो. हे सगळे उतरवून घेतो. माझ्या सहकाऱ्याला जुने दप्तर चाळावयाला सांगतो. पण आता तुझी खात्री पटली ना की तू भूत काळात खरेच जाऊ शकतोस म्हणून? औषधाचा खरच तसा परिणाम होतो. तु नक्कीच भूत काळात जातोस.''

तसे दिसते खरे. पण पुनः मनात संज्ञप्रवाहाची शंका येत असते. तू पाठवले कागद आधी तू वाचले असतील नंतर मी वाचले. म्हणजे तुझ्या वाचनात जे आधी आले ते मला नंतर प्रयोगात दिसले. तुझ्या संज्ञाप्रवाहाने हे होत नसेल कशावरून? बर त्या माकडाच्या प्रयोगाचे काय झाले.?''

'' माकड ! अरे हो! ते विसरलोच. त्याला मारावे लागले. त्याच्या मज्जतंतुवर काय परिणाम झाला याचा मला अभ्यास करावयाचा होता. तो कळावयला थोडा वेळ लागणार. इतका अधीर होऊ नकोस. ''

'' छे छे. अधीर वगैरे काही नाही. फक्त माझ्या मेंदुची केव्हा तपासणी करणार ते सांगून ठेव म्हणजे झाले. ''

'' अरे बाबा माकडापेक्षा तुझा मेंदु बराच सशक्त आहे. तुझ्यावर माकडा इतका परिणाम नाही होणार. पुनः इंदुमती आहे ना? वीणा नाही तो पर्यंत तिचा सहवास तुला नक्कीच आवडेल. ''

'' हे बघ . माझ्या वैवाहिक जीवनाशी याचा काही संबध नाही आणि तुझा पण नाही''

'' रागावलास. अरे जरा गंमत केली. मला खर तर असे सुचवावयाचे होते की दोन काळात वावरण्याने माणूस जास्त उत्साही होतो. तळासरीच्या खाणीत तू जाऊन पोचलास म्हणजे कोणाला तरी तेथे उत्खनन करावयाला सांगीतले पाहिजे.

या प्रयोगात माझा आणि माधवचा दृष्टिकोन अगदी वेगळा होता. तो या प्रयोगाकडे अगदी तटस्थ नजरेने पहात होता. मी मात्र त्यात पूर्णपणे गुंतून गेलो होतो. त्या काळातील लोकांशी माझे भावनात्मक तादात्म्य होत होते. भूत काळातील व्यक्ती त्याला निव्वळ बाहुल्या वाटत होत्या तर ती माणसे माझ्या जीवनाशी निगडीत वाटत होती. '' रावजीने तुला कधीच खाणीकडे नेले नाही का?''

'' छे छे. मी फक्त एकदाच कळवणचे बाहेर पडलो. आणि ते सुद्धा त्या मठापर्यंत. मी माझ्या मर्यादा काधीच ओलांडत नाही. बर प्रत्यक्ष भेटीत आपण सविस्तर बोलु. मी दोन

दिवस पुण्याला जातो आहे. बुधवार पर्यंत तुला भरपूर वेळ आहे. औषधाची मात्रा थोडी वाढवली तरी चालेल. काही धोका नाही''

मी फोन खाली ठेवला नाही तोच पुनः वाजला. यावेळी वीणा फोनवर होती. '' बराच वेळ फोनवर तुमचे बोलणे चालले होते. माधवशीच ना?''

'' हो . माधवचाच फोन होता''

'' हे बघा. नवीन काही कटकटी लाऊन घेऊ नका. उगीच नसती झंझट लाऊन घ्याल आणि मग बसाल हंतरूण धरून. तसे काही चालणार नाही हं मी आधीच सांगून ठेवते''

'' तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करित मी विचारल '' आज काय कर्यक्रम आहे तुमचा?''

'' मुले आज त्यांच्या मामाबरोबर राणीच्या बागेत जाणार आहेत. मग चौपाटीवर. इथे खूप उकडते आहे. तिकडे कसे आहे. ?''

'' इथ हवा कुंद आहे. पण गरमी नाही. तुमच्या करिता एक भाड्याची होडी पण बघून ठेवली आहे. मजा येईल मुलांना होडीतून खाडीत फिरायला.''

'' आणि मुलांच्या आईला? ''

एकंदरीत वीणाचा मूड सुधारलेला दिसत होता. '' मुलांच्या आईला पण मजा येईल पण बरोबर १-२ ओवामीनच्या गोळ्या ठेवाव्या लागतील इतकेच.''

'' तुमच्या बोलण्यावरून आम्ही खरच तिथे यावे अशी तुमची इच्छा दिसते''

'' मग मी काय खोट बोलतो का? तुम्ही कळवणाला येऊन मजा करू नये असे मला कसे वाटेल. फक्त तुमची अडचण होऊ नये म्हणून जरा ८ दिवस नंतर या असे म्हंटले. विश्वास बसत नसेल तर या लागलीच पण नंतर मात्र कटकट करु नकोस.''

'' कळले बरे. पण बुधवारी आम्ही नक्की येतो आहेत हं''

वीणाने फोन बंद केला. बुधवार पर्यंत तरी ही शांतता टिकणार होती. नंतर--- लॉनवर मुलांचे क्रिकेट चालु असणार. आऊट, नॉटआऊट याचा ओरडा. ती भांडणे. मधूनच वीणाचे ओरडणे. अहो ! जरा दटवा बर त्या दोघांना. सारखे भांडत असतात मेले. जरा दोन मीनटे शांतपणे खेळत नाहीत मेले. उच्छाद आणला आहे या कारट्यानी. वगैरे वगैरे. जेवण करतांना पण हेच विचार मनात घोळत होते. माझे जेवणात लक्ष नाही हे कालिंदीबाईंच्या पण लक्षात आले.'' तब्बेत बरी नाही का? ''

'' नाही नाही . तसे काही नाही. स्वयंपाक मस्त झाला आहे. पण आळशासारखे दिवसभर घरात पडून असतो ना म्हणून भूकच कमी लागते. ''

''खर आहे. हवा पण जरा पडलीच आहे. संध्याकाळी जरा गारवा येईल असे वाटते. ''

दोन-तीन पत्र लिहावयाची होती ती लिहून टाकली. करण्यासाखे काहीच नव्हते म्हणून माडीवर जाऊन पडलो जरा. पडलो कसला. चक्क गार झोपलो. पावसाच्या रिपरिपीने जाग आली. तेव्हा पाहाटेचे ४ वाजले होते. चक्क ९ तास झोपलो होतो मी. रात्रीचे जेवण झालेच नव्हते. कालिंदीबाई काय म्हणाल्या असतील? कोण जाणे. पण थकवा पार गेला

होता. स्वयंपाक घरात जाऊन ब्रेड लोणी आणि ग्लासात गरम दूध घेतले. भूक खूप लागली होती. अंगात भलताच उत्साह आला होता. पण पहाटे ५ वाजता कुठे जायचे अशा पावसात? त्याच जोशात मी प्रयोगशाळेत गेलो. जरा थोडा जास्तीच अे बाटलीतला डोस घेतला. '' चल रावजी दाखव तुझी करामत. आज कुठे जायचे बाबा'' जणू रावजी समोर आहे अशा अविर्भावात मी म्हणालो. मी तेथेच एका स्टुलावर बसलो होतो. मी खूप वेळ वाट पाहिली पण काहीच परिणाम नव्हता. माधवने डोस थोडा वाढवून घे म्हंटले होते. मी कदाचित पुरेसे औषध घेतले नसावे. मी पुनः थोडे औषध घेतले. प्रयोग शाळा बंद करून मी स्वयंपाकघरात आलो. दिवा लावला. बाहेर धूसर प्रकाश पडत होता. बाहेर माणसांच्या बोलण्याचा आणि पावलांचा आवाज येऊ

लागला. अरे कालिंदीबाई ,लवकर आल्या वाटते. गवत कापावयाला त्या त्यांच्या यजमानांना पण आणणार होत्या. मी पार विसरलो होतो.

तो दरवाजा लोटून आत आला. त्याने एका लहान मुलाला मागून ओढून आत ढकलले. त्या कालिंदीबाई नव्हत्या . तो रावजी आणि मठातील पोरगेलासा सन्याशी होता. बरोबर ५ नवीन चेहरे होते. खिडकीतून धूसर प्रकाश येत नव्हता तर बाहेर मिट्ट काळोख होता. मगाशी मी स्वयंपाक घरात ओट्याशी टेकून उभा होतो. पण माझ्या मागे आता ओटा नव्हता. फक्त दगडी भिंत. स्वयंपाकघराचे रुपांतर दिवाणखान्यात झाले होते. कोपऱ्यात शेकोटी होती. बाजूला वर जाण्याकरता जिना होता. पाऊलांचा आवाज ऐकून एक मुलगी

धावत खाली येऊ लागली. विश्वासरावांची बहीण असावी ती. बरीच मोठी झाली होती. धाकटा भाऊ पण खाली येत होता.

'' खाली यायचे काही काम नाही. इथल्या प्रकाराशी तुमचा काही संबध नाही. चला वरती पळा'' रावजी त्यांना दरडाउन म्हणाला. मुले ऐकत नाहीत असे पाहून रावजी पुनः दरडाऊन म्हणाला '' जाता की नाही वर? का मीच येऊ वर आता? '' मुले घाबरून वर जाऊ लागली. पण वर खोलीत न जाता तिथेच जिन्यात लपून  खाली काय घडते आहेत ते पाहु लागली. जवळचा टेंभा रावजीन भिंतीच्या  कडीत अडकवला. सन्याशाला ओढून बाकावर आदळले. ''बरोबर बोलता करतो बघा याला आता'' बाह्या वर सरसावत रावजी म्हणाला. तो पोरगेला सन्यासी पार भेदरून गेला होता. भीतीन थरथर कापत तो रावजीला म्हणाला '' देवा शपथ मला काही माहीत नाही''

'' ए पोरट्या ! शपथ वगैरे घ्यावयाचे काही काम नाही. '' त्याची मान आवळत रावजी म्हणाला '' बऱ्या बोलाने चटकन सर्व काही सांगून टाक . नाहीतर या टेंभ्यान चांगला भाजूनच काढीन तुला. '' टेंभा सरसावीत रावजी ओरडला.

मी जिन्याकडे पाहिले. डोळ्यात प्राण आणून पोरे खाली घडणारा प्रकार पाहत होती. डोळे भीतिने ताठरले होते.

संन्यासी पार घाबरून गेला होता. '' नका, नका मारु मला. सगळे सांगतो मी पण आधी माझी मान सोडा''

'' आता! अता कसा वटणीवर आला. बोल मोठे महंत आणि आपले महंत यांच्यात काय बोलणी झाली?''

'' मोठे महंत म्हणत होते की महंताचे वागणे बरोबर नाही. मठाचा पैसा ते उधळून टाकत आहेत. सरदार जानकोजीरावांना सांगून ते महंताचा बंदोबस्त करावयाला सांगणार आहेत. ''

'' बरोबरच बोलले मोठे महंत'' जमलेल्या पैकी एक जण म्हणाला '' हा मठ नाहीतरी बंदच केला पाहिजे. आमच्या जमीनी बळकावल्या आहेत या संन्याशांनी आणि सोदे चांगले पोसले आहेत.''

रावजीने हात छातीशी घेत आणि सन्याशाला पायाने डिवचत म्हंटले '' मोठे महंत थोडीच मठ बंद करु शकतात. ते फक्त सल्ला देऊ शकतात. मठाचा बंदोबस्त फक्त पेशवेच करु शकतात. मठ आपल्या सुभेदार साहेबांच्या अखत्यारीत येतो. काय त्रास आहे आपल्याला सुभेदारापासून? आपण सुभेदारांचे कूळ. आज मठाने केला तर आपला फायदाच केला आहे. यवनांच्या बोटी किनाऱ्याला लागल्या की कसे पाय लाऊन पळत सुटता तुम्ही !. तुमच्या सर्वांच्या तळघरात रोज नवीन भर पडतेच आहे ना?''

कुणीच काही बोलले नाही. पोरगा सुटका झाली असे समजून पळ काढु लागला. त्याचा पुनः गळा आवळत रावजी दरडावला '' पळतोस कुठे? अजून तुझे काम झाले नाही. बोल सरदार बोरगावकर मोठ्या महंताना काय म्हणाले?''

'' सांगीतले तेवढेच मी ऐकले. मला खरच आणखी काही माहीत नाही. ''

'' सातारकरांच्या बाबत काहीच बोलण झाले नाही?'' पलीत्याला हात घालत रावजी ओरडला.

''  नको, नको सांगतो मी . बोरगावकर म्हणाले की आज काल छत्रपती आणि ताराबाई यांचे जमत नाही. कुरबुरी बाहेर यावयाला लागल्या आहेत. पेशव्याच्या मध्यस्थीचा काही उपयोग होईल असे दिसत नाही. कोण कुणाची बाजु घेतो यावर बरेच अवलंबून आहे''

'' वाटलेच मला. जा त्या कोपऱ्यात जाऊन चुपचाप बस. आणि दुसऱ्या कोणाशी बोललास तर याद राख. खांडोळीच करून टाकीन. काय समजलास!''

रावजीने इतर पाच जणांकडे रोखून पाहिले. कानवर जे पडले त्यामुळे सर्वच स्तंभित झाले होते. '' मग तुमचा काय विचार आहे?'' रावजी म्हणाला.

'' आमचा कसला विचार असणार! छत्रपती व ताराबाई यांना आपसात काय भांडायचे ते भांडून द्या. आपला काय संबध?'' एकजण तुकडोजी म्हणाला.

'' अस्स. ताराबाई  जर सत्ताधीश झाली तर या भागात बऱ्याच जणांना नक्कीच आनंद वाटेल नाही?''

'' तसे ही असेल. पण आपले सुभेदार विश्वासराव अद्याप अज्ञान आहेत. ते छत्रपतीविरुद्ध बंड पुकारतील असे काही वाटत नाही. आमचे काय ! ज्या बाजूला यशाची खात्री आहे ती बाजु घ्यावयाला आमची काहीच हरकत नाही. पण असा पुढाकार घेणारा कुणी सरदार आहे?''

'' बोरगावकर सरदार'' रावजी गंभीरपणे म्हणाला.

'' तसे असेल तर ठीक. पण हवाला काय? आणि आमचा फायदा काय? कोणीतरी जबाबदार आसामीने तसा शब्द द्यावयाला हवा. '' सगळ्यांकडे पाहत तुकडोजी म्हणाला. सर्वांनी तुकडोजीच्या बोलण्याला मान हालवून संमती दिली.

'' हवाला खु- सरदारसाहेबच तुम्हाला देतील. त्याची होडी खाली किनाऱ्याला लागली आहे. मी त्यांचीच वाट पाहत आहे''. जिन्याशी जाऊन रावजीने धाकट्या भावाला हाक मारली. मागच्या वेळचाच तरूण झटकन वर आला.

'' हा पलीता घेऊन जा आणि सरदारसाहेब कुठपर्यंत आले आहेत ते पहा''

तरुणाने पलिता उचलला आणि पळत बाहेर गेला.

'' रावजी! पण या सर्व प्रकरणात तुझा काय हेतु आहे ते मात्र समजत नाही. जानकीबाईसाहेब पण सरदारसाहेबांची बाजु घेणार का? '' रावजीकडे पाहत तुकडोजीने विचारले.

'' आमच्या बाईसाहेबांचा यात काही संबंध नाही. आणि त्या सध्या गढीवर पण नाहीत. सरदारसाहेबांच्या कबिल्या बरोबर त्यांचा सध्या जैतपूरला मुक्काम आहे. किती जोखमीची ही मसलत आहे याची त्यांना काहीच कल्पना नाही''

'' जोखीम तर जीवाचीच आहे. काही कमीजास्त प्रकार घडला तर जानकीबाई साहेब तुला कधीच क्षमा करणार नाहीत. सरदार साहेबांशी त्यांचे म्होतुर झाले असते तर बरे झाले असते, पण त्याच्या मंडळींची अडचण आहे ना!'' तुकडोजी म्हणाला.

" कुणी सांगावे. सगळ नीट जुळून आले तर सरदारसाहेबांची अनुपस्थिती फारशी कुणालाच जाणवणार नाही. " छद्मीपणे हासून रावजी म्हणाला.

" खरच रावजी. तुझ्या सारखा पाताळयंत्री माणूस दुसरा पाहिला नाही. दोन्ही दगडीवर हात ठेवून शेवटी आपला फायदा लाटण्यात तुझी कोणी बरोबरी करणार नाही"

" कसे बोललास? " रावजी आढ्यतेन म्हणाला " माझ ऐकल तर कुठल्याही परिस्थितीत तुमचा फायदा केल्याशिवाय राहणार नाही. " बाहेर पावलांचा आवाज झाला. लगबगीने रावजीने दरवाजा उघडला. " यावे महाराज. सर्व आपलेच लोक आहेत."

बोरगावकर सरदारांनी गंभीरणे खोलीत प्रवेश केला. सगळ्यांकडे तीक्ष्ण नजरेंने पाहत विचारले " रावजीने तुम्हाला सगळे सांगीतले आहे ना? मग काय विचार ठरला?"

" आम्ही सगळे सरदारसाहेबांच्या आज्ञेत आहोत. काय करावयाचे तेवढा हुकुम करावा"

" शाब्बास! माझी तुमच्याकडून हीच अपेक्षा होती. आपण सर्वांनी आता त्वरेने साताऱ्याकडे कुच केले पाहिजे. रावजी घोडी तयार आहेत ना? प्रथम आपण पिराजी जाधवांच्या वाड्यावर जाऊ. तिथे माणसांची आणि हत्यांरांची जमवाजमव झाली आहे. वेळ दवडून मुळीच चालणार नाही. पेशव्यांना सुगावा लगण्याचे आधीच आपण डाव साधला पाहिजे. कसेही करून आपण छत्रपतींना ताब्यात घेतले पाहिजे. सगळे ठीक झाले तर आपला सर्वांचा भविष्यकाळ उज्वल आहे. "

हर हर महादेव ची गर्जना करित सर्व पागेकडे धावले. घोडी जीन घालून तयार होतीच. सर्व जाधवांचे वाड्याकडे त्वरेने सुटले. मलाही त्यांचे बरोबर जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. मी आता त्यांच्यातलाच एक झालो होतो. वास्तवात पण कधी कुठल्या प्रसंगाशी इतका एकरूप झालो नव्हतो.विचित्र म्हणजे त्यांना माझ्या अस्तित्वाची काहीच जाणीव नव्हती. त्यांचे पाठोपाठ  मी पण जाधवांचे वाड्यावर पोचलो. घाईघाईने घोड्यावरून उतरून रावजी दरवाजाशी गेला. तोच एक इसम दार उघडून बाहेर आला. पलित्याचे उजेडात मी त्याला लगेच ओळखले. मठात रावजीशी हाच माणूस गप्पा मारीत होता. दोघांत काहीतरी कुजबुज झाली. बातमी वाईट असावी असे त्याचे चेहऱ्यावरून दिसले. सरदार साहेबांना पण तोच संशय आला  असावा. रागावुनच त्यांनी विचारले '' काय जाधवांची तयारी झाली की नाही? हत्यारे तयार ठेवा म्हणाव. किनाऱ्याशी आमची माणसे खोळंबून बसली आहेत. ''

महाराज जरा बाजूला यावे. खबर चांगली नाही'' रावजी म्हणाला.

एका बाजूला जात सरदार साहेबांनी उतावीळपणे विचारले '' काय ते चटकन सांग''

'' घात झाला महाराज. आपल्यावर पेशव्यांनी कुरघोडे केली. छत्रपतींना ताब्यात घेऊन पेशव्यांनी ताराबाईंना नजरकैदेत टाकले आहे. डाव फसला महाराज. प्रत्यक्ष इंदुमती बाईसाहेबच खबर घेऊन आल्या आहेत. बाईसाहेब सातारलाच होत्या. सुगावा लागताच कळवणला जाताना मु-ाम वाकडी वाट करून तुम्हाला सावध करण्याकरिता त्या इथे आल्या आहेत. खरे तर त्या एव्हांना कळवणला पोचायला हव्यात. मागून कुडतोजीराव येत आहेत. त्यांना जर बाई साहेब इकडे आल्याचे कळले तर मोठा बाका प्रसंग ओढवणार आहे. ''

'' बाईसाहेब कुठे आहेत?

''मेणा खाजगीकडे उभा केला आहे. इकडे यावे महाराज. ''

आम्ही मेण्याजवळ गेलो तोच इंदुमतीन बाहेर डोकावून पाहिल. '' देव पावला म्हणायचा. मी वेळेवर पोचले तर. तुमची गाठ पडते की नाही याची मला धास्ती वाटत होती. इकडची स्वारी आणि मुले मागाहून येत आहेत. त्याच्या कल्पनेप्रमाणे मी कळवणला सरळ पोचले असेन असे ते समजून असतील''

'' केवढा मोठा धोका पत्करलात तुम्ही? कशा करिता?''

'' हे काय सांगावयलाच हवे का? '' रोखून पहात त्या म्हणाल्या '' चला वेळेवर तुम्हाला निरोप देता आला आता सुटले '' मागचे लोक येण्यापूर्वी मी कळवणला पोचले म्हणजे झाले''

पण धोका टळला नव्हता. मागून घोड्याच्या टापांचा आवाज अगदी जवळ येऊ लागला होता. त्यांना कसा तो ऐकु येत नाही म्हणून मी त्याच्याकडे पाहिले तर तिथे कोणीच नव्हते. चांगले  उजाडले होते. पसाऱ्याला सोडलेली गुरे फाटकाशी उभी होती.मी एका घराच्या फाटकाशी उभा होतो. गुराखी फाटक उघडून आत येत होता. मी आडोशाला लपण्याचा प्रयत्न केला पण गुराख्याने मला पाहिलेच. त्याच्या नजरेत ओळख आणि आश्चर्य ओतप्रोत भरले होते. माझा अवतारही तसाच होता. कपडयातून पाणी ठिपकत होते. जागोजागी चिखल लडबडला होता. कसेबसे हसत मी म्हंटले '' अगदी अवतार झाला आहे नाही माझा?''

'' लईच फोफाटले दिसते पावसाने तुम्हाला! कोपऱ्यावरच्या मोठ्या घरात राहायला आलात नव्ह? असु द्या असु द्या. शिंद्याना भेटायला आलात जणु.''

'' नाही नाही. मी जरा लवकरच उठलो. म्हटले जरा फिरून यावे तो पावसाने गाठले आणि वाट चुकलो. ''

'' वाईच थांबा.  एवढी गुर दावणीला बांधतो आणि येतोच. मला पण तिकडेच जायचे आहे. आता आलो बगा.'' गुराखी तातडीन परत आला. त्याचे मागोमाग मी जाऊ लागलो.

'' एवढ्या पावसात फिरायला गेला म्हणजे कमालच आहे. रात्रभर कोसळतो आहे नुसता''

'' पाहटे पावसानेच मला जाग आली. आणि पावसाचे आम्हा मुंबईकराना काही वाटत नाही. बोलत बोलत आम्ही घराजवळ  येऊन पोचलो. '' पाहुणे आलेले दिसतात'' गुराखी म्हणाला.

खरेच की. घराजवळ आमची फियाट उभी होती. रात्रभर प्रवास करून वीणा सकाळीच पोचली होती. त्यांना चुकवून आत जाणे शक्य नव्हते.पोरे धावतच बाहेर आली. '' बाबा केव्हांचे आम्ही दार ठोठावतो आहे!. पण कुणी दार उघडतच नाही. आई जाम रागावली आहे''

'' मी पण जाम रागावलो आहे. इतक्या भल्या पहाटे मी तुमची अपेक्षाच केली नव्हती''

'' आम्ही तुम्हाला सरप्राईज करणार होतो. आईला वाटले जरा तुमची मजा करावी. मी रात्रभर झोपलो नाही. सारखा नकाशा पाहून आईला रस्ता सांगत होतो. छोटु मात्र मागच्या सीटवर गाढ झोपला होता''

गाडीचे दार उघडून वीणा बाहेर आली. रात्रभर प्रवास केल्याचे कसलेही चिन्ह तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हते. प्रवासी पोषाखात अगदी फेश दिसत होती. माझ्या अवताराकडे पाहून ती थबकून उभी राहीली.मला काही बोलणे शक्यच नव्हते. मी नुसता केविलवाण हसत पाहत उभा राहीलो. तरी पण म्हणालो,'' एवढा रात्रभर प्रवास करून येण्याची काय गरज होती?''

'' मला नका विचारु. या पोरांनाच विचार. नुसते भंडाऊन सोडले होते मेल्यांनी''

'' किती वेळ झाला तुम्हाला येऊन?''

'' अर्धा तास तरी झाला. घराभोवती पूर्ण चक्कर मारुन आलो. दार ठोठावून दमली मुले. शेवटी वरच्या खिडकीवर दगड मारणार होती . होतात कुठे तुम्ही? अगदी भिजून चिंब झाले आहात''

''सकाळी जरा लवकर जाग आली. करमत नव्हते म्हणून फिरायला गेलो होतो''

'' कम्माल आहे बाई तुमची. एवढ्या पावसात काय फिरायला जातात. आणि शर्टाला केवढा खोचा पडला आहे? पँट पण फाटलेली दिसते. चिखलात घसरून पडलाबिडलात की काय?'' वीणाने हसून विचारले.

मुले पण जोरजोरात हसत फेर धरून नाचु लागली. कसा तरी मी त्यांचा गोंधळ थांबवला. '' इथेच पावसात भिजत राहणार आहात की घरात जाणार आहात. चला पटकन गाडीत बसा. वीणा गाडी मागच्या गल्लीत घे. समोरचे दार बंद आहे'' मागचे दार पण बंद होते.मी घराच्या जुन्या स्वयंपाकघरातून बाहेर पडलो होतो. स्वयंपाकघर तळघरात प्रयोग शाळेला लागून होते. मुले माझे पाठोपाठ  तळघरात उतरली पुनः वर चढून सध्याचे स्वयंपाक घरात आलो आणि समोरचे दार उघडले. वीणा दाराशी ताटकाळत उभी होती. '' पावसात भिजत उभी राहु नकोस. चटकन आत ये. आम्ही सामान आत आणून टाकतो.

'' सामानाचे राहु द्या हो. आधी मला घर पाहु द्या. पाहु तरी काय पसारा आहे तो?'' खाली जाणाऱ्या जिन्याकडे तोंड करून म्हाणाली '' खाली स्वयंपाकघर आहे वाटते?''

'' नाही ते जुने स्वयंपाकघर आहे. आता वापरत नाहीत. खरे म्हणजे ते थोडे उशीरा आले असते तर मी अगदी बेंड बाजा लाऊन त्यांचे स्वागत केले असते. असे उलटीकडून घर दाखवणे बरोबर नव्हते.

'' बाबा! आमच्या खोल्या दाखवा न. आम्हाला सेपरेट खोल्या आहेत ना !''

'' अरे थोडा धीर धरा ना. काय गोंधळून टाकले आहे मला?''

हसत हसत वीणा म्हणाली '' त्यात गोंधळण्या सारखे काय आहे. मला पण घर पाहण्याची खूप उत्सुकता आहे.

अरे बाप रे! आता रावजी हजर असता तर त्याने इंदुमतीबाईला काय पद्धतशीर घर दाखवले असते नाही? मला खरेच काही सुचत नव्हते. गोंधळ्यासारखे खरेच झाले होते.

'' अहो! लक्ष कुठे आहे तुमचे? '' काही नाही जर थकल्यासाखे वाटते आहे बस. चला आपण वर माडीवर जाऊ. ती वापरात आहे. स्वयंपाकघर पण वरच आहे. '' स्वयंपाकघरात माझे सकाळच्या न्याहरीचे अवशेष पडले होते. '' आश्चर्य आहे! आजकाल काय स्वतःच स्वयंपाक करून घेता वाटत? नवलच आहे बाई एक एक पाहते ते!''

''तसे नाही. सकाळी खूप भूक लागली होती म्हणून टोस्ट आणि दूध गरम करून घेतले. चला समोरच्या दिवाणखान्यात जाऊ. '' घराचा फेरफटका संपला. थोड्या वेळाने कालिंदीबाई पण आल्या. दोघींचे आपापसात बोलणे सुरु झाले. मी काढता पाय घेतला. आजचा अनुभव निवांतपणे लिहीत बसणार होतो. तोच वीणा येऊन थडकली. '' चांगल्या आहेत हो बाई. वाटले होते तशी कुणी ढालगज भवानी दिसत नाही. चला म्हणजे माझ्या मागची स्वयंपाक पाण्याची कटकट मिटली.''

'' मग मी सांगीतले नव्हते तुला की कालिंदीबाई चांगल्या आहेत म्हणून''

'' हो ,ना! म्हणूनच मला जरा शंका आली होती. ''

'' शंका फिटली ना! की अजून काही शिल्लक आहे ? ''

'' चला ,भलतेच काही तरी. चांगले मायेने करतील पोरांचे. आताच पाहा ,न काय गप्पा मारण्यात रमली आहेत. रात्रभर प्रवास करून दमले आहे अगदी. जरा पडते थोडावेळ''

प्रवास करून सर्वजण खरोखरच दमले होते. जेवण करून सगळ्यांनी चांगली ताणून दिली. सगळ घर अगदी शान्त होत. चारच्या सुमारास मी वीणाच्या खोलीत डोकावून पाहिले. बाईसाहेब गाढ झोपल्या होत्या. उठण्याचे चिन्ह दिसत नव्हते. मग मुले आणि मीच

समुद्रावर चक्कर मारून आलो. कालिंदीबाईनी चहा बरोबर खाण्याचे पण बरेच केले होते. दिवाणखान्यातली फर्निचरची रचना पण बदलली होती. दिवसभर जरा देखील मला विश्रांती मिळाली नव्हती. जरा पडावे म्हणून मी माझ्या खोलीत गेलो तोच मुले ओरडत आली. '' बाबा बघा आम्हाला काय मिळाले तळघरात ?''. त्याच्या हातात माकडाची कवटी होती. सकाळच्या गडबडीत मी प्रयोगशाळेला कुलुप लावायला विसरलो होतो.

'' पुनः त्या खोलीत पाय टाकला तर याद राखा. तंगडच मोडून टाकीन'' जोराने ओरडत मी म्हणालो. कवटी हिसकाऊन घेतली. मुले हिरमुसली झाली. रडु लागली.

'' कमाल आहे तुमची. राहावयाच्या घरात तुमचा मित्र अशा विचित्र वस्तु ठेवतोच कशा? आणि तुम्हाला पण इतक संतापायला काय झाले. गेली असतील मुले जरा इकडेतिकडे. इतके घाबरण्यासारख काय आहे त्यात? कुणाला वाटेल वाघाचे दारच उघडले पोरांनी''

'' तुला काय ठाऊक? काय भयंकर वस्तु आहेत तिथे? वाघापेक्षा ही भयंकर''

'' येवढे जर आहे तर मग कुलुप लाउन ठेवावी ''

'' चुकलो बाबा. आता पुनः असे नाही होणार. स्वतःच्या मूर्खपणाला बोलणी लावत मी खाली जाऊन प्रयोग शाळा बंद केली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच वीणाने तळासरीच्या मंदिरात जाण्याचा बुट काढला. मुले मंदिरात वगैरे जावयाला तयार नव्हती. पण इलाज नव्हता. कुरबुरत बिचारी तयार झाली. मुलांचे मनावर चांगले संस्कार झाले पाहिजेत म्हणून देवळात, प्रवचनाला,

व्याख्यानांना मुलांनी गेलेच पाहिजे असे वीणाचे ठाम मत होते आणि माझ्या मताला काहीच किंमत नव्हती. फक्त मी गेलेच पाहिजे असे नव्हते. मंदिराच्या दााराशीच मी मंडळींना सोडले. '' तुम्ही काय करणार आहात इतका वेळ?'' वीणान विचारले. '' मी काही मंदिरात येत नाही. तुम्हाला तासभर तरी नक्किच लागेल. मी जरा भटकून येतो''

गाडी मी घराच्या दिशेने वळवली. खाणीच्या जवळ गाडी पार्क केली. एका दगडावर बैठक मारली. वीणा मुलांची तयारी करण्यात गुंतली होती तेवढ्यात मी शिशीत डोस भरून घेतला होता. थोडा जास्तच होता. कारण लागलीच परिणाम झाला.

मी गढीत होतो.

## प्रकरण सातवे

उन्हाळ्याची उतरती दुपार होती. दोन लहान मुले जमीनीवर बसून सौंगट्या खेळत होती. खेळता खेळता कशावरून तरी बिनसले आणि हाणामरी सुरु झाली. गोंधळ पाहून रावजी समोर झाला. माझ्या मागेच उभा होता तो . दोघांची समजुत घालून त्याने त्यांचा खेळ मार्गी लावला आणि त्यांचा खेळ पाहत थोडा वेळ उभा राहिला. थोड्याच वेळाने मुलांना आतुन बोलावणे आले.आणि नाराजीने खेळ सोडून मुले आत गेली. रावजी आणि मी दोघेच त्या दालनात होतो. मी सभोवार पाहिल. हैबतराव गेले तेव्हा आणि आता त्या दालनात खुपच फरक पडला होता. सगळ कसे मोकळे,मोकळे वाटत होते. रावजी एका गवाक्षाजवळ गेला आणि चटकन आड दडला व चोरून बाहेर पाहु लागला. मी पण त्याचे मागोमाग होतोच. गवाक्षाचे समोरच उद्यान होते. उद्यानात एका बैठकीवर इंदुमती आणि

बोरगावकर सरदार बसले होते. त्यांचे बोलणे इथपर्यंत स्पष्ट ऐकु येत होते. सरदारसाहेब इंदुमतीची कसली तरी समजुत घालत असावेत.

" खर म्हणजे अजून एक दिवस मुक्काम करायचा माझा विचार होता. पुनः ओहटीचा काही भरवसा नाही. मध्येच अडकुन पडावे लागेल. ''

'' ओहटी भरतीचे काही निमित्त करु नका. आज का तुम्ही होडीतून प्रवास करता आहात? तुमचे जास्ती दिवस राहणे बरे दिसत नाही. लोकांच्या नजरेत येते. खरे म्हणजे तुमचे सारख येणे चांगले दिसत नाही. लोक काय म्हणतील?''

'' लोक काय म्हणणार? पूर्वी पण कामानिमित्त मी येत होतोच ना? आताच आलो म्हणून काय झाले ? नेमके तू इथे असणे हा केवळ योगायोगच''

'' हा योगायोग नाही हे तुम्हाला नक्की माहीत आहे. रावजीनेच तुम्हाला माझा निरोप दिला म्हणूनच तुम्ही आलात ना?''

'' रावजी अगदी विश्वासु आहे. मुले आणि जानकीबाई तळासरीला आहेत. तेंव्हा इकडे येण्यात धोका कसला?''

'' धोका नाही हो! पण त्या रावजीची मला काही खात्री वाटत नाही. कारण तुम्हाला सांगावयाला नकोच''

'' हैबतरावांचे मृत्युब- लच ना? पण मला अजून वाटते तुझा त्याच्या ब- ल जरा गैरसमजच झाला आहे. हैबतरावांचे वय झालेच होते. त्यात आणि तो जीवघेणा आजार.

त्यांना मृत्यु सुसह्यच झाला असावा. आणि तू म्हणतेस तसे काही काळबेर असलेच तर त्याला जानकीबाईंची फुसच असावी. आपण कशाला विनाकारण डोक शिणवावे?''

'' जानकीबाई जरी तुमची बहीण असली तर त्यांची जर फुस असली तर मी त्यांना कधीच क्षमा करणार नाही. आणि रावजीचे म्हणाल, तर त्याला भरपूर पैसा चारला असावा''

मी रावजीकडे पाहिल. तो जागेवरून तसूभर हलला नव्हता. पण त्याचे चेहऱ्यावरून त्याला इंदुमतीबाईचे बोलणे खुपले असावे असे दिसत होत.

'' आपण निघाव आता. जानकीबाईंची पण काळजी घ्यावी. जानकोजीरावांशी त्यांचे म्होतुर होणे जरा कठिणच दिसते. तुम्ही पण जरा जपूनच असावे. तिच्या मार्गात आडवे आला तर ती खपवून घेणार नाही''

'' मी कशाला तिच्या मार्गात आडवा येऊ? करु दे तिला काय करावयाचे ते. ''

'' कमीतकमी जरा समजुत तरी घालण्याचा प्रयत्न करावा म्हणते. बहीण आहे ना तुमची! हो आणि त्या स्वामीपासून पण सावध असावे एवढे तरी तिला जरुर सांगावे''

'' रावजीला तशा सुचना देऊन ठेवतो''

'' रावजी! तो पण त्या स्वामीच्या अगदी कह्यात आहे''

पुनः मी रावजीकडे पाहिले. तो अगदी ढिम्म उभा होता. कोणीतरी त्याला बोलवावे, त्याने इथून निघून जावे असे मला सारख वाटत होत. इंदुमतीच बोलणे रावजीच्या कानावार पडावे हे मला बरोबर वाटत नव्हते. मला तिची फार काळजी वाटु लागली.

'' तुझे आपले काहीतरीच. मागल्या उठावाचे वेळी रावजी माझ्याशी अगदी एकनिष्ठ होता. मला त्याचा विश्वास वाटतो. ''

'' एकनिष्ठ ! चुकता आहात आपण. तुमच्या बाजुला राहण्यातला फायदा त्याने ओळखला होता त्यावेळी पण आता तुमची बाजु घेण्यात त्याला काहीच फायदा नाही. इकडच्या कानावर एक शब्द जाण्याचा अवकाश मग बघा काय होते ते?''

'' उत्तमराव पुण्यालाच आहेत ना? ''

'' म्हणून काय झाले? बातम्या फार लवकर आणि लांबवर पसरतात.मी मेले काय आणि जिवंत असले काय त्यांचे लेखी काही फरक पडत नाही. पण इभ्रतीचा प्रश्न आला की मात्र ते खवळणारच. अग बाई बोलण्यात वेळ कसा गेला समजलेच नाही. अंधारुन आले की! मुलांना आज वाड्यावर पाठवायचे आहे. केव्हाही ती इथे येतील''

'' रावजी आहे ना सोबतिला?''

'' म्हणून काय झाले? वेळीच गेलेली बरे. स्वतःला संभाळून असावे'' आत मधे वळत इंदुमतीबाई म्हणाल्या.

रावजी चपळाई करून पागेकडे पळाला. रावजीचा भाऊ घोड्यांवर जीन कसत होता. मघाचीच मुले आजुबाजुला हुंदडत होती. इंदुमतिने दटाऊन मुलांना घोड्यावर बसवले. '' ''रावजी मुलांना संभाळून ने रे बाबा'' येवढ बोलून इंदुमती आत वळली.

रावजी आणि पोर पठाराच्या वळणावरून नजरेआड होईतोपर्यंत मी व इंदुमती त्यांचेकडे पहात होतो. तोच माझे मागे कचकन ब्रेक दाबण्याचा आवाज झाला.

'' केंव्हाचा हॉर्न देतो आहे. बहिरा आहेस वाटत? '' ड्रायव्हरने बाहेर डोके बाहेर काढून विचारले. मी मंदिराजवळच्या रस्त्यावर उभा होतो. रागाने माझ्याकडे पाहत ड्रायव्हरने गाडी पुढे नेली. मी घड्याळात पाहिले. वीणाला आणि मुलांना मंदिरात सोडून तीन तास झाले होते. माझी वाट पाहून सर्व घरी निघून गेली असावीत. प्रथम मंदिरात पाहिले. कोणीच नव्हते. घरी येऊन गाडी गॅरेज मध्ये लावली आणि दाराची बेल वाजवली. कालिंदीबाईंनी दार उघडले. आश्चर्यान माझ्या कडे पाहत म्हणाल्या '' बऱ्याच वेळ तुमची वाट पाहुन सगळ्यांनी जेवणे उरकून घेतली. हात पाय धुवा. तोपर्यंत मी अन्न गरम करून वाढते. गाडीने घोटाळा केलेला दिसतो.फार थकलेले दिसता''

'' नाहीतर काय? ऐन वेळी चाक पंक्चर झाले.नसता वैताग'' हात पाय धुऊन मी स्वयंपाकघरात गेलो. मुले आणि वीणा जेवण झाले तरी टेबलावरच बसून होते.

'' सारी हं वीणा. गाडीने सगळा घोटाळा केला. तुम्हाला नसता त्रास झाला''

मुले चुपचाप उठून गेली. '' आम्हाला नाही, तुम्हाला त्रास झालेला दिसतो. आमच्या मुळे तुमचा सगळा दिवस खराब गेलेला दिसतो. '' रागाने माझ्याकडे एक तारेचा कागद भिराकाऊन विणा म्हणाली. तार माधवची होती. '' या प्रयोगात यश मिळो. आवडत्या माणसाची गाठ पडो''

रागाने दार लोटून वीणा चालती झाली आणि स्वयंपाकघरातून कालिंदीबाईंनी ताट वाढून आणले.

रुसलेल्या बायकोला खूश करण्याकरिता काय काय करावे लागते हे काय तुम्हाला सांगावयाला हवा !. त्यामुळे वेळ न दवडता येवढेच सांगतो की बऱ्याच प्रयत्ना नंतर वीणाची कशीबशी समजूत घालण्यात मी यशस्वी झालो. माधवची ही एक जोक आहे. त्यात तसा काही अर्थ नाही. मी कोकणात खूप वर्षाने येतो आहे. माधवची गाठ पडली की रुजवात करून देतो. वगैरे वगैरे. असो . माझ्या बोलण्याचा परिणाम झाला आणि बाईसाहेब संध्याकाळी समुद्रावर भटकायला तयार झाल्या. मुले वाळूत खेळत होती. आम्ही दोघ एका माडाला टेकून बसलो होतो. दूरवर कुठे तरी काल रावजी आणि मुले घोड्यावरून जात असावीत. कुठे जाणार होती देव जाणे. बोरगावकर मात्र पक्का लंपट दिसतो. वाडा म्हणजे कुठला? मी माझ्याच विचारात गर्क होतो.

'' अहो! कसला विचार चालला आहे येवढा. विचार करताना की नाई तुम्ही वेगळेच दिसता. जणु काय इथे नाही असेच वाटते.''

''खरे म्हणजे मी इथे नव्हतोच. जवळपास ४ मैलावरून घोड्यावरून जाणाऱ्या मुलांचा मी विचार करित होतो. ''

'' कुणाची मुले? आणि घोडे कुठले? कुठे चालली होती?''

''कोणातरी पाटलाची असावीत. मोठी गोजीरवाणी होती. बरोबर नोकर आणि मोलकरीण पण होती. घोडे म्हणशील तर त्यांचे स्वःचे किंवा भाड्याने घेतलेले असतील. सहज गम्मत म्हणून रपेट करित असतील.''

'' गंमतच आहे. मुलांना घोड्यावर बसावयाला खूप आवडेल. जरा चौकशी करा. काही तरी वेगळे करावयाला त्यांना फार आवडेल. सगळे काय घोड्यावरच होते का?''

'' नाही मुले आणि मोलकरीण घोड्यावर होती आणि नोकर लागाम धरून चालत होता''

'' अहो! मग इथे जवळच कुठे घोडदौड शिकवण्याची शाळा असेल. खरच चौकशी करावयाला हवी.''

एकंदरीत दिवस फार छान गेला. माधवच्या तारेने केलेला घोटाळा मी निस्तरला होता. दिवसभर हुंदडल्यावर सर्व रात्री लवकरच झोपून गेले.

दुसऱ्या दिवशी मी सकाळीच बोट सांगून ठेवली होती. हवा पण छान होती. नावाडी वल्ही मारत होता. मुले पाण्यात हात घालून मासे पकडण्याचा प्रयत्न करित होती. इथेच जवळ पास कुठेतरी विलासरावांची वाडी असावी. काल त्या पोरांचे पाठोपाठ गेलो असतो तर नीट पत्ता लागला असता. माझ्या विचाराने मला धक्काच बसला. पुनः काळाची मी गल्लत करित होतो. काल मी त्या घोड्यांची गडबड करून ठेवली होती. वीणा पुनः मला त्याब-्ल छेडणार हे नक्किच.  हे मनात येत नाही तोच वीणाने विचारलेच '' अहो ! मी कालिंदीबाईंना विचारले घोड्याब- ल. इथे आजुबाजुला घोडी कुठेच नाहीत. तुम्हाला कसे दिसले. नवलच आहे बाई!''

'' मग कुठली तरी सर्कस आली असेल. ''

'' नाही हो! सर्कस पण नाही आली आहे. ''

'' एवढे घोडे घोडे काय करित बसली आहेस? चांगली बोटीतून फिरते आहेस तर मजा करावयाची सोडून बसली आपली घोडे घेऊन'' मी जरा चिडूनच म्हणालो.

वीणाने माझ्याकडे नीट निरखून पाहिले. '' फार लवकर चिडता तुम्ही आजकाल. इथे आल्यापासून पाहते आहे तुम्ही खूप बदलेले दिसता. काही होताय का तुम्हाला? पुढे काय करावयाचे याची काळजी का लागली आहे. अरे हो! एक सांगावयाचे राहिले. काल बंडुचा फोन आला होता. बडोद्याला तो कामाकरिता जातो आहे. मुंबईला एक दिवस मोकळा आहे. त्याला म्हंटले इथेच ये एक दिवस मग. त्याने यावयाचे कबूल केले आहे. उद्या सकाळीच येईल तो. बरोबर त्याची बायको पण आहे. तुम्हाला छान कंपनी पण होईल. आणि भागीदारीचे पण काय ते नीट ठरवून घ्या''

बापरे! हिचे बंधुराज आणि त्यांची बायको उद्या येणार. मला कल्पना नव्हती पण माधवच्या औषधाने लोकांना जाणवेल इतका माझ्यात फरक पडला होता. बंडु तर धंदेवाला माणूस. ता वरून ताकभात ओळखणारा. वीणा सांगते त्यापेक्षा त्यांचे फोनवर जास्तच बोलणे झाले असणार. त्या शिवाय का त्यांचे बंधुराज येवढी वाकडी वाट करून येत आहेत!. असो. एक दोन दिवसांचाच प्रश्न आहे. तेवढे जरा संभाळले म्हणजे झाले. समुद्रस्नान, फराळ, खेळ, मासे पकडणे यात दिवस चांगला गेला. सर्वजण खूप आनंदात होतो. नावाडी पण चांगला होता. त्याच्या भरवशावर सर्वांना सोडून मी किनाऱ्यावर जरा इकडे तिकडे शोध घेण्याचा प्रयत्न केला. संध्याकाळी आम्ही घरी परतलो. आवराआवर करून

सगळी आपआपल्या खोल्यात गेली. माधवला फोन करावयाची सकाळपासून शोधत असलेली संधी आत्ता मला मिळाली. नशीबान तो फोनवर भेटला'' काय म्हणते तुमची इंदुमती?''

'' खड्ड्यात गेली तुझी इंदुमती. तुझ्या तारेन चांगलीच आग लावली. वीणा सकाळीच येऊन थडकली. म्हणे आवडते माणूस भेटो. तुझी पण कमाल आहे हं''

'' अरे मला काय माहीत वीणा इतक्या सकाळी सकाळी येईल म्हणून? तुला तुझ्या प्रयोगात तर नाही ना पकडले ?''

'' थोडक्यात वाचलो. प्रयोग करून परत येत होतो तर मंडळी दाराशी उभी. फार पंचाईत झाली माझी'' मग मी माधवला घडलेला सर्व प्रकार सांगीतला. '' या वेळी जरा जास्तच त्रास झाला. घाम पण फार येतो. वीणा म्हणत होती की मी फार वेगळा दिसावयाला लागलो आहे . खूप भीती वाटते रे.''

'' घाबरु नकोस. मी पण याच्यावर विचार करतो. पाहु कसे जमते ते . आठवडाभरात मी येतोच तिथे'' माधवन फोन बंद केला. ते बरेच झाले म्हणा कारण तेवढ्यात वीणा येऊन टपकलीच.

'' तुमच्या मित्राचाच फोन ना! काय नवीन लचांड लावले आता?''

'' लचांड वगैरे काही नाही. तुमची चौकशी करीत होता. पुढच्या आठवड्यात येईन म्हणतो.''

'' येउ द्या न. त्यांचेच घर आहे. '' वीणाने जरा बेफिकरीनेच म्हंटले. माधवचे चमत्कारिक प्रयोग आणि त्याचा माझ्यावर असलेला प्रभाव याचा वीणाला मुळातच राग होता.

पाहुणे येणार म्हटले की मला जरा गडबडल्यासारखे होते. ते येणार म्हणून कपडे वगैरे नीट घालून बसावे लागते. मोटारी आल्या की खोट खोट हसत त्याचे स्वागताला समोर जाणे, ती जेवणे, गप्पा, जागरणे मला तर अगदी नको वाटते. वीणा मात्र सगळ्यात अगदी मनापासून रस घेते. सकाळी लवकर आवरून आम्ही वऱ्हांडात वाट पाहत बसलो. माझ्या सारख्या आत बाहेर फेऱ्या चालल्या होत्या. वीणा मात्र स्वस्थ बसून होती. हा आमच्या दोघातला फरक.

'' मामा आला, मामा आला'' असा पोरांचा ओरडा आणि मोटारी एकदमच झाला. उतरता उतरता बंडुन पाठीवर जोरदार थाप मारली. '' काय म्हणते तब्बेत तुमची?''

म्हणजे माझा संशय खरा होता तर . त्यांचे इकडे येणे सहज नव्हते. दिवस कसा गेला ते काही कळले नाही. सारखे कुणी ना कुणी बोलत होते. बोलत नव्हते तेंव्हा खात होतो. खात नव्हतो तेव्हा चहा पीत होतो. पुनः गप्पा सुरु होत्या. पण एक मात्र नक्की. बंडु आणि त्याची बायको सुधा सारखे माझे निरीक्षण करीत होते.

रात्री जेवणाचा मोठा बेत होता. ताजी मासळी होती. बंडुन स्कॉचची मस्त बाटली आणली होती. नेहमी वीणा तसे काही घेत नाही. पण एखादेवेळी कंपनी द्यायला तिची हरकत नसते. खूप मजा आली. रात्री १२ पर्यंत गोंधळ सुरु होता. दिवसभराच्या बडबडीने माझे डोक अगदी पिकून गेले होते. शेवटी कुणी काय म्हणेल याचा विचार न करता '' चला झोपु या आता असे म्हणून मी वरती गेलो. सगळ्यांना जरा विचित्रच वाटले असावे कारण मी वर आल्यानंतर बराचवेळ खाली कुजबुजल्या आवाजात माझीच चर्चा चालली होती. शेवटी

एक एक करीत सगळे आपआपल्या खोल्यात गेले. मी पण गाढ झोपलो. पाहटे तीन वाजता मला जाग आली. सगळे घर अगदी शांत होते. कालच्या उशीरा झोपण्यामुळे आणि ड्रिंक्स मुळे लवकर कुणी उठण्याची शक्यता नव्हती. मी कपडे करून प्रयोगशाळेत गेलो.  डोस भरून घेतला. आणि गाडी काढून खाणीकडे गेलो. गाडी एका कडेला उभी करून मी एका दगडावर बसलो. यावेळी औषधाचा परिणाम लगेच झाला.

## प्रकरणा आठवे

भूतकाळात देखील काळ मागेपुढे जात होता की काय? पुनः मी जिथे हैबतराव मरणोन्मुख अवस्थेत पडले होते  त्यागढीतल्या  दालनात होतो.तसच कोणीतरी पांघरूण घेऊन पडले होते. उशाशी स्वामी उभे होते. जानकीबाई बाजुला होत्या. जानकोजीराव पण हजर होते. अंथरुणवरील व्यक्ती बोरगावकरांचा मोठा मुलगा हिरोजी होता.

'' हिरोजीला असे आजारी अवस्थेत सोडून जाणे शक्य नाही आणि बरोबर पण नेता येत नाही. हवा जरा चांगली असती तर तुमच्या वाड्यावर तरी नेता आले असते.'' जानकीबाई म्हणाल्या.

जानकोजीरावांनी उपरण्याने तोंड जवळपास पूर्णपणे झाकून घेतले होते. '' अमच्या वाड्यावर नेण्याचे जमणे जरा कठीणच आहे. आमच्या घरात कोणालाच देवी आलेल्या नाहीत आणि हिची प्रकृती तर अशी नाजुक आहे. रावजी इथे आहेच तो पाहील की हिरोजीकडे'' हिरोजीकडे आणि रावजीकडे त्यांनी अपेक्षेने पाहिले. जानकोजीरावांची फार कुचंबणा होत होती. आपला भेकड पणा उघड होतो आहे याची त्यांना फार लाज वाटत होती.

'' आपण आज्ञा करावी महाराज. मला देवी येऊन गेल्या आहेत. त्यामुळे मला काही भीती नाही आणि या देवीच आहेत हे आताच सांगणे कठीण आहे.''

जानकीबाई पुनः हंतरुणाजवळ गेल्या. '' मला पण तसेच वाटते. कधी नुसता ज्वर पण असावा. पण नक्की सांगता येत नाही. अशी जर वादळी हवा नसती तर आमचे बंधु उत्तमराव कालच आले असते. भरती कशी आहे'' रावजीकडे पहात त्या म्हणाल्या.

'' बाईसाहेब समुद्राला तर नुसता उधाण आले आहे. खाडी ओलांडणे शक्यच नाही. नाहीतर मी स्वतःच जाऊन निरोप दिला असता''

'' इलाजच खुंटला म्हणावयाचा. हिरोजीला मग रावजीच्या देखरेखीखाली ठेवण्या शिवाय गत्यंतर नाही''

'' आणखी एक उपाय आहे. '' आतापर्यंत सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकत असलेला स्वामी म्हणाला '' मठातील पाहुण्यांची खोली रिकामीच आहे. मठात इतर कुणाचा संबंध येण्याचा प्रश्न नाही. मठात हिरोजी माझ्या देखरेखीखाली व्यवस्थित राहतील. पहा पटत का?''

'' हे आधीच सांगावयाचे नाही का? आतापर्यंत आम्ही मार्गस्थ झालो असतो. आपले काय मत आहे सरदारसाहेब?''

'' हिरोजीला मठात ठेवणे अगदी योग्य आहे. फक्त इथून मठापर्यंत नेण्याच प्रश्न आहे. आपल्या घोडागाडीतून नेणे शक्य नाही कारण आपल्याला संसर्गाचा धोका संभवतो. रावजी करील काही तरी व्यवस्था.'' संभावितपणे जानकोजीराव म्हणाले.

'' काय बोलणे हे आपले. '' जानकीबाई फणकाऱ्याने म्हणाल्या '' हिरोजी मठापर्यंत माझ्याच गाडीतून येईल. काही होत नाही मला. तुम्हाला एवढी भीती वाटत असेल तुम्ही बरोबर घोड्यावर चला. चल रावजी हिरोजींना गाडीत नेऊन ठेव'' कुणाहीकडे न पहाता जानकीबाईंनी दरवाजा उघडला. वाऱ्याच्या प्रचंड वेगाने त्या एकदम मागे फेकल्या सारख्या झाल्या. '' पुनः विचार करावा आपण सरदारसाहेब . अशा वादळात घोड्यावरून येण्यापेक्षा आपण माझ्या गाडीतून येणे जास्त बरे राहील. अर्थात संसर्गाची भीती नसेल तर हं'' छद्मीपणे हसत जानकीबाई म्हणाल्या.

घोडागाडी दाराजवळ उभी करण्यात आली. स्वामी आणि रावजी या दोघांनी मिळून हिरोजींना गाडीत ठेवले. जानकीबाई आत शिरल्या आणि गाडी सुरु झाली. सरदार जनकोजीराव मागून जात होते. स्वामी पण घोड्यावर स्वार होत होता. त्याला थांबवून रावजी जरा हुकमी आवाजात म्हणाला '' या वेळेला काही घोटाळा करु नकोस बर का. नाहीतर मुलाच्या बापाशी गाठ आहे तुझी. ''

'' बोरगावकरांना स्वतःचाच जीव संभाळणे कठीण झाले आहे. मग मुलांकडे कुठून पाहणार? कुडतोजीराव बोर्डीला मुक्कामाला असल्याचे कालच मला कळले आहे. आणि आज पहाटेच ते कुठेतरी स्वारीवर जाणार आहेत. मला तर खात्री आहे की आपल्या बायकोच्या जाराचा काटा काढण्यापलीकडे त्यांना दुसरे काही सुचत नाही. '' बेफिकरीने हसून स्वामीने घोड्याला टाच मारली आणि गाडीच्या मागे निघाला.

स्वामी दृष्टी आड होतो ना होत तोच रावजी पळत पळत पागेकडे गेला आणि त्याच्या भावाला ओरडून बोलवून घेतले '' तीरासारखा वाड्यावर जा आणि इंदुमतीबाईंना कुठल्याही परिस्थितीत वाड्याचे बाहेर पडू नका असे बजावून ये. सरदारसाहेब आज रात्री इकडे येणार होते. पण अशा वादळात येतात की नाही ही शंकाच आहे. जा पळ '' मुलाने ताबडतोब एका घोड्यावर उडी मारली आणि तो वेगाने वाड्याकडे सुटला.

रावजी त्वरेन खाडीकडे जाऊ लागला. मी पाठोपाठ होतोच. रावजी फारच अस्वस्थ दिसत होता. सारखा खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावर नजर टाकत होता. मधूनच मागे वळून पाहत होता. एका अंगाने आत गेलेल्या खाडीच्या भागाकडे पण त्याची नजर सारखी वळत होती. त्या भागात दाट झाडी होती आणि जरा खोलगट भाग होता तो. कसली तरी अशुभाची शंका आम्हा दोघांना सारखीच जाणवत होती. किनाऱ्याकडे येणारी एक होडी आम्ही दोघांनी एकदमच पाहिली. मोठी होडी वाऱ्याचे वेगाने खूप हेलकावे खात होती. तिच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण जात होते. होडीतील माणसे एक लहान नांव खाली सोडण्याचा प्रयत्न करीत होते. रावजी दाट झाडी कडे पहात होता. तिथे पण हालचाल जाणवू

लागली. एकदम २०-२५ घोडेस्वार झाडीच्या तोंडाशी यऊन थडकले. तो भाग खोलगट असल्यामुळे नावेतील लोकांना ते दिसणे शक्य नव्हते. नाव खाली सोडण्यात त्यांना यश मिळाले . नावेत बोरगावकर सरदार होते. आणखी ३-४ जण नावेत चढले. प्रवाहाचे वेगाने नाव त्याच खोलगट भागाकडे जाऊ लागली. रावजी ओरडून त्यांना सावध करण्याचा पय्रत्न करु लागला. एकतर त्याचा आवाज त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हता किंवा त्यांचा काहीतरी गैरसमज झाला असावा. कारण नाव वेगाने झाडीकडे येऊ लागली आणि रेतीत जाऊन फसली. कमरेएवढ्या पाण्यातून बोरगावकर सरदार आणि बरोबरची माणसे किनाऱ्याकडे येऊ लागली. त्याच वेळी झाडीत थांबलेल्या घोडेस्वारांनी हल्ला चढवला. कंबरेची तलवार पण काढावयास बोरगावकर सरदारांना वेळ मिळाला नाही. कारण हे सर्व सांगायला जेवढा वेळ लागला त्याच्या आधीच सर्व संपले होते. एका फळकुटाला अडकलेला एक देह आमच्या कडे येत होता. आम्ही लगबगीन पाण्यात शिरलो आणि फळकुटावरून देह सोडवून घेतला. गतप्राण बोरगावकर सरदार फळकुटाला अडकले होते. रावजी तो देह फळी पासून सोडवु लागला.

'' रावजी !'' झाडीपलिकडून जोरादार हाक ऐकु आली. आम्ही चमकून झाडीकडे पाहु लागलो '' माझ्या बायकोला सांग की तुझ्या वाढदिवसाकरिता खास भेट पाठवली आहे म्हणाव '' स्वारांचा प्रमुख ओरडून म्हणाला. '' आणि तिचे काम आटोपले की गढीवर बोलावले आहे असा निरोप दे'' एवढ बोलून त्यांनी घोड्याला टाच मारली.

रावजीने कसाबसा तो मृत देह ओढत आणून रेतीत ठेवला '' देवा! बाईसाहेबांना आज मी तोंड कस दाखवु! कुठल्या तोंडान त्यांना ही अशुभ बातमी सांगु!''

पण रावजीला कुठे जाण्याची वेळच आली नाही. वेगान दोन घोडी किनाऱ्याकडे येत होती. समोर रावजीचा भाऊ होता आणि मागे इंदुमती होती. घोड्यावरून ताडकन उडी मारून ती मृत देहाकडे धावली '' अरे देवा ! काय झाले हो हे ! '' असे म्हणून खाली कोसळी. मी आणि रावजी एकदमच तिला सावरण्याकरिता पुढे धावलो. हाताला इंदुमतीच्या कपड्याचा स्पर्श होण्याचे ऐवजी मी मी तळासरीच्या रस्त्याकडल्या एका गोठ्याच्या गंजीशी उभा होतो आणि हाताने गवत चुरगळत होतो.

**प्रकरण नववे**

गंजीला टेकून मी शांतपणे चक्कर आणि मळमळ थांबण्याची वाट पाहु लागलो. हो, हे सर्व भोगणे भागच होते. चक्कर येणार आणि मळमळणार हे आता नेहमीचेच झाले होते. किती वेळाने बरे वाटते हे आता पहावयाला हवे. बाहेर चांगले उजाडले होते. मला लवकर

पोहोचणे भाग होते. हालचाल न करिता स्वस्थ बसले की आराम लवकर पडतो हे मला माहित झाले होते. थोड्यावेळाने मला जरा बरे वाटु लागले. मी भेलकांडत कसाबसा गाडीजवळ पोचलो. सर्व लक्ष एकवटून कशीतरी गाडी घरी आणून गॅरेजमधे लावली आणि स्वयंपाकघराचे दार उघडून आत आलो. सर्व घर शांत होत. अजून कुणी उठले नव्हते. कालच्या ड्रिंकचा परिणाम असावा. थोड्यावेळ ओट्यावरच मी बसकण मारली आणि स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करु लागलो. घशाला कोरड पडली होती. डोळे चुरचुरत होते. सर्व अंगाला दरदरून घाम फुटला होता. कितीही केले तरी घाम येणे थांबत नव्हते. न्हाणीघरात जाऊन मी ओल्या फडक्याने सर्व अंग पुसुन काढले तरी काही परिणाम नव्हता. आरशात पाहिले तर उजवा डोळा लाल झाला होता आणि चेहरा पांढरा फटक पडला होता. चांगला किटलीभर चहा करून घेतला आणि तिथेच मेजाशी बसून चहा पिऊ लागलो. माझा दुसरा कप सुरु होता तोच बंडु डोळे चोळत चोळत आला.

'' वा! दोघांच्याही मनात एकच विचार आला नाही! ''

'' चहाच ना! घे हवा तर. आणखी कुणी उठले आहे का?'' कपात त्याच्यासाठी चहा ओतत मी म्हणालो. ''

'' अजून तासभर तरी कुणी उठत नाही. तू तर कपडे करून तयार दिसतोस. बाहेर भटकून आला वाटते?''

'' हो . खर म्हणजे झोपच येत नव्हती मग गेलो जरा भटकायला ''

'' अच्छा , म्हणजे मगाशी गाडीचा आवाज आला तो तुझ्याच गाडीचा होता तर. ''

मला जरा बर वाटत होत. घाम काही मात्र थांबत नव्हता. माझ्याकडे निरखून पाहत बंडु म्हणाला '' तुझी तब्बत बरी नाही का? फार थकलेला दिसतोस. बैचेन पण आहेस''

मी बरळल्या सारख बोलु लागलो '' अरे मी फार भयंकर प्रकार पाहिला. मला अस्वस्थ वाटत होते म्हणून मी गाडी काढली आणि किनाऱ्याकडे गेलो. किनाऱ्याकडे एक नाव येत होती. नाव रेतीत येऊन अडकली. नावेतील ३-४ जण किनाऱ्याकडे येत होते तोच झाडीतून १०-१५ माणसांनी त्यांच्यावर हल्ला चढवला आणि सगळ्यांना खतम केले.''

'' अरे बाप रे! फारच भयंकर प्रकार . तू तझ्या डोळ्यांनी पाहिलास?''

'' हो तर. मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले''

'' मग तू आता काय करणार आहेस? मला वाटते तू ताबडतोब पोलीसला कळवावयाला हवेस''

'' पोलीस! पोलीसांच काम नाही हे. मी फक्त मृत माणसाच्या मुलांचा विचार करतो आहे. तो खूप आजारी आहे. कुणीतरी त्याला घडलेला प्रकार कळवावयाला हवा''

'' अरे पण ही गोष्ट पोलीसांना कळवावयलाच हवी. खून आहे हा. तुझी या भानगडीत न पडण्याची इच्छा मी समजु शकतो. पण शेवटी हा खून आहे. आणि त्या मृत माणसाला आणि त्याच्या मुलाला तू ओळखतोस?''

'' मी?'' तांबरलेल्या डोळ्यांनी मी बंडुकडे पाहु लगलो. मी काय बडबडलो याचा अर्थच मला लागत नव्हता. अरे देवा! मी पुनः काळाचा घोटाळा केला होता. हो, चांगलाच

घोटाळा केला होता. भूतकाळ आणि वर्तमान काळ याची मी सरमिसळ केली होती. हे निस्तरणे भागच होते.

'' मी त्या माणसाला फक्त पाहुनच ओळखतो. त्याची एक होडी आहे. आणि किनाऱ्यावरच तो कुठेतरी राहतो. बाकी माझा काही संबंध नाही. आणि तू म्हणतोस तसे नसते लफडे मला माझ्या मागे लाऊन घ्यावयाचे नाही. आणि त्यावेळी तेथे अजून एक माणूस होता. तो देईल पोलीसाला वर्दी. हो मला खात्री आहे. तो नक्कीच पोलीसाला वर्दी देईल''

'' तू त्या माणसाशी बोललास?''

'' नाही त्याने मला पाहिले पण नाही''

'' पहा मला वाटत तू पोलीसांना कळवावेस हे बरे. काही झाले तरी हा खून आहे. मी करु का ठाण्यावर फोन?''

'' मुळीच नको. आणि वीणाला व मुलांना यातले एक अक्षर सुद्धा कळता उपयोगी नाही. नसता गोंधळ होऊन बसेल आणि ''

'' तुझे म्हणणे बरोबर आहे. ओ के. पण तो दुसरा माणूस नक्की खबर देईल ना? मग काही हरकत नाही. बायकांना हे न समजणे बरेच. सगळा गोंधळ माजवतील. भर दिवसा १०-१२ जण सरळ हल्ला करून माणसांना ठार मारातात म्हणजे काय'' इथे राहणे काही सेफ दिसत नाही. तू पण लवकर इथून सटक ते बरे. बरोबर आहे, हा सगळा प्रकार पाहून तू असा घाबरल्या सारखा दिसणे साहजिकच आहे. थोडा चहा घे अजुन मग बरे वाटेल. वीणाला उठवु का? डॉक्टरला बोलावु का? ''

माझ्या बोलण्याचा बंडुवर चांगलाच परिणाम झाला होता. पोलीसात कळवण्यापासून मी त्याला परावृत्त करू शकलो होतो. '' नको. पडतो जरा स्वस्थ . पण मी सांगीतलेले लक्षात ठेव. कुणाशीही बोलु नकोस''

'' प्रॉमिस'' कोणालाच पण कळणार नाही. दुपारी निघतोच आहे आम्ही. पुढे काय झाले ते समजण्याची चुटपुट लागून राहील. पण पेपर मधे बातमी येइलच म्हणा. तुला काही समजले तर जरूर कळव. जा पड जरा''

पाहुणे जाईपर्यंत मी जरा गडबडलोच होतो. न जाणो बंडु अनवधाने काही बडबडला तर. पण सगळे सुरळीत पार पडले. वीणा सारखे माझे घाम पुसणे निरखून पाहत होती. ''कालची ड्रिंक पार्टी ही एक चांगली सबब होती. निघातांना तरी बंडु बरळाच '' पुढचे सगळे नक्कि कळव हं. मी पेपर्स चाळीनच''

'' पुढचे काय? काय झाले'' वीणाने विचारले.

'' काही नाही ग. त्याच्या धंद्यातील भागीदारी विषयी  बोलतो आहे तो''

'' हो, हो. तेच म्हणत होतो मी. सर्व पेपर्स पुनः नीट पाहीनच मी. तु पण कळव'' लहान मुलाला पण समजले असते असे डोळे मिचकवत बंडु म्हणाला.एकदाची घाडी हालली आणि मी सुटकेचा निश्वास टाकला.

'' काय घाम येतो आहे हो तुम्हाला. मघाशी वरती जाऊन दोनदा कपडे पण बदलून आलात. डोळे पण किती लाल झाले आहेत. काल इतके काही जास्त ड्रिंक झाले नाही''

'' अग सारखी बडबड. त्यात पुनः थोडे जास्तच ड्रिंक आणि विश्रांती तर मुळीच नाही. त्यामुळे असे होत असेल. मी पडतो जरा.''

आम्ही दिवाणखान्यात आलो तोच फोन वाजला. फोन माधवचाच होता

'' काय रे मोकळेपणान बोलता येईल का? की वीणा आहे तिथे?''

'' वीणा इथेच आहे. बोल ना''

तुमच्या मित्राचा फोन दिसतोय? काय नवीन लचांड लावणार आहेत?''

'' अरे वीणा विचारते आहे तू येणार होतास त्याचे काय झाले?''

'' माझा नमस्कार सांग वीणाला. या शनिवारी मी येतो आहे. चालेल ना?''

'' अग !माधव या शनिवारी येतो आहे. चालेल ना?''

''न चालावयाला काय झाले? त्यांचेच घर आहे. ''

'' वीणा म्हणते न चालावयाला काय झाले.''

'' ठीक मग मी कुठल्या गाडीन येतो ते कळवतो. बरे पुनः प्रयोग झाला का?

'' हो ना. पण खूप घाम येतो थकवा पण खूप येतो. डोळे पण लाल झाले आहेत''

'' औषधाचा परिणाम असावा. पण घाबरण्याचे काही कारण नाही. गोंधळाचे काय? भूत वर्तमान एकत्र होतात का? ''

'' ते तर आहेच. प्रयोगातून परत आल्यावर सरळ विचार करणे जमत नाही. मला पडलेले भयानक स्वप्न काल मी वीणाच्या बंधुराजांना सागीतले. सगळा गोंधळ झाला होता. ''

'' सगळ स्वप्न? म्हणजे किती?''

'' जवळपास पूर्णच. फारच भयानक. काल मी काही माणसे मरतांना पाहिली''

'' आपल्या ओळखी पैकी कुणी होती का?''

'' हो तर. तुला तो होडी चालवणारा माणुस आठवतो का? त्याचेच स्वप्न पडले. एका संशयी नवऱ्याने त्याला ठार मारले. ''

खळखळून हसत वीणा म्हणाली '' पाहिले ! मनी वसे ते स्वप्नी दिसे. तुम्हाला सर्वांचाच संशय येतो. थांबा मीच बोलते तुमच्या मित्राशी'' माझ्या हातून फोन हिसकावून घेत वीणा म्हणाली.

'' काय म्हणता भाऊजी? काय लचांड लावले आहे तुम्ही यांच्या मागे?सारखे घाबरलेले असतात. खरच तुम्ही शनिवारी याच. जरा बरे वाटेल यांना. आणि एक सांगा बर. यांनी घोड्यावर रपेट करणारी मुले पाहिली कुठेतरी. मुलांना पण घोड्यावर बसावयाला आवडेल. मी खूप चौकशी केली पण काही समजले नाही. तुम्हाला माहित आहे का घोडे कुठे भाड्याने मिळतील?''

'' माझे एक मित्र आहेत. कुडतोजीराव. त्यांची घोडी असतील ती. ''

'' मग त्यांचा पत्ता द्या न म्हणजे यांना त्यांना भेटावयाला सांगते''

'' सध्या कुठे असतात ते माहीत नाही. मी आलो की चौकशी करीन''

'' हे म्हणतात की त्यांनी त्या मुलांना कधीच पाहिले नाही. तर मग ओळखले कसे?''

'' कादाचित मुलांच्या आईशी त्याची ओळख असेल. सुंदर असेल आणि हा भाळला असेल. ''

'' तसेच असावे. बर यांना फोन देते'' मला वेडाऊन दाखवत वीणाने फोन मला दिला.

'' हे कुडतोजीराव काय प्रकरण आहे? '' मी रागावून विचारले.

'' छान जमले की नाही? बेमालूम रंगवले की नाही प्रकरण?जरा मजा आला. सरदार बोरगावकर खपलेले दिसतात. म्हणजे तुझा मार्ग मोकळा झाला. मी सहकाऱ्यांना कागदपत्रे तपासावयाला सांगतो. रावजी पण होता का तिथे?''

'' होता. पण त्याचा काही संबंध नाही''

'' छान. पण आता मी आल्याशिवाय प्रयोग करु नकोस. लक्षात आले ना? मी आल्याशिवाय प्रयोग करु नकोस.शनिवारी पोचतोच मी , काय? ठेवतो फोन''

माधवशी बोलणे संपले आणि जणु काय माझा भूतकाळाशी संबंधच तुटला. रावजी, इंदुमती, बोरगावकर यांचेब- ल बोलणे किती चांगले वाटत होते. माझा मुडच गेला.

'' एवढ काय वाईट वाटून घेता? तीन दिवसांनी येणारच आहेत ना तुमचे मित्र? तेवढी कळ काढावयालाच हवी'' माझ्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पहात वीणा म्हणाली. '' आणि का हो! तुम्ही त्या कुडतोजीरावांब- ल काहीच कसे बोलला नाहीत?''

वीणाने कुडतोजीरावांच नांव घेतलेले पाहुन मी गडबलोच. जरा मी संभाळूनच बोलावयाला हवे होते.

'' कालिंदीबाईना पण विचारले. त्यांना तर ही नांवे पण माहीत नाहीत. टेलीफोन डायरेक्टरीत पण त्यांचे नांव नाही. करतात तरी काय ते?''

'' मला वाटत ते सैन्यात होते. त्यानंतर सरकारदरबारी काही काळ नोकरी पण केली. माधव आल्यानंतर विचार त्यालाच''

'' त्यांची बायको फार सुंदर होती का हो?''

'' सुंदर होती पण आमचे कधीच बोलणे झाले नाही''

'' पण पूर्वी तुम्ही इथे येत होतात तेव्हा गाठ पडली असेलच ना?''

'' गाठ वगैरे काही नाही. नुसते पाहिले आहे. ती पण मला ओळखत असावी असे वाटत नाही''

'' मुले बरिक ओळखता आली!''

बोलण्यात मी गुंतत चाललो होतो. वीणा कसलेल्या वकीलासारखी माझी उलट तपासणी घेत होती. '' एकदा सांगितल ना . माझा आणि त्या कुडतोजीराव आणि त्याची ती सुंदर बायको यांचा काही संबंध नाही. उगीच माझे डोके खाऊ नकोस.त्यांना दोन मुले आहेत एवढेच मला माहीत आहे. बस्स.'' मी चिडून म्हंटले

'' अहो एवढा राग यावयाला काय झाले? राहिले ! बरे झोपा आता. खूप थकले आहात. नसेल काही सांगावयाचे तर सांगु नका.''

'' हे बघ मला माहीत होते तेवढे सर्व सांगीतले. आता हा विषय बंद''

'' बर बाई राहिले. मी जातेच कशी आता''

या घामाने खूप सतावले होते. मी सारखा रुमालाने चेहरा खसखसा पुसत होतो. म्हणे टेलिफोन डायरेक्टरीत नांव नाही. असते तर नक्कीच वीणाने त्यांना चहाला बोलवले असते. बंद गाडीतून सरदार कुडतोजीराव आणि इंदुमतीबाई येतात.मागे घोड्यावर रावजी असतो. सरदारसाहेब गाडीतून उतरतात. हात देऊन इंदुमतीबाईंना उतरवतात. मी आणि वीणा पायरीवर त्यांचे स्वागताला उभे असतो. आता हॅलो म्हणावयाचे की कमरेत वाकून झुकुन मुजरा करावयाचा ? माझ्या कल्पनेचे मला खूप हसु आले.

पुढचे दिवस खूप कंटाळवाणे गेले. पावसाने नुसती झड लावली होती. माधवची सक्त ताकीद होती म्हणून औषध पण घेतले नाही. माधवचा काही फोन नव्हता की पत्र पण नव्हते. वीणाने यावर दोनतीनदा थट्टा पण केली. हा एक त्रास, वर घामाचा त्रास तर होताच. दिवसातून तीनचारदा मी कपडे बदलत होतो. तोंडाला थोडी कडवट चव पण होती.

मला एक समजत नव्हते. मी त्या औषधाने जरी भूतकाळात गेलो तरी दरवेळी त्या रावजी, इंदुमती,बोरगावकर यांचीच का गाठ पडावी. त्या काळात इतर कोणी माणसे नव्हती का? की माझे आणि त्यांचे काही पूर्वीचे ऋणानुबंध होते?. म्हणजे माझे पूर्वज कोण? मी रावजी होतो का सरदार बोरगावकर होतो की इंदुमती? छे, छे इंदुमती असणे शक्यच नाही. बोरगावकर सरदारच असेल. नाहीतर आता सुद्धा मला त्या इंदुमती ब-ल इतके आकर्षण आणि आपुलकी का वाटावी?कसल्या नसत्या भानगडीत गुंतलो होतो मी. शेवटी एकदाचा शनिवार उगवला. सकाळच्या डाकेन माधवचे पत्र आले होते. दुपारी ४ च्या गाडीने तो निघणार होता. म्हणजे साधारणतः रात्री १० पर्यंत तो इथे पोहोचला असता. छान

!म्हणजे जेवण वगैरे होइतो वीणा आणि मुले झोपावयाच्या तयारीला लागतील. म्हणजे तेवढाच त्यांचा माधवशी संबंध कमी येईल. अग ! माधव रात्री १० पर्यंत येईल. म्हणजे कदाचित तो गाडीतच जेवण घेईल. तू जेवण वगैरे करण्याचे भानगडीत पडु नकोस. आम्हाला गरम कॉफी करून दिली की झाले. तुम्हाला पण जागत बसावयाला नको.''

'' कळले बर मला. माझी तुम्हाला अडचण नको आहे ना. पण हे गृहस्थाचे घर आहे. येणारा पाहुणा जेऊनच येईल हे गृहित धरणे बरोबर नाही. जेवण्याची तयारी मी ठेवीनच. तुमचे जेवण आटोपले की मी आणि मुले लगेच निघून जाऊ. तुमच्या निवांत गप्पात मुळीच अडचण येणार नाही. समजले''

मला बरोबर पकडले होते वीणाने पण न बोलण्यातच शहाणपणा होता. संध्याकाळचा वेळ कसा घालवावा हे समजत नव्हते. माझ्या सारख्या आत बाहेर फेऱ्या सुरु होत्या. शेवटी मी पुनः मागचीच होडी ठरवली आणि आम्ही सर्व समुद्रावर बोटिंग करायला गेलो. सुमारे ७ वाजता आम्ही परत आलो. कालिंदीबाईंनी टेबल लाऊन ठेवले होते. दुपारीच फोन व तार आली होती. माधव आधीच्या गाडीने येत होता. म्हणजे तो आता स्टेशनवर माझी वाट पहात असेल. मी चिडलो.'' पाहिले ! बाहेर गेलो तर असे झाले''

'' अहो ! बोटिंगला जावयाची तुमचीच टुम होती ना? आणि इतका काही उशीर झाला नाही. बसले जरा वाट पाहत तुमचे मित्र तर काही अगदी आभाळ कोसळत नाही''

मी घाईघाईने कपडे केले आणि स्टेशन कडे सुटलो. गाडी केंव्हाच येऊन गेली होती. माधवचा कुठे पत्ता नव्हता. स्टेशन मास्तर कडे गेलो तर त्यांचे टेबलावर एक बॅग पडली होती.

'' बर झाले. तुम्हीच आलात. नाहीतर मी आता ही बॅग तुमचेकडेच पाठवणार होतो. सोबत ही चिठ्ठी आहे. माधवराव तुमचे मित्र नाहीत का? फार मोठे संशोधक आहेत नाही ते? ते मागच्याच स्टेशनवर उतरले आणि गार्डबरोबर ही बॅग पाठवून दिली. ''

मी बॅग ताब्यात घेतली आणि चिठ्ठी वाचु लागलो. माधवने लिहले होते की तो मागच्या स्टेशनवर उतरून पायीच येत होता. मागचे स्टेशन म्हणजे बोगद्याचे अलीकडे. आम्ही पण खूप वेळा आधीच उतरून पायी घरी येत असु. पण ''तुला का ? ते नक्की लक्षात येईल'' हे काही माझ्या लक्षात येईना. आता ९ वाजत आले होते म्हणजे माधव कदाचित घरी पण पोहोचला असेल. मी घाईघाईन घरी निघालो. गाडीचा आवाज ऐकून वीणा बाहेर आली. मला एकट्यालाच आलेला पाहुन म्हणाली '' काय पुनः बेत बदलला का तुमच्या लाडक्या मित्राचा?''

'' बेत वगैरे काही नाही बदलला. तो मागच्या स्टेशनवर उतरून पायी येतो आहे. पण एव्हांना तो पोचायला हवा होता. त्याने सुटकेस दिली पाठवून गार्ड बरोबर. ''

'' मग एवढे कासावीस व्हावयाला काय झाले ? गाडीत होते ना ! मग येतीलच आता. तुम्ही आता जेऊन घ्या. ते आले की पुनः गरम करून वाढीन. ''

आमचे जेवण आटोपले. बराच वेळ झाला तरी माधवचा काही पत्ता नव्हता. आता मात्र माझ्याप्रमाणे वीणाला पण काळजी वाटु लागली. '' आधीच्या गाडीने निघाले म्हणजे सकाळचे जेवण तरी झाले की नाही देव जाणे!. आता इतक्या उशीरा येऊन ते जेवतील की नाही कोण जाणे . मी जरा कॉफी करून आणते. '' वेळ जात नव्हता. रात्रीचे १२ वाजले.

'' अहो ! मी म्हणते पोलीस ठाण्यावर जाऊन तक्रार तरी करून या.''

'' काय सांगु तिथे. ? माझा एक चक्रम मित्र जो की एक थोर शास्त्रज्ञ आहे तो आधीच्या स्टेशनवर उतरला आणि हरवला आहे म्हणून?''

काहीतरी नक्कीच भयंकर घडले असावे. पण वाट पहाण्याशिवाय आमचे हातात काहीच नव्हते. इतक्यात कर्कश्श पणे टेलिफोनची बेल वाजली. ठाणे अंमलदार राऊत फोनवर होते. महत्वाचे कामा करिता त्यांनी मला ताबडतोब ठाण्यावर बोलावले होते. माधव संबंधी काहीतरी असावे.वीणा पण येते म्हणाली. पण मी तिला पटवले की दुसरे काहीतरी काम असावे. आपण दोघांनीही घरी नसणे बरोबर नाही. कारण माधव आला तर कुणीतरी घरी असणे आवश्यक होते. कसेतरी तिला पटले. मी घाईघाईने गाडी काढून ठाण्यावर पोचलो. राऊत माझी वाटच पाहत होते. गंभीर चेहऱ्याने त्यांनी मला बसण्याची खूण केली. '' माधव अनंत मराठ्यांना तुम्ही ओळखता?''

'' हो माझा बालपणापासूनचा मित्र आहे तो.  आज संध्याकाळी येणार होता तो. अद्याप आला नाही म्हणून आम्ही सर्व काळजीत आहोत. त्याची काही खबर लागली का?''

'' सांगतो, सांगतो. शास्त्रज्ञ होते ना ते?''

'' हो पण त्याचा काय संबंध. तुम्हाला काही कळल का कुठे आहे तो?काही अपघात वगैरे तर नाही झाला ना? काय ते चटकन सांगा''

'' सांगतो, सांगतो. पण तुम्ही मनाची तयारी करावयाला हवी. मराठ्यांचा अपघातात मृत्यु झाला आहे. बोगद्याचे पलिकडे गेटमनची रिकामी झोपडी आहे ना ,तिथे ते गस्तीच्या शिपायाला आढळले. गाडीची जबरदस्त ठोकर डोक्याला लागली आहे. तरी ही अशा स्थितीत ते झोपडी पर्यंत सरपटत आले असावेत. पण खूप रक्तस्त्राव झाल्याने त्यांना तिथेच मृत्यु आला असावा. गस्तीच्या पोलीसाला जेंव्हा ते आढळले तेंव्हा ते गतप्राणच होते. डॉक्टरांनी डोक्याला जबरदस्त आघात झल्यामुळे मृत्यु ओढवला असे प्राथमिक निदान केले आहे. त्यांच्या खिशात तुमचे नांव असलेले पत्र सापडले म्हणून तुम्हाला फोन केला. तुम्हाला बॉडी पाहून ओळख पटवावी लागेल. मग आम्हाला पुढचे काम सुरु करता येईल.

माधवची आता बॉडीच उरली होती. मला काही सुचत नव्हते. दरदरून घाम येत होता. घशाला कोरड पडली होती. तोंड कडवट झाले होते. माझी स्थिती राऊतांच्या लक्षात आली. त्यांनी चटकन पाणी प्यावयाला दिले. '' साहेब इथे बाकावर पडता का जरा? डॉक्टरांना बोलावु का?'' काळजीच्या सुरात त्यांनी विचारले. रुमालाने घाम पुसत मी मानेनेच नकार दिला. कसे तरी स्वतःला सावरले. '' चला उरकून टाकु ओळख परेड एकदा''

माधवचे प्रेत टेबलावर झाकून ठेवले होते. माधवच होता तो. मस्तकाच्या पार चिंधड्या झाल्या होत्या. बॉडी माधवचीच असल्याची मला खात्री पटल्याची मी राऊतांना कबुली दिली. पुनः आम्ही ऑफिसात आलो. '' काणेसाहेब तुमची मनस्थिती मी समजु

शकतो पण आपल्याला पुढचे पाहिले पाहिजे नाही का? त्यांचे जवळचे नातेवाईक कोण कोण आहेत ते सांगता का? म्हणजे त्यांना कळवण्याची व्यवस्था करतो. कोणाकोणाला कळवावयाचे?''

'' माधवचे जवळचे नातेवाईक कोणीच नाहीत. एकुलता एक मुलगा होता तो. आईवडील लहानपणीच वारले. जवळचा म्हंटल तर मीच आहे फक्त. इतर कोणी नातेवाईक असले तर मला माहित नाही. नाही म्हणावयाला राव आणि अभ्यंकर त्याचे संशोधानातील बरेच वर्षापासूनचे सोबती होते. त्यांना कळवावे लागेल. '' मी त्यांना माधवच्या ऑफिसचे आणि त्या दोघांचे फोन नंबर दिले. राऊतांना मला बरेच काही विचारावयाचे होते. पण माझी मनस्थिती लक्षात घेता विचारावे की नाही असा त्यांचा गोंधळ उडाला होता. त्यांची अडचण लक्षात घेउन मीच त्यांना म्हंटले '' राऊतसाहेब ! आता मला बरे वाटते आहे. तुम्हाला काही विचारावयाचे असेल तर संकोच न बाळगता विचारा. तुमचे कर्तव्य तुम्हाला पार पाडलेच पाहिजे.''

राऊतांना सुटल्या सारखे वाटले '' मराठे तुमचेकडे येण्यास निघाले होते ना? मग मधेच कसे काय उतरले?''

मी माधवचा सकाळी फोन आल्यापासून सर्व हकिकत त्यांना सांगीतली. सुदैवाने माधवची चिठठी माझे खिशातच होती. ती पण दाखवली.

'' आता सर्व उलगडा झाला. मराठे मुंबईहून आले तरी त्यांच्या जवळ सामान काहीच कसे नाही हे समजत नव्हते . आता सर्व खुलासा झाला. हो! रुळाचे बाजूला ही एक

काठी सापडली. त्यावर फक्त माधवरावांचेच ठसे आहेत. '' माझ्या हातात फिरताना नेण्याची एक काठी देत ते म्हणाले. काठी मी लगेच ओळखली. माधवच्या वडीलांना अशा काठ्या जमवण्याचा छंद होता. त्यापैकी ती एक काठी होती. पण माधवने फिरावयाला जाताना काठी वापरल्याचे मला आठवत नव्हते. माधवची चिठ्ठी राऊत लक्षपूर्वक वाचत होते. '' का हो! या चिठ्ठीत माधवराव म्हणतात '' मी आधीच्या स्टेशनवर उतरून पायीच येतो आहे. गार्डबरोबर सुटकेस पाठवत आहे. ती घरी घेऊन जावी. बाकी सर्व ठीक. तुझ्या लक्षात बाकीचे येईलच म्हणा. म्हणजे काय?''

'' ते मला पण समजत नाही. माझ्या काय लक्षात येईल असे त्याला वाटले ते मला पण समजत नाही. '' माधवने अगदी शेवटी वापरलेली काठी हातात धरून मी माधवच्या आत्म्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करु लागलो. काय बर लक्षात यावयाला हवे होते. माझे डोके अगदी गरगरून गेले होते. पोलीस ठाण्यात आता थांबण्यात काही अर्थ नव्हता. राऊतांचा निरोप घेऊन मी गाडीजवळ आलो. अचानक माझे लक्षात आले की मी माधवची काठी हातातच धरली होती. एकदा वाटले की परत जाऊन राऊतांना द्यावी पण पुनः विचार केला त्यांना जर गरज वाटली असती तर त्यांनीच नसती का मागून घेतली. काठी गाडीत टाकून मी घरी आलो. रात्रीचा १ वाजला होता. वीणा ताटकळत वाट पहात बसली होती. मजेत चार दिवस सुटी घालवावयाला आली आणि भलतेच होऊन बसले होते. काय घडले ते मी तिला सविस्तर सांगीतले. आता करण्यासारखे काहीच नव्हते. मी उरलेली कॉफी पिऊन टाकली आणि अंथरुणावर जाऊन पडलो. दोघांनाही झोप येत नव्हती. बऱ्याच वेळ तिची

चुळबुळ सुरु होती. बऱ्याच उशीरा तिला झोप लागली. मी मात्र जागाच होतो. वीणा गाढ झोपली आहे याची खात्री करून घेऊन मी पाय न वाजवता माधवकरिता राखून ठेवलेल्या खोलीत गेलो. टेबलावर त्याची सुटकेस पडली होती. सुटकेसला कुलुप नव्हते. मी सुटकेस उघडली. वरतीच मी पाठवलेली बी लेबलची रिकामी बाटली होती. खाली काही कागद असलेले पाकिट होते. मी पाकिट उघडून पाहिले. पाकिटात माधवच्या सहकाऱ्याने जुन्या दप्तरातून काढलेल्या माहितीच्या नकला होत्या. पेशव्यांची शेवटी सरशी झाली होती. बोरगावकरांचा खून झाल्याचा उल्लेख होता. मी रीकामी बाटली हातात घेऊन विचार करु लागलो. माझ्या मागच्या बोलण्यात मी घोड्यांचा उल्लेख केला होता. लवकर निघाल्यामुळे माधवला थोडा मोकळा वेळ मिळाला होता. त्याचा त्याने सदुपयोग करून घेतला होता. आता मला ''तुझ्या लक्षात येईल '' याचा अर्थ लागत होता. पण गाडीतच औषध घेऊन  बाटली रिकामी करून पुनः सुटकेस मध्ये ठेवणे शक्य नव्हते. म्हणजे माधवने बोगद्याजवळ आल्यावर औषध घेतले असावे. माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी पुनः माधवने वापरलेली काठी हातात घेतली. त्याची मुठ फिरवताच ती सुटी झाली आणि काठीच्या पोकळीत एक छोटी अर्धवट भरलेली बाटली होती. माझ्या डोळ्यासमोर सर्व चित्र स्पष्ट उभे राहिले. माधवने औषध घेतले. रावजीची आणि त्याची गाठ पडली. माधव रावजीचे मागोमाग बोगद्यातून जाऊ लागला. रावजी भूतकाळात होता पण माधव खऱ्या अर्थाने वर्तमान काळातच होता. त्याला बोगद्यातून येणारी गाडी दिसली नसेल पण वर्तमान काळातील माधवच्या शरीराला गाडीच्या एखाद्या डब्याची जोरदार धडक बसली असावी.ताबडतोब तो खऱ्या अर्थान

वर्तमान काळात आला असावा आणि  एवढा मार लागून देखील  सरपटत झोपडीपर्यंत  गेला होता.माधव जेव्हा सरपटत झोपडी कडे जात होता तेंव्हा मी आरामात कॉफी पीत बसलो होतो. माझी अक्षम्य चुक झाली होती. माधव कुठे असेल हे माझ्या लगेच लक्षात यावयास हवे होते. मी माधवच्या विश्वासास पात्र ठरलो नव्हतो. एकप्रकारे मी त्याचा विश्वासघातच केला होता. बऱ्याच वेळ मी सुन्नपणे बसून राहिलो. पण असे बसून चालणार नव्हते. इतर जागे होण्याचे आधी मला बरीच कामे करावयाची होती. वीणा गाढ झोपली असल्याची मी पुनः एकदा खात्री करून घेतली.रिकामी बाटली घेऊन मी प्रयोग शाळेत गेलो. तिथले सगळे नमुने असलेल्या बाटल्या वगैरे मी एका पोत्यात भरल्या . ए लेबलची बाटली पण आणलेल्या शिशीत भरून रिकामी केली. प्रयोग शाळेचे दार बंद करण्यापूर्वी पुनः एकदा सर्व नीट पाहिले. आता वापरात नसलेल्या एखाद्या जुन्या प्रयोग शाळेसारखी ती दिसत होती. कुणालाही कसला संशय आला नसता. प्रयोगशाळा बंद करून मी सामानचे पोते खांद्यावर टाकले. किनाऱ्यावर जाऊन मी पोत्यात मोठे गोटे भरले. कपडे काढून लांबवर पाण्यात जाऊन पोते समुद्रात बुडवून टाकले. अंग कोरडे करून पुनः कपडे करून घरी परत आलो.वीणा अजून झोपलेलीच होती. करण्यासारखे काहीच नव्हते. मी फार थकून गेलो होतो. पहाट होण्यास थोडा वेळ होता. मी निवांतपणे हंतरुणावर पडून राहिलो. कितीतरी वेळ मी असा पडून होतो. उद्या राव आणि अभ्यंकर मुंबईहून येणार होते. उद्या सगळा दिवस गडबडीत जाणार होता. अपघाती मृत्यु म्हणजे पोस्टमार्टेम वगैरे होणारच. साक्षी पुरावे नोंदवणार. राव आणि अभ्यंकर यांना किती माहीत आहे हे मला कळणे शक्य नव्हते. तो

कसल्यातरी प्रयोगात गुंतला आहे हे मात्र त्यांना नक्कीच माहीत असणार. शिवाय त्या मेलेल्या माकडावर माधवने प्रयोग केले होते. माझी आणि राव व अभ्यंकर यांची साक्ष मिळती जुळती व्हावयास हवी. माधवच्या प्रयोगाची वाच्यता करणे योग्य नव्हते. जुने दप्तर मिळवून टिपणे काढणारा सहकारी पुनः होताच. त्याचे काय? डोके अगदी पिकून गेले. मला झोप केंव्हा  लागली हे समजलेच नाही. सकाळी मी खूप उशीरा उठलो. समजुतदारपणे वीणा मला न उठवता खाली निघून गेली होती. मी आन्हीक आवरले. न्याहारी करावयाची मुळीच इच्छा नव्हती. काहीतरी चाळा म्हणून पुनः बॅगेतील कागद काढून चाळावयाला सुरवात केली. जानकोजीरावांच्या मृत्युचा उल्लेख प्रथम वाचतांना सुटला होता. हिरोजी पण देवीतून वाचला नव्हता. जानकोजीरावांच्या आणि बोरगावकरांच्या इस्टेटीची वारसदार  जानकीबाई ठरली होती. म्हणजे इंदुमतीचा इस्टेटीवरचा हक्क नाकारला होता. कागद चाळता चाळता एक घडी केलेला कागद हाती लागला. माधवने मला पाठवलेले ते शेवटचे पत्र होते :

'प्रिय दिगु,   गाडीतच मी तुला हे पत्र लिहीत आहे. अक्षर लागताना त्रासच होईल. खरे म्हणजे मी स्वतःच तुला थोड्या वेळाने भेटणार आहे. पण का कोण जाणे ,पत्र लिहावे असे वाटते आहे. आतापर्यंतच्या प्रयोगावरून मी या निष्कर्षावर आलो आहे की हे औषध आपल्या मेंदुतील काही सूुप्त मज्जातंतुना जागे करते. केवळ या जन्मातल्या नाही तर गतजन्मातल्या पण. अशा वेळी जी गोष्ट आपल्या मेंदुवर अती ठळकपणे कोरलेली असते ती पुनः आपल्याला अनुभवता येते. याच अर्थ रावजी आणि मंडळी यांचा आणि आपला काही निकटचा संबंध आहे. एवढेच नव्हे तर त्या काळात ज्या गोष्टी घडल्या त्याला आपण साक्षीदार होतो. त्या

घटना मेंदुवर ठळकपणे कोरल्या आहेत. म्हणूनच औषध घेतल्यावर आपण त्या विशिष्ट काळात जातो. या गोष्टीचा पूर्णपणे तपास लावणे आवश्यक आहे. आपला आणि त्या काळातील व्यक्तींचा संबंध लावणे जरुरीचे आहे. खरे तर आपण जोडीन प्रयोग करणार होतो. पण उत्सुकता मला थांबु देत नाही. तसे हे औषध सारखे घेणे धोक्याचे आहे. ३-४ प्रयोगात तुझ्यावर थोडा परिणाम झालाच आहे. मी एकट्यानेच औषध घेतले तर कदाचित या प्रकरणाचा शेवट कळेल मग तुला औषध घेण्याची वेळच येणार नाही. बाकी भेटी अंती - तुझा माधव.''  हे पत्र वाचून मी सुन्न झालो. म्हणजे माझ्या बदली माधवचा बळी गेला होता. त्याने माझ्याकरिता स्वतःचे मरण ओढावून घेतले होते. या गोष्टीचा शेवट लावणे ही आता माझी नैतिक जबाबदारी होती. '' माधव काहीही झाले तरी मी या प्रकरणाचा नक्की शेवट करीन याची तू खात्री बाळग'' मी कागद घट्ट पकडून ठेवून मोठ्याने  म्हणालो.

'' अग बाई! जागे झालात वाटते. '' वीणा खोलीत केंव्हा आली ते मला समजलेच नव्हते. चपळाईन मी कागद पांघरुणाखाली लपवला.

'' झोपेत बडबडत होता वाटते? नाही.  तुम्ही तर चांगले तयार होऊन पुनः पडलेले दिसता? बरे वाटते का आता?''

'' हो ठीक आहे. थोडासा थकवा जाणवतो आहे''

'' इन्सपेक्टर राऊतांचा फोन आला होता. राव आणि अभ्यंकर म्हणून कोणी मुंबईहून आले आहेत. त्यांना घेऊन ते ११ वाजता येत आहेत. कोण हे दोघे?''

'' माधवचे सहकारी आहेत ते. ठीक  आहे. येऊ दे. मी तयारच आहे''

'' थोडी कॉफी घेता का? की पडता ते येईपर्यंत? चेहरा किती उतरला आहे. डोळे पण लाल झाले आहेत. पडाच तुम्ही. तासभर वेळ आहे अजून. ते आले की मी उठवते.चालेल?''

'' ठीक आहे. त्यांचेबरोबरच मी कॉफी घेईन पडतोच जरा''

बरोबर ११ वाजता राऊत राव आणि अभ्यंकरांना घेऊन आले.

## प्रकरण दहावे

राव आणि अभ्यंकर यांना मी ओळखत नव्हतो. राऊतांनीच त्यांची ओळख करून दिली. राव माधवचा ज्येष्ट सहकारी वाटत होता. चाळिशीचा असावा. उंच, किडकिडीत, जाड भिंगाचा चश्मा विचारी पण सौम्य मुद्रा. त्याचे डोळे मला बरेच काही सांगून गेले. मला थोडासा धीर आला पण जरा संभाळूनच बोलावयाला हवे.

'' काणे? आम्हाला एका गोष्टीचा खुलासा करता येत नाही. आधीच्या स्टेशनवर माधवराव उतरलेच का? आणि जरी उतरले तरी सरळ घरी न येता असे आड मार्गाने का निघाले? तुम्हाला काही यावर प्रकाश टाकता येतो का?''

सुरवात तर माझ्या दृष्टीने चांगली झाली होती. तोच धागा पकडून मला बोलावयाला हवे. '' त्याचे काय आहे राऊतसाहेब! माधवच्या अनेक उद्योगात पुरातत्व हा त्याचा आवडता विषय. इथे तळासरीला १३-१४व्या  शतकात एक पुरातन मठ होता. त्या मठाला केंद्र मानून काही गढ्या आणि वाडे होते. त्याचे संबंधाने शोध घेण्यात तो गुंतला होता. मला पण त्याने याच कारणाकरिता सुटी इथे घालवावयाला लावली. मुंबईला त्याचे एक सहकारी पण जुने दप्तर तपासत आहेत. या रावसाहेबांना कदाचित त्याची माहिती

असेल. '' मी अपेक्षेने रावांकडे पहात म्हणालो. त्यांनी किंचित मान हालवून होकारा दिला. मी तपासाला कोणत्या दिशेने नेतो आहे हे त्यांना कळले होते आणि ते आता माझ्या बरोबर होते. '' तर आता जेथे बोगदा आहे त्याचे जवळच एक जुनी खाण आहे. घराट म्हणतात इथले लोक त्याला. खाणीजवळ पूर्वी एक खाडी होती. खाडीतून ओहोटीला पलीकडे जाता येत असे. बोगदा आधी लागतो आणि नीट पाहिले तर घराट पण दिसतो. म्हणून त्याने पायीच येऊन  घराटाची तपासणी करावयाचे ठरवले असावे. त्याच्या चिठ्ठीत '' तुझ्या लक्षात येईल '' याचा अर्थ तोच असावा''

समाधानाने मान डोलावत राऊत म्हणाले '' त्यांच्या भटकण्याचे कारण समजण्यासारखे आहे. पण बोगद्यातून येणारी गाडी त्यांना दिसली कशी नाही?  आणि आवाज पण कसा ऐकु आला नाही? तपासात असे कळले आहे की त्या वेळीच एक मालगाडी रुळावरून गेली . त्याचीच धडक माधवरावांना लागली असावी. गाडी दिसली नाही तरी आवाज तर ऐकु यावयाला हवाच. मालगाडीचा आवाज काही कमी नसतो!''

आता माधव ज्या काळात रुळ ओलांडत होता त्या काळात तिथे खाडी होती, गाडी नव्हती. पण हे राऊतांना कसे सांगणार? माझी अडचण ओळखून राव म्हणाले '' राऊतसाहेब !माधवराव बोगद्यातून येत असावेत. गाडी आलेली त्यांना दिसली पण असेल किंवा आवाज नक्कचि ऐकु आला असेल. पण तेवढ्यात त्यांना रुळापासून दूर जावयाला वेळ मिळाला नसावा. आता गाडीची आणि बसची टक्कर झाल्याचे आपण ऐकतोच की. बसवाल्याला काय गाडी दिसत नाही की तिचा आवाज ऐकु येत नाही. पण अंदाज चुकतो आणि टक्कर होते.''

'' तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण तसे या ठिकाणी घडणे शक्य नाही. आपण ती जागा पहावयाला जाणारच आहोत तेंव्हा तुमच्या लक्षात येईल. पण काणेसाहेब मला आणखी एक विचारावयाचे आहे की तपासात असे आढळून आले आहे की माधवराव बराच वेळ त्या दरीच्या बाजूला काही जुनी घरे आहेत त्या भागात भटकत होते.  ते का?''

वीणा त्याच वेळी खोलीत आली. तिच्या कानावार राऊतांचा प्रश्न पडला  '' ते ना ! त्या कुडतोजीरावांचा तपास करीत असावेत. आहो सांगा ना त्यांना त्या कुडतोजीरावांब- ल''

'' कोण कुडतोजीराव? मी हे नांव तर पहिल्यांदाच ऐकतो आहे'' राऊत म्हणाले.

'' माधवरावांचे जुने मित्र आहेत ते. त्यांचेच घर शोधत असावेत ते. नाही का हो?'' माझ्याकडे अपेक्षेने पहात वीणा म्हणाली.

'' तुम्ही असे आधी काही मला बोललात नाहीत? '' माझ्याकडे जरा संशयाने पहात राऊत म्हणाले.

'' खरे सांगु का राऊतसाहेब ! कुडतोजीराव म्हणून कोणी अस्तित्वातच नाहीत. मी आणि माधवने हिची जरा गंमत केली.''

'' म्हणजे त्यांची दुसरी बायको, त्यांची दोन लहान मुले हे सगळे थोतांडच होते तर? ''

माझ्याकडे रागाने पहात वीणा म्हणाली.

'' सॉरी हं वीणा . खर म्हणजे तसे काहीच नाही. माधवने तुझी गंमत केली आणि मी पण त्याची री ओढली. ''

'' जळो तुमची गंमत. मी आपली जातेच कशी'' रागाने वीणा चालती झाली. पण तिच्या नजरेत अविश्वास ओतप्रोत भरला होता. राऊत पण जरा नाराजच दिसले. घाईघाईत मी पुनः म्हणालो '' तुम्हाला मी मघाशी सांगितले ना !तसे माधव त्या जुन्या भागात त्या मठाचा आणि गढ्यांचा शोध घेत असावा.''

'' असेल. तसे ही असेल. चला आता ती प्रयोग शाळा पाहु मग इथले काम संपले. मग अपघाताची जागा पहावयाला जाऊ. ''

'' हो, हो. पाहु की त्यात काय. '' मी उठत म्हंटले . रावांनी माझ्याकडे रोखून पाहिले. कदाचित त्याचा मला सावध करण्याचा हेतु असावा. त्याचे मन निश्चिंत करण्याकरिता मी म्हणालो '' चला तर पाहुन घ्या ती प्रयोग शाळा. खरे म्हणजे माधव खूप वर्षापासून ती वापरत नव्हता. आता तिथे काही रिकाम्या बाटल्या वगैरे पडल्या आहेत. पहाण्या सारखे काही नाही पण म्हणाताच आहात तर पाहुन घ्या.''

सर्वांना घेऊन मी तळघरातील प्रयोग शाळेत गेलो. मी म्हणालो तसेच प्रयोगशाळेचे स्वरुप होते. वापरात नसाावी तशी ती प्रयोगशाळा दिसत होती.

'' चला वरच जाऊ इथे पहाण्यासारखे काही नाही. कसे गुदमरल्यासारख होते आहे''

राऊत म्हणाले. त्यांना समोर जाऊ देत राव मु-ामच मागे रेंगाळले. माझ्या कानाशी लागून ते पुटपुटले '' तुम्ही सगळे सामान हलवलेत हे चांगले केले. तुम्ही जो धागा पकडला आहेत तोच धरून पुढे चला'' मी पण समाधानाने मान हलवली. प्रयोगशाळेला कुलुप लाऊन मी सर्वांना घेऊन वर आलो. राऊतांच्या जीप मधून आम्ही बोगद्याकडे निघालो.

'' आता तुमचे लक्षात येईल की माधवरावांना बोगद्यात शिरतांना किंवा बाहेर पडतांना गाडीचा धक्का का लागला नसावा. '' बोगद्याचे दोन्ही बाजुला असलेल्या तारेच्या कुंपणाकडे बोट दाखवत  राऊत म्हणाले. तारेखालून सरपटत जाऊन मगच बोगद्यात रुळाजवळ जाता येत होते. सरळ पुलावरून न जाता माधवराव या तारांखालून सरपटत का गेले असावेत?''

अपघाताची जागा बोगद्यापासून बऱ्याच अंतरावर होती. आणि सरपटत जाऊन माधव ज्या झोपडीजवळ पडलेला आढळला ती पण रुळापासून बरीच लांब होती .'' यावर तुमचे काय म्हणणे आहे'' माझ्याकडे पाहात राऊत म्हणाले.'' काही नाही ना सुचत''

खरे तर चित्र स्पष्ट  होते. माधव रुळ ओलांडत होता तेव्हा तिथे तारेचे कुंपण नव्हते की रुळ रस्ता नव्हता. कदाचित रावजी समोर जात असेल कदाचित बोरगावकरांचे खुनानंतर इंदुमतिला वाड्यावर राहणे सुरक्षित वाटले नसेल म्हणून रावजी तिला आणि मुलांना घेऊन कुठेतरी चालला असावा. माधव पण पाठोपाठ जात असावा. त्याला गाडी येत आहे हे कळणारच कसे ?

'' नाही ना उलगडा होत'' राऊत पुनः म्हणाले.

मी चटकन वर्तमान काळात परत आलो. आजुबाजुच्या जागेचे निरिक्षण केले आणि म्हणालो '' तसे नाही. उलट यामुळे माझ्या म्हणण्याला पुष्टीच मिळते आहे. ''

'' ते कसे ?''

'' मी तुम्हाला मघाशी म्हणालो ना ! की या बोगद्याजवळ पूर्वी खाडी होती. त्यातून ओहटीचे वेळी पलिकडे जाण्याचा मार्ग होता. माधव त्याच वाटेन मु-ाम जाण्याचा प्रयत्न करीत असावा. नाहीतर मु-ाम तारेखालून सरपटत कोण कशाला जाईल?त्याला कसला तरी सुगावा लागला असावा. म्हणून तो तारेखालून सरपटत इथपर्यंत आला. त्या तंद्रित त्याला गाडीचा आवाज ऐकु आला नाही की गाडीपण दिसली नाही''

माधवराव या मार्गाने का आले याचे स्पष्टीकरण पटण्यासारखे आहे. पण काणेसाहेब! माधवराव कसल्या तरी विवंचनेत होते का?त्याची सांपत्तिक स्थिती चांगली होती हे मला कळले आहे. त्यांचे वकील आम्हाला सापडले आहेत. त्यांनीच सांगीतले. ते उद्या येणारच आहेत कोर्टात. त्यानंतर माधवरावांच्या मृत्युपत्राचे वाचन आहे. अशी काही विवंचना त्याना होती का की त्यामुळे त्यांनी  म्हणजे ...'' वाक्य अर्धवट सोडत राऊत म्हणाले.

यावेळी मात्र राव एकदम पुढे सरकले. '' तुम्हाला माधवरावांनी आत्महत्या केली असावी असे का म्हणावयाचे आहे?  पण ते शक्यच नाही. त्यांच्या कार्यात ते अत्यंत यशस्वी होते. त्यांना कुठलीही चिंता नव्हती. आपल्या कार्यात ते आनंदाने मग्न होते. दोन दिवस मित्राबरोबर मजेत घालवावयाला मिळणार म्हणून ते आनंदून गेले होते. तसे ते माझ्याजवळ

बोलले पण. कारण या सुट्टीत एका प्रकरणाचा निकाल लागेल याची त्यानंा खात्री वाटत होती. नाही, माधवरावांना आत्महत्या करावयाला प्रवृत्त करील अशी कोणतीही गोष्ट माधवरावांचे बाबतीत नव्हती. ते अगदी आंनदात होते. त्यांचा मृत्यु म्हणजे एक दुर्दैवी अपघातच आहे''

'' तुम्हाला दुखवावे अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. पण उद्या कोर्टात काय काय प्रश्न निघतील याची तुम्हाला कल्पना यावी म्हणून मी असा प्रश्न केला'' ओशाळून राऊत म्हणाले.

राव माझे बाजुलाच आहेत याची मला खात्री पटली म्हणून मी जरा खंबीरपणानेच म्हणालो'' राऊतसाहेब तुम्हाला अशी शंका येणे साहजिकच आहे. पण मी माधवला लहान पणा पासून ओळखतो. राव म्हणतात तसेच मला पण वाटते. कोणत्याही प्रसंगात डगमगणारा तो नव्हता. तो एक थोर शास्त्रज्ञ होता. त्याचे मनात आत्महत्येचा विचारच येणे शक्य नाही. पण सर्व शास्त्रज्ञाप्रामाणे त्याच्यात एक दुर्गुण होता तोच त्याच्या मृत्युला कारणीभूत ठरला?''

'' दुर्गुण!'' सर्वांनी एकदम आश्चर्याने विचारले.

हो दुर्गुणच म्हणावा लागेल. एखाद्या गोष्टीचे नादात वेळेचे, स्थळाचे, आजुबाजुच्या गोष्टीचे त्याला मुळीच भान राहत नसे. आणि त्याच तंद्रीत त्याला गाडी दिसली नाही की आवाज एकु आला नाही आणि हा प्रकार घडला'' सत्यच पण मी किती

वेगळ्या प्रकारे सांगितले होते. माधवला त्यावेळी वर्तमान काळाची जाणीव नव्हती हे एकदम सत्यच होते.

माझ्या बोलण्याचा राऊतांवर नक्कीच परिणाम झाला. पुढे काहीच न बोलता आम्ही घरी परतलो. राव व अभ्यंकर यांचे जबाब नोंदावयाचे होते म्हणून ते ठाण्यात गेले. जाण्यापूर्वी रावांनी मला एका बाजुला घेऊन हे प्रकरण योग्य प्रकारे हाताळल्या ब- ल धन्यवाद दिले आणि पूर्ण सहकार्याचे अश्वासन दिले.सगळा दिवस कटकटीत गेल्यामुळे मी अगदी थकून गेलो होतो. कोणाशीही काही न बोलता मी वर जाऊन पडलो. दुपारी मुंबईहून माधवच्या वकीलांचा फोन आला '' काणे! आमच्या अशीलाचा असा मृत्यु झाला याचे मला फार वाईट वाटते. तुमच्या दुःखात मी सहभागी आहे. उद्या कोर्टात चौकशी आहे ती आटोपली की अंत्यविधीची तयारी करावी लागेल ''

'' अंत्यविधीची मी तयारी करून ठेवली आहे. तुम्ही आला की पुढचे पाहु''

'' वाटलेच मला. पण नंतर एक लाहानसे काम आहे. मराठ्याचे मृत्युपत्राचे वाचन करावे लागेल. तुमचा पण त्यात उल्लेख आहे. येतो मग मी उद्या''

'' ठीक आहे '' म्हणून मी फोन बंद केला. मृत्यपत्रात माधवने माझ्यासाठी काय ठेवले असेल ! अशा वडीलांनी जमवलेल्या काठ्या? माझ्याच विचारात मी गुंग होतो. वीणा जवळ येऊन उभी होती. माझ्या चेहऱ्याकडे पाहत म्हणाली''रागावणार नसाल तर एक विचारु? '' मी काहीच बोललो नाही. माझे मौन हीसंमत्तीच समजून म्हणाली '' उद्या चौकशीचे काम आटोपले की आपण मुंबईला लगेच परत जाऊ. आता इथे राहणे काही बरोबर

वाटत नाही. माधवरावांनी हे घर आपल्याला वापरावयाला दिले. ते होते तो पर्यंत ठीक पण त्यांच्या नंतर त्यांचा वारसदार कोण असेल त्याला आपले राहणे पटणार नाही. तुमचे मन पण इथे आता रमत नाही हे मला पण दिसते आहे. जाऊया का आपण लगेच?''

तिचे म्हणणे अगदी बरोबर होते. आता इथे राहण्यात काही अर्थ नव्हता. पण माधवचे काम पूर्ण करावयाचे होते. अर्थात त्याला आता फार वेळ लागणार नव्हता. '' खरे आहे तुझे म्हणणे. चौकशीचे काम आटोपले की इतर सटरफटर कामे आटोपून आपण लगेच मुंबईला परत जाऊ''

वीणाने सुटेचा निश्वास टाकला आणि खाली निघून गेली.

कोर्टाचे कामकाज फारसे लांबलेले नाही. आश्चर्यकारक पण अपघाती मृत्यु असा कोर्टाने निर्णय दिला. शव ताब्यात घेऊन अंत्यविधी उरकून आलो व दिवाणखान्यात सर्व जमलो. सर्वजण एका विचित्र दडपणाखाली वावरत होतो. घसा खाकरून वकीलांनी बोलावयाला सुरवात केली. '' मयत माधव अनंत मराठे यांचे हे शेवटचे व कायदेशीर मृत्युपत्र आहे. '' वीणा उठून आत जात होती तिला थांबवून वकीलांनी पुढे वाचावयाला सुरवात केली. मृत्युपत्र तसे छोटेच होते. कायद्याचा किरकोळ भाग वगळता महत्वाचे सांगावयाचे म्हणजे माधवने आपली सर्व रोख मिळकत व प्रयोगाचे सर्व हक्क त्याचे कॉलेजला दिले होते. मुंबईतला त्याचा फ्लॅट फर्निचर वगैरे विकून येणारा पैसा पण कॉलेजलाच द्यावयाचा होता. सर्व पुस्तके व संदर्भ ग्रंथ राव व अभ्यंकर यांना देण्यात आले

होते. आणि जुन्या स्मृतिला स्मरून आणि पूर्वजांचे इच्छेप्रमाणे कळवणचे घर मला देण्यात आले होते.

'' पूर्वज म्हणजे माधवरावांचे आईवडीलच ना?'' वकीलसाहेब विचारते झाले.

मला माधवचा हेतु समजला होता पण मी चटकन हो म्हणून टाकले.

'' छान घर आहे हे. तुम्ही इथे सुखात राहु शकाल'' वकील साहेब म्हणाले.

इतर सटरफटर गोष्टी उरकून राव,अभ्यंकर व वकीलसाहेब यांना मी स्टेशनावर पोचवून आलो. आता घरी परतावयाचे होते. घर या संज्ञेला नवीन अर्थ प्राप्त झाला होता. आता मी त्या घराचा मालक झालो होतो. पण घरी परतावयाची मला मुळीच घाई नव्हती. वेळात वेळ काढून मी  शिशी भरून घेतली होती. माधवचे राहीलेले कार्य मला पूर्ण करावयाचे होते.

माझ्या आजुबाजुला किर्र दाट झाडी होती. सगळीकडे दाट धुक पसरले होते. मी दरीच्या जंगलात तळाशी उभा होतो. औषधाच्या प्रभावाने मी अजूनपर्यंत गोंधळून गेलो नव्हतो. नेहमी जाणीवा जास्त तीव्र होत असत व आकलन शक्ती पण प्रभावी होत असे. पण या वेळी मात्र मी गोंधळून गेलो होतो. माझी अपेक्षा होती की आजुबाजुला उजेड असेल. पण इथे दाट धुके होते. मी एकटा होतो. हो या वेळी प्रथमच रावजी माझे सोबतिला नव्हता. अंदाजाने मी उत्तरेकडे चालु लागलो. का ते मला माहीत नव्हते. पण थोड्याच वेळात मला कुत्री भुंकण्याचा आवाज आला. नंतर एक कुत्र्यांचा कळपच भुंकु लागला.

## प्रकरण  अकरावे

कुत्र्यांचे भुंकण्याचे अनुरोधाने मी पुढे जाऊ लागलो. थोड्याच वेळात मी एका सपाट मैदानत येऊन पाहोचलो. अचानक चहुकडून कुत्र्यांनी घेरलेले एक भेदरलेले हरीण मला दिसले. मोकळ्या मैदानाचे पलिकडे काही माणसे लपून बसली होती. त्यातल्या एकाने नेम धरून बंदुक झाडली. हरण तडफडत खाली पडले. एक दोन बार कुत्र्यांना पण लागले. कुत्रे केकाटत त्या शिकाऱ्याकडे धावले. तसे शिकाऱ्याने कुत्र्याला एक जोराची लाथ मारून भिरकून दिले  आणि बरोबरच्या माणसांना हरीण उचलण्याची आज्ञा केली. शिकारी मोकळ्या मैदानात आला तेंव्हा मी त्याला चटकन ओळखले. सरदार कुडतोजीराव होते ते. मी पण मोकळ्या मैदानात समोर गेलो. माझ्याकडे कुडतोजीराव टक लाऊन पहात होते. मी त्यांना दिसणे शक्यच नव्हते पण तरीही मी गोंधळून गेलो.

हात वर करून कुडतोजीराव म्हणाले '' माझ्याशी बोलावयाचे असेल तर जवळ ये'' मी तर फारच घाबरून गेलो. चटकन एका झाडाचे आडोशाला लपु लागलो. पण त्याची काही जरुरी नव्हती. माझे मागेच रावजी उभा होता. त्याला उ`शून कुडतोजीराव बोलले होते.

'' प्रणाम महाराज. आपला आणि बाईसाहेबांचा प्रवास नीट झाला ना!. ''

''नीट  न व्हावयाला काय झाले. बोटीवर वर्षभर पुरेल इतका दाणागोटा भरला आहे. सोबती पण चांगले आहेत. बाईसाहेबांचे विचारशील तर त्या आपल्या खोलीत नुसत्या बसून असतात. माझ्याबरोबर आल्या आहेत एवढच. तुझी मालकीण काय म्हणते? आता काय

खूप मोठी इस्टेट मिळाली आहे. बरे ते जाऊ दे, आज इकडे कसा काय फिरकलास? तुझ्या मालकीणी साठी नवीन यार शोधण्यात तू दंग असावयास हवा होता?''

'' माझ्या मालकिणीला यार शोधत जावे लागत नाहीत. स्वतःहुनच गोंडे घोळत येतात ते. ''

'' हरामखोर ! कुणासमोर बोलतो आहेस तू ? ''

'' आपण देखील कुणाब- ल बोलता आहात याची जाण ठेवावी. माझ्या मालकिणी ब- ल कुणीहि भलतेसलते बोलाल तर मी खपवून घेणार नाही''

कुडतोजीरावांचा चाबूक धरलेला हात वर गेला. आता रावजीच्या पाठीवर फटका बसणार असे मला वाटले पण जवळच घोटाळत असलेल्या एका कुत्र्याचे पाठीवर फटका हाणत कुडतोजीराव म्हणाले '' या कुत्र्यापेक्षा नक्कीच तू इमानी दिसतोस. पण मी तुला असा जाऊ देणार नाही. कमीतकमी लाडक्या धाकट्या मालकीणीला तरी भेटून जा. चल जातोस कुठे?''

कुडतोजीरावांचे पाठोपाठ रानातून वाट काढीत आम्ही एका वाड्याजवळ येऊन पोचलो. कुडतोजीरावांचे सहकारी अजून मागेच रखडत होते. चौकात दोन लहान मुले खेळत होती. एक पोरगेलीशी मुलगी बाजुला उभी होती. कुडतोजीरावांना पहाताच तिने लाजून मान खाली घातली. मुले एकदम गप्प झाली.

'' पोरांना तरी चांगले वळण लागावे म्हणुन आमची भाची बोलावली आहे इथे.

रावजीने झुकून मुजरा केला. मुले एकदम रावजीला येऊन बिलगली. त्यांचे पाठीवर थोपटत रावजी मुलांशी बोलु लागला. '' जा रे, तुमच्या आईला सांगा रावजी आला आहे म्हणाव''

मुलाने चेहरा फुगवून रावजीला विचारले '' रावजी! तू आम्हाला नवीन घोडा आणून देणार होतास ना? रंगीत चाबुक पण आणणार होतास? चल थापाड्या कुठला''

'' नाही नाही. चाबुक आणि घोडा पण तयार आहे. चला सईबाईला बोलवा. जाऊ आपण घोड्यावर रपेट करावयाला.''

'' सईबाई तर केंव्हाच गेली. महाराजांनी तिला हाकलून दिली. आता ही नवीन अवदसा आणून ठेवली आहे. सारखी महाराजांचीच कामे करित असते. आमच्याशी खेळावयाला तिला वेळच नसतो. ती कसली येते आमच्या बरोबर?''

'' काय रे काय बडबड चालली आहे. मगापासुन पाहतो आहे मी. जा रावजीला तुमच्या आईकडे घेऊन जा'' रागाने कुडतोजीराव ओरडले.मुले घाबरुन आईला निरोप द्यावयला गेली. कुडतोजीरावांचा आणि त्यांच्या भाचीचा हास्यविनोद बराच मोकळेपणाने चालला होता. त्याचा योग्य तो अर्थ आमच्या ध्यानात आला.

'' चल तुला आई बोलावते आहे. '' मुलीने येऊन सांगीतले.

रावजीच्या पाठोपाठ मी पण वरती गेलो. आम्ही दालनात शिरलो तेंव्हा इंदुमती खिडकीशी उभी राहुन बाहेर पहात होती. पायाशी एक मांजर घुटमळत होते. '' ये रावजी! खूप दिवसांनी आठवण झाली आमची. सगळे बरे आहेत ना? '' आवाजातला पूर्वीचा

करारीपणा  गेला होता. स्वर पण मलुल होता. '' जा मुलांनो तुम्ही जरा खाली खेळा. आम्हाला जरा निवांत बोलु द्या. '' मुलांना पिटाळत इंदुमती म्हणाली '' काही निरोप आहे का?''

'' नाही बाईसाहेब निरोप वगैरे काही नाही. आपली तब्बेत बरी नसते आणि आपण इथे आहात हे समजले म्हणून हजेरी लावायला आलो. ''

'' माझ्या तब्बेतीचे काय घेऊन बसलास ! आता फक्त मरणाची वाट पाहणे नशीबी आले आहे. एकदा मी मेले की सगळे सुटतील''

'' इतके निराश होण्याचे काही कारण नाही बाईसाहेब. पूर्वीची आपली जि- कुठे गेली?''

'' रावजी आता मी काही तरूण राहीली नाही. पूर्वी इकडे सतत पुण्याला राहणे असे. पण तरीदेखील सुभेदारी पदरात पडली नाही, आता बायकांचे पदर धरून इथेच असतात. त्यांचे नवीन प्रकरण पाहिले ना? मुलगी शोभेल त्यांची. पण जिवाला काही लाज? मी मेले की तिच्याशी नवा घरोबा करून तिला कायमचे वाड्यावर आणून ठेवतील.ही एवढी मनीच काय ती माझी जिवाभावाची सोबती राहिली आहे. आता कुणी भेटायला येत नाही आणि कुणी बोलावत नाही.सांग आता यातून काही सुटका आहे का? यांनी तर अशी आवई उठवली आहे की माझे डोकेच फिरले आहे''

'' असे बोलु नका बाईसाहेब!. अजुन देखील तुमचे बरेच चाहते आहेत. आणि यातून सुटकेच म्हणाल, तर मी तुमची अगदी या क्षणी देखील सुटका करु शकतो. फक्त तुम्ही थोडीशी हिम्मत दाखवली पाहिजे.''

'' हिम्मत तर खूप आहे. पण साधने आणि सोबती हवेत ना? इथून सुटले तर मी आपल्या बंधुराजांकडे जाईन म्हणते. एकदा  का मी तिकडे पोचले की मग इकडची स्वारी काही करु शकणार नाही. पण हे जमावयाचे कसे?''

रावजी जवळ येउन हलक्या आवाजात म्हणाला '' बाईसाहेब आपल्याला माझ्याब- ल किती खात्री वाटते?''

'' खरे सांगावयाचे तर रावजी पूर्वी मला तुझ्याब- ल सारखा संशयच यावयाचा. हैबत रावांचे मृत्युला तु पण कारणीभूत होतास. पण आता परिस्थिती बदलली आहे. जुन्या पैकी तूच काय तो एक राहीला आहेस. तुझा भरोसा न करून कसे चालेल?''

रावजीने दालनाचे दार बंद करून घेतले.  जवळ येऊन कानात पुटपुटला '' ठीक आहे तर मग. मी खाली गेलो की आपण दालनाचे दार घट्ट बंद करून घ्या. खिडकीतून उडी मारून डोंगराचे दिशेने पळत सुटा. मी खाली जाऊन सगळ्यांना सांगतो की आपली तब्बेत पुनः बिघडली आहे आणि कुणीपण त्यांचे खोलीत जाऊ नये''

'' ठीक आहे. पण मुलांचे काय? मुले आताच त्या बयेची नक्कल करावयाला लागली आहेत. मंगला अजून लहान आहे. ती एकदा माझे हातातून निसटली की संपलेच सगळे ''

'' हे बघा, मुलांची काही काळजी करू नका त्यांना मी नंतर सुखरुप आणून पोचवीन. प्रथम तुम्ही आपला विचार केला पहिजे. तुमचे आयुष्य एकदा का मार्गी लागले की सर्व ठीक होईल.''

'' अस म्हणतोस? ठीक आहे मग. तू चटकन खाली जा. माझा विचार पुनः बदलण्याचे आधी मी या दालनातून बाहेर पडले पाहिजे''

पुनः मुजरा करून रावजी खाली गेला. दिवाणखान्यात फक्त मंगलाच होती. '' सरदार साहेब कुठे गेले?'' रावजीने विचारले

'' महाराजांचे अंग जरा मोडून आले म्हणून ते आत पडले आहेत. आमची ताई त्यांचे अंग चेपून देत आहे. तू आता त्यांची भेट घ्यावयाला गेलास तर कदाचित त्यांना आवडणार नाही''

'' असे असेल तर तुम्हीच सांगा की मी गेलो म्हणून''

आम्ही वाड्याचे बाहेर पडलो. नोकरांच्या भागाकडे बोलण्याचा आवाज येत होता. सगळे जेवण करण्यात गुंतले होते. थोड्यावेळाने अंधार पडावयाला सुरवात झाली असती. आम्ही लगबगीने आल्या वाटेन परत निघालो. खाडीच्या तोंडाशी इंदुमती आमची वाट पहात उभी होती.

'' बाईसाहेब पाणी जरा जास्तीच दिसते आहे. तुम्ही पलिकडेजाऊ शकाल असे वाटत नाही. तुम्ही माझा हात धरा मी आपल्याला संभाळून नेतो. '' इंदुमतिने रावजीचा हात घट्ट पकडला. मला माझाच हात पकडल्यासारखे वाटले. आम्ही नदीच्या काठाला येऊन

पोचलो. नदीवरचा साकव तुटुन पडला होता. '' बाईसाहेब आपण माझ्यावर विश्वास ठेवा पण  मला आता आपल्याला उचलूनच पलिकडे न्यावयाला हवे. माझा दुसरा काही हेतु नाही याची  आपण खात्री बाळगा.''

'' रावजी! मी आता स्वतःला सर्वस्वी तुझ्यावर सोपवले आहे. तुला योग्य वाटेल ते तू संकोच न बाळगता कर''

रावजीने  हसत हसत इंदुमतिला उचलून खांद्यावर टाकले आणि त्वरेन नदीपलीकडे गेला. मी मागे होतोच.

नदी ओलांडल्यावर रावजी म्हणाला '' बाईसाहेब आता थोडासा धोका आहे. आपण खूप काळजी घेतली पाहिजे. आजुबाजुला वस्ती आहे. आपल्याला कुणी पहाण्याची शक्यता आहे. अशा गोष्टी फार वेळ लपून रहात नाहीत. सरदार साहेबांच्या कानावर ही बातमी चटकन जाईल. तुम्ही जर हा डोंगर चटकन वर चढून गेलात तर वर माथ्यावर माझा भाऊ घोडे घेऊन उभा आहे. डोगरावर झाडी आहे. सरळ रस्त्याने जाण्यापेक्षा आपण डोंगरावरून गेलो तर कुणाच्या नजरेस पडण्याची शक्यता कमी आहे''

'' ठीक आहे. तू म्हणशील तसे.''  आम्ही घाईघाईन डोंगर चढु लागलो. रावजी समोर होता. त्याच्या मागे इंदुमती होती. तिच्या मागे मी होतो. '' थोडे थांबा बाईसाहेब. समोर मोठी घळ दिसते. मी तपास करून येतो.'' आम्ही जागचे जागीच उभे राहीलो. रावजी एकटाच वर गेला. थोड्यावेळाने परत आला. '' थोड कठीण आहे. पण माझा भाऊ पण खाली आला आहे . आम्ही दोघे मिळून आपल्याला संभाळून नेऊ. काळजी करु नका. ''

आता मी समोर जाणे मला योग्य वाटत नव्हते.का ते मला कळत नव्हते. खरे म्हणजे रावजी इंदुमतिला कुठे घेऊन चालला आहे हे जाणण्याची मला खूप उत्सुकता होती पण  माझे अंतर्मन मला इथेच थांबावयाला सांगत होते. इंदुमतिला रावजी बरोबर जाऊ देणेच योग्य होते. मी जागचे जागीच उभा राहीलो. रावजीचा हात धरून इंदुमती घळ उतरु लागली आणि ते दोघे थोड्याच वेळात नजरे आड झाले. अंगावर जोरात वाऱ्याचा झोत आला. समोर दाट धुके नव्हते आणि रुळावरून धाड धाड आवाज करीत एक मालगाडी चालली होती.

आत्मसंरक्षण ही माणसाच्या मनात खोल रुजलेली भावना आहे. कदाचित मेंदुपटलावर कोरलेली ती पहिली नोंद असावी. धोक्याची सुचना वेळीच माझ्या अंतर्मनाने मला दिली. म्हणुनच मी वाचलो  नहीतर माझी देखील माधवसारखीच गत झाली असती. मी अगदी थरथर कापत होतो. कसाबसा तारेखालून सरपटत बाहेर आलो. दरीपलीकडील रस्त्यावर पार्क केलेल्या गाडीत जाऊन बसलो. भूतकाळातील कुठल्याही गोष्टीला मी स्पर्श करण्याचा प्रयत्न न केल्यामुळे की काय एका झटक्यात  मी पुनः वर्तमान काळात परत आलो. मला चक्कर वगैरे काही येत नव्हती की मळमळत नव्हते. मी शांतपणे गाडीत बसून राहीलो.

समजा माधवन आणि मी एकाच वेळी औषध घेतल असते तर माधव वाचला असता का? की आमचा दोघांचाही मृत्यु ओढवला असता. स्वसंरक्षणाची सुचना माधवच्या अंतर्मनाने माधवला पण दिली असावी पण माधवने तिकडे दुर्लक्ष केले. माझ्या घाबरट स्वभावामुळे मी जागीच थांबलो आणि वाचलो. विचारांची गुंतागुंत काही सुटत नव्हती. असे

गाडीत फार वेळ बसून राहणे पण प्रशस्त नव्हते. मी घरी येउन गाडी गॅरेज मध्ये लावली. शिशी जागचेजागी ठेऊन दिला. जेवायची मुळीच इच्छा नव्हती. सर्वजण आपआपल्या खोल्यात होती. मी माझ्या खोलीत जाऊन पडलो. रात्री केंव्हातरी वीणा खोलीत डोकाऊन गेली पण तिच्याशी देखील बोलण्याची माझी इच्छा नव्हती.

## प्रकरण बारावे

सकाळी नवीनच प्रकार झाला. तोंड धुवायचा ब्रश पण मला हातात धरता येत नव्हता. सारखा हात थरथर कापत होता. मी घामाने निथळत होतो. डोळे लाल भडक झाले होते. धडपडत मी पुनः हंतरुणावर जाऊन पडलो येवढेच मला आठवते. मधल्या सगळ्या  दिवसांच्या आठवणी अंधुक आहेत. कधी कुणी अंधुकसा ओळखीचा गृहस्थ माझ्या खोलीत येत होता. अंग पुसण्याचे कपडे बदलण्याचे मला थोडसे जाणवायचे पण तेवढेच .बाकी मला काहीच आठवत नाही.

किती दिवसानंतर माहित नाही एका सकाळी मला जाग आली. तेंव्हा समोरचे चित्र स्पष्ट दिसत होते. शेजारच्या खुर्चित एक गृहस्थ बसले होते. डॉक्टरच होते ते. त्यांचे शेजारी वीणा बसली होती. मी डोळे उघडलले पाहुन वीणा एकदम जवळ आली. माझा हात हातात घेऊन थोपटत राहिली . तिच्या डोळ्यातून अश्रुंच्या धारा लागल्या होत्या.

'' काय बरे वाटते आहे का आता?'' डॉक्टर  म्हणाले.

'' खूपच बरे वाटते. किती दिवस मी असा पडून आहे?''

'' काणे!  गेला आठवडाभर तुम्ही बेशुद्ध होता. नशीब म्हणूनच केवळ वाचलात. खर म्हणजे याचे सारे श्रेय वीणाबाईंना द्यावयाला हवे. गेले आठ दिवस त्या इथून हलल्या नाहीत.

मी वीणा कडे पाहिले. ती एकाच वेळी रडत होती आणि हासत पण होती. मुले पण धावत आत आली. माझ्या तोंडावर हात दाबून वीणा म्हणाली '' आता काही बोलु नका. मी देवाला साखर ठेऊन  येते. तुम्ही स्वस्थ पडा. मी आणि माधवने तिला फसवल्याचे तिला काही आता वाटत नव्हते. मी सुखरूप शुद्धीवर आल्याने ती सर्व विसरली होती.माधवच्या अचानक अपघाती मृत्युनंतर माझे असे जीवघेणे आजारपण तिला सोसले नव्हते. मला खूप ओशाळल्या सारखे होत होते.

माझे आजारपण अजून १५ दिवस लांबले. रोज सकाळी डॉक्टर येऊन तपासून जात होते. १५ दिवसानंतर त्यांनी मला बाहेर फिरण्याची अनुमती दिली. एके दिवशी सकाळी न्याहारी करत असतांना वीणा म्हणाली '' तुमच्या आजारात कालिदीबाईंनी खूप मदत केली . तुमची तब्बेत आता बरी आहे.  एक दोन दिवसात आपण मुंबईला परत जाऊ. जाण्याची आधी एक दिवस त्यांच्या घरी येऊन जाण्याचा त्या खूप आग्रह करीत आहेत. मी म्हणते,  आज दुपारी मी आणि मुले जाऊन येतो त्यांचे कडे. तुमचे जेवण झाले की लगेच निघु आणि सायंकाळी लवकरच येऊ. फार लांब नाही आहे त्यांचे घर. ''

'' जरूर जाऊन या. मी पण आलो असतो पण डॉक्टर परवानगी देतील असे काही वाटत नाही.''

" नाही नाही. तुम्हाला मुळीच आणु नका असे कालिंदीबाईंनी बजावले आहे. त्या देखील आमचेच बरोबर येत आहेत. "

जेवण करून मी बागेत आरमाखुर्चित पडलो. बाकी सर्वजण आवराआवरी करावयाला गेले. मला जरा निवांतपणा मिळाला याचे खूप बरे वाटत होते. या प्रकरणाचा आता शेवट जवळ आला आहे असे वाटत होते आणि ही मिळालेली संधी मला सोडावयाची नव्हती. वीणा आणि मुले निघून गेल्याबरोबर मी थोडा वेळ मु-ामच थाबलो. नेम नाही काहीतरी विसरले म्हणुन परत यावयाची. आता परत यावयाची शक्यता नाही याची खात्री पटल्यानंतर मी माझ्या खोलीत गेलो. ए लेबलच्या बाटलीतील औषध संपले होते. बी लेबलची बाटली मी माधवला पाठवली होती. सी लेबलच्या बाटलीतील औषधाचा एक मोठा डोस शिशीत भरून घेतला. खाली स्वयंपाक घरात गेलो आणि औषध घेऊन परिणामाची वाट पहात बसलो. या जुन्या स्वयंपाकघराचा आणि भूतकाळाचा काहीतरी संबंध आहे याची मला खात्री पटली होती. बराच वेळ गेला तरी काहीच परिणाम होत नव्हता म्हणुन मी पुनः थोडसे औषध घेतले. पण काहीच परिणाम होत नव्हता. हे औषध परिणाम काराक नव्हते. मी अगदी हताश झालो. या प्रकरणाचा शेवट करण्याचा मला काहीच मार्ग शिल्लक राहीला नव्हता. आता मला घरात थांबवत नव्हते. कदाचित खाणी जवळ गेलो तर काही परिणाम होईल अशा समजुतिने मी गाडी काढली. दरीच्या कडेला गाडी उभी करून मी गाडीला टेकून उभा राहीलो. काहिही परिणाम नव्हता. वेळ जावा म्हणून मी सिगरेट काढून पेटवणार तोच एकदम एक प्रचंड आघात झाला. जणु काय वीजेचा एक प्रचंड लोळच अंगातून गेला. या पूर्वी

वर्तमानकाळातून भूतकाळात जाताना काहीच होत नव्हते. असा प्रचंड आघात तर कधीच झाला नव्हता. मी आता मठाबाहेर माळरानावर उभा होतो. आजुबाजुला बरीच गर्दी जमली होती. एका उंच आसनावर जानकीबाई बसल्या होत्या. शेजारी मठाचे महंत बसले होते. मागे स्वामी उभे होते. दरबार भरला होता आणि जानकीबाई न्यायनिवाडा करीत होत्या. काही लोक जमिनीवर बसले होते तर काही सभोवताल कोंडाळा करून उभे होते. महंतच्या सल्ल्याने जानकीबाई चटाचट निवाडे करीत होत्या. एकाला फटक्याची शिक्षा मिळाली तर काहीजणांना दंडाची शिक्षा फर्मावली.

माझ्या समोरची दोन माणस आपआपसात बोलत होती '' काय जहांबाज बाई आहे ही! रावजी गेले १० वर्षे हिचा हुजऱ्या होता त्याला एका फटक्यात हाकलुन लावला. कशी काय त्याने इतकी वर्ष हिची चाकरी केली ते त्यालाच माहीत. मी तर आताच कंटाळलो बघा'' दरबाराचे काम अटोपले. बोलणारा नवीन शागीर्द धावत समोर गेला आणि गाडीचे दार उघडून आदबशीर उभा राहीला. जानकीबाईंनी इकडेतिकडे पहात माझ्यकडे पाहून खूण केली. मी दचकलोच.मी तिला दिसत होतो की काय? पण खूण मला नव्हती. माझ्या मागे रावजी उभा होता. खुणेसरशी रावजी समोर झाला आणि वाकून मुजरा केला. '' हे बघ ! इथे आल्यासारखे इंदुमतिला भेटावयाचे आहे. तुझ्याच घरात ठाण मांडला आहेना तिने ? तिच्या भावाचा एक लखोटा पण तिला द्यावयाच आहे. तोंडी काही निरोप पण आहे तो तिला समक्ष सांगावयाचा आहे. आम्हाला तिकडे घेऊन चल. तु जर काही हरकत केलीस तर मला सोबत शिबंदी घेऊन यावे लागेल.

'' तुमची शिबंदी माझ्या माणसापुढे काय टिकणार? पण माझी हरकत असण्याचे काहीच कारण नाही. चलाव आपण. अडचण एकच आहे आमच्या बाईसाहेबांनी अनुमती दिली तरच आपण त्यांना भेटु शकता.''

'' काय तरी मेल ! सुंभ पार जळून गेला तरी अजून पीळ काही जात नाही. जा विचारून ये म्हणाव आम्ही भेटु शकतो की नाही''

'' बाईसाहेब आपल्यात तरी कुठे फरक पडला. आमच्या बाईसाहेबांना विचारून येतो आपण अम्मळ थांबावे''

रावजी लवकरच परत आला. भेटण्याची परवानगी मिळाली होती की काही तयारी करून आला होता त्यालाच माहीत पण आम्ही लगेच रावजीच्या झोपडी कडे कूच केले.

जानकीबाई मध्ये खूप फरक पडला होता. कमीतकमी १० वर्षाने म्हातारी झाली होती. पण बोलण्यातला करारीपण जरा पण कमी झाला नव्हता. वाढलले वय लपवण्याकरिता चेहऱ्यावर बरीच रंगरंगोटी केली होती. गाडीत बसता बसता पुनः जानकीबाईंनी माझ्याकडे पाहून खूण केली. मी धडपडत गाडीजवळ गेलो. कानात कसले तरी आवाज होत होते. माझे पाय लटपटत होते. अचानक सर्व शांत झाले. मंदिरात सायंप्रार्थनेची घंटा वाजत होती. वीणाची गाडी माझे जवळ येऊन थांबली होती. मुलांसकट सर्वजण माझ्याकडे आश्चर्याने पहात होते.

'' बाबा! आम्ही केव्हापासून तुम्हाला बोलावतो आहोत. तुमचे मुळी लक्षच नव्हते. टेकडीच्या उतारावर तुम्ही आपले धावत होतात. कसे चमत्कारिक दिसता आहात तुम्ही''

'' ए पोरट्यांनो ! चुप बसा आता. आणि तुम्ही हो ! खूप तमाशा केलात. बसा आता गाडीत. कालिंदीबााई पण गाडीत होत्या. माझ्या गाडीचा विचार सोडून देऊन मी गाडीत बसलो. वीणाने दार जोरात आपटून बंद केल. घरी पोहोचेर्यंत एक चकार शब्द बोलली नाही. गाडी दारशी उभी  करून तिने पोरांना आधी आत पिटाळले. कालिंदीबाई पण खाली मान घालून घरात गेल्या. '' चालवते का तुम्हाला? का माझ्या खांद्यावर भार टाकून चलता?''

''तसे काही नाही. सहज येतो मी वरती. ''

'' कळले तुमच लक्षण. मघाशी झोकांड्या जात होत्या. थांबा माझ्या खांद्यावर हात ठेऊनच चला. झाला तेवढा तमाशा पुरे झाला नाही का? आणि एक सांगते वरती जाऊन निवांत पडून रहा. असा तुमचा तमाशा पोरांनी कधीच पाहिला नाही. काय वाटले असेल त्यांना?''

'' म्हणजे मी काय दारु ढोसुन आलो असे वाटते की काय तुला?''

'' मग काय अदमुर ताक पिऊन अशी अवस्था झाली तुमची?  मी म्हणते प्यायची होती तर घरात बसून नव्हती का प्यायची. कुणी मनाई केली आहे का? बरे तर बरे आम्ही वेळेवर पोहोचलो म्हणून नाहीतर कुणीतरी गटारातून उचलून आणले असते''

मी कुठे तरी दारु ढोसुन आलो हा तिचा समज राहु देणे माझ्या हिताचे होते. म्हणून काही न बोलता मी चुपचाप वरती जाऊन पलंगावर पडलो. खूप थकून गेलो होतो मी. अंगाला दरदरून घाम फुटला होता. हातापायाला कापरे भरले होते. केंव्हातरी मला झोप लागली. मला जाग आली तेव्हा चांगली सकाळ झाली होती. मी हातातल्या घड्याळात पाहिले. साडेनऊ वाजले होते. म्हणजे मी जवळपास १२ तासापेक्षा जास्त झोपलो होतो. मला आता बरे वाटत होते. मी सगळे आवरून खाली आलो. दिवाणखान्यात रेडिओचा आवाज येत होता. थोडस दूध घ्याव म्हणून मी आवाज न करिता स्वयंपाक घरात गेलो. तळघरातून बोलण्याचा आवाज येत होता. मुलांपैकी कुणीतरी खाली गेले असावे. त्यांच्या कडून वीणाचा मुड तरी समजाऊन घ्यावा म्हणून मी त्यांना हाका मारीत खाली गेलो. पण कोणीच उत्तर देत नव्हते. पावलांचा आवाज मात्र ऐकु येत होता. तळघऱात उतरतांना दिवा लावण्याकरित मी बटण शोधण्या प्रयत्न केला पण बटण कुठे सापडतच नव्हते. तसाच भिंतिला धरून चाचपडत मी तळघरात गेलो. मी मागे वळून पाहिले मी उतरून आलेला जिना आता तिथे नव्हता. त्या जागी रावजीच्या झोपडीतील माळवदावर जाण्याकरिता असलेली शिडी होती आणि मी शीडी जवळ उभा होतो. औषध न घेताच माझ्यावर औषधाचा परिणाम झाला होता. दोन्ही हातानी मेणबत्ती सावरीत एक स्त्री स्वयंपाक घरात आली. मला अगदी खेटूनच ती आत आली. इंदुमती होती ती. जवळची मेणबत्ती तिने स्वयंपाकघराच्या ओट्यावर ठेवली. बाहेर विहरीतून पाणी काढण्याचा आवाज येत होता '' रामजी! ''इंदुमतिने हाक मारली.

'' जी बाईसाहेब '' करत रामजी आत आला.

'' घोड्याच्या टापांचा आवाज येतो आहे. रावजी येतो आहे बहुतेक . पहा बर''

नेहमीप्रमाणे घराशी येताच रावजीने त्याच्या धाकट्या भावाचे हवाली घोडा केला. त्वरेने तो घरात शिरला. इंदुमती एका पाटावर बसून रावजीच्या बहिणीशी बोलत होती.

'' जानकीबाई आपल्याला भेटायला येत आहेत''

'' अस्स ! आता बरीक आठवण झाली त्यांना? ''

'' विसाजीपंतांचा काही लखोटा आहे म्हणतात आपल्या करिता. समक्ष निरोप पण काही सांगावयाचा आहे''

'' येऊ दे की . पाहु काय म्हणतात ते''

थोड्याच वेळात रावजी जानकीबाईंना आणि स्वामीला घेऊन आला. इकडेतिकडे पहात जानकीबाई नाईलाजाने एका पाटावर बसल्या. '' आपल्याशी जर खाजगी बोलावयाचे होते''

'' मग बोला की. ही सर्व माझीच माणसे आहेत. त्यांच्यात आणि माझ्यात काही आडपडदा नाही. आपण खुश्शाल बोलाव''

'' तुझी माणसे ! म्हणजे समजत होते त्या पेक्षा प्रकार बराच पुढे गेलेला दिसतो''

'' तुम्हाला काय समजायचे ते समजा. कामाचे बोला''

'' हो ग बाई! मला तरी कुठे तुझ्या तोंडाला लागायला वेळ आहे. काही वाटते म्हणून येतो आम्ही. तू अशी हलक्या हुजऱ्याचे नादाने घरातून पळून आलीस. खरे तर तुझे तोंड पहण्याची मुळीच इच्छा नाही. पण राहवले नाही म्हणून आले. त्यातून तुझ्या भावाने लखोटा दिला आहे. म्हणून मी आले बर''

'' आपण काय लिहले आहे ते वाचाव. तेवढाच आपला वेळ वाचेल''

'' स्वामी वाचून दाखवा यांना काय लिहले आहे ते''

स्वामींनी झोळीतून एक लखोटा काढला. लखोटा उघडून आतला कागद वाचु लागले. '' प्रिय इंदुमती,

नांदत घर सोडून तू हुजऱ्याचा हात धरून पळून आलीस हे काही तुला शोभले नाही. तू आमच्या घराण्याच्या नांवाला काळे फासले आहे. पण रक्ताचे नाते तुटत नाही म्हणून सांगतो. त्या हरामखोर हुजऱ्याची संगत सोडून दे . कुडतोजीराव पुनः तुला घरात घेतील असे वाटत नाही. पुण्याला अशा गैरमार्गाला लागलेल्या पण सुधारण्याची इच्छा असलेल्या स्त्रीयांकरिता एक आश्रम आहे. तिथे तुझे सोय होऊ शकेल. जानकीबाई मोठ्या मनाने तुझी पुण्यापर्यंत सोबत देऊन तुला पोहोचवण्याची व्यवस्था करण्यास तयार आहेत. देव तुला सुबुद्धी देवो''

पत्राचे वाचन होत असतांना मी रावजीकडे आणि इंदुमतीकडे पहात होतो. रावजीचा चेहरा रागाने अगदी लालबुंद झाला होता. इंदुमती मात्र अगदी शांत होती.

'' मग काय ठरते तुझे? पुण्याला जाणार असशील तर स्वामी तुझी सगळी व्यवस्था करतील. काय हो स्वामी? होईल ना''

'' मला वाटते बाईसाहेबांना पुण्याला जावयाचे नसेल तर आपल्या मठात पण त्यांची सोय होऊ शकेल''

'' बघ बाई ! स्वामी म्हणतात ते पण योग्यच आहे. पापक्षालनाचा तो पण एक चांगला मार्ग आहे. मग काय ठरते तुझे?''

'' पापक्षालनच करावयाचे असेल तर आपण दोघीनीही बरोबरच जाऊ म्हणते. तुझा बेत ठरला की कळव मला म्हणजे मी पण येईन''

'' अशी हुजऱ्याचा हात धरून पळून जाण्यापर्यंत उतरली नाही मी अजून. आणि त्यातून मनात आणले तर दुसरे लग्न करु शकते मी. तुझी गोष्ट वेगळी आहे. मोठ्या घरची गोष्ट म्हणून लोक चुप बसले आहेत. पण मी जरा हुं म्हणावयाचा अवकाश . याच गावात तुझे चार पाट काढून गाढवावरून धिंड निघेल. ''

माझा माझ्यावार ताबा राहीला नाही. वरून दिवाणखान्यातून रेडिओचा आवाज येत होता. माझ्या कानात भयंकर आवाज येत होते.भूत आणि वर्तमान याची सरमिसळ झाली होती. माझ्यासमोरची जानकीबाईंची आकृती सोडून बाकी सर्व गोष्टी पुसट होत गेल्या. जानकीबाई माझ्याकडे डोळे वटारून पहात होत्या. त्यांना निसटु न देता त्यांचा गळा दाबून त्याचा शेवट करण्याची उर्मी मनात उफळून आली. जानकीबाईंचे अंगावर मी एकदम झेपावलो आणि त्यांचा गळा आवळु लागलो. माझ्या आजुबाजुला गोंधळच गोंधळ होता. मी हाताची पकड सैल केली. मुले जिन्याच्या वरच्या पायरीवर लपून पहात होती. वीणा जिन्याचे कठड्याला टेकून माझ्याकडे भेदरेलेल्या नजरेने मान चोळत उभी होती.

'' अरे देवा ! काय केल हे मी? '' असे ओरडून मी खाली कोसळलो. जीन्याचा कठडा धरून धरून वीणा मुलांपर्यंत पोहोचली. मुलांना घट्ट धरून पळत बेडरुम मध्ये गेली आणि दरवाजा लाऊन टाकला. मला करण्यासारखे काहीच नव्हते. मी तसाच पायरीवर अस्ताव्यस्त पडलो.पोटात खूप मळमळत होते. डोके चांगले गरगरत होते. सर्व आंगाला कापरे भरले होते. कसाबसा मी जिना चढून माझ्या खोलीत गेलो. कसाबसा भिंतीचा आधार घेत मी टेलीफोन शोधला आणि डॉक्टर पोवळ्यांचा नंबर फिरवला. नशीबाने डॉक्टर फोनवर होते.

'' डॉक्टर पोवळेच ना?''

'' हो, बोला''

'' मी काणे बोलतो आहे. डॉक्टर फारच भयंकर गोष्ट घडली आहे. मला स्मृतीभंशासारखे काहीतरी झाले आहे. मी माझ्या बायकोचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला. कदाचित तिला काही अपाय झाला असेल. आपण लागलीच येता का?''

'' शुद्धीवर आहेत ना त्या?''

'' शेवटचे पाहिले तेंव्हा होती. आता माहीत नाही. माझ्या तावडीतून सुटल्यावर ती खोलीत दार बंद करून बसली आहे. ''

बराच वेळ पलिकडून काही प्रतिसाद आला नाही. त्यांनी फोन बंद केला की काय?

'' ठीक आहे. येतो मी''

मला बरेच शांत वाटत होते. मी वीणाच्या खोलीजवळ जाऊन दारावर थाप मारली. दरवाजा उघडला जाण्याची शक्यता नव्हतीच. बाहेरुनच मी मोठ्यान म्हणालो '' वीणा मी डॉक्टरांना फोन केला आहे. येतीलच ते एवढ्यात.'' आतून काहीच प्रतिसाद नव्हता. आणि ते साहजिकच होते. घडलेल्या भयंकर प्रकारामुळे सर्व जण घाबरून जाणे स्वाभाविकच होते.

म्हंटल्या प्रमाणे डॉक्टर लगेचच आले. '' पाहु काय झाले आहे ते!''

'' डॉक्टर माझेकडे नंतर पहा. आधी वीणाचे कसे आहे ते पहा. माझे मी तुम्हाला नंतर सविस्तर सांगतो. वीणाच्या बेडरुम मध्ये आहेत सर्वजण''

'' असे म्हणता. बरे. मग आधी त्यांना तपासतो मग तुमच्याकडे येतो.''

डॉक्टर जिना चढून वर गेले. बराच वेळ दबलेल्या आवाजात बोलणे ऐकु येत होते. डॉक्टरांनी बराच वेळ घेतला. इतका वेळ ते काय करित आहेत याची मला काळजी वाटु लागली.

'' हं बोला आता.'' आत येऊन दार बंद करित डॉक्टर म्हणाले.

'' वीणाचे कसे आहे?''

'' काही घाबरण्याचे कारण नाही. थोडा शॉक बसला आहे. एक दोन दिवसात बरे वाटेल. तुमचे काय ते जरा सविस्तर सांगा'' जरा दरडावूनच डॉक्टर म्हणाले.प्रथम मला हे सांगा की तुम्ही काय घेत आहात? कोकेन,एल.एस.डी की इतर काही?''

'' म्हणजे?''

'' म्हणजे असे की तुमची सगळी लक्षणे त्याच प्रकारची दिसत आहेत. सांगा काय घेत होता तुम्ही? म्हणजे तशी औषध योजना करणे सोपे होईल.''

गोष्टी या थराला गेल्या होत्या की आता त्यांचे पासून काही लपवून ठेवणे योग्य नव्हते. मी माधवच्या प्रयोगापासून सुरवात करून आतापर्यंतची सर्व हकिकत त्यांना सांगीतली. ''कोणते औषध होते ते मला सांगता येणार नाही. हा इतकाच नमुना शिल्लक उरला आहे आता'' त्यांना शिशी देत मी म्हणालो.

'' याचा अर्थ माधवराव जेंव्हा अपघातात सापडले तेंव्हा ते या औषधाचे अमलाखाली होते तर. ''

'' हो''

'' वाटलेच मला. बरे आता तुमचे काय? मला तर वाटते की तुम्हाला ताबडतोब एखाद्या हॉस्पीटल मध्ये भरती करावे आणि तज्ञांचे देखरेखीखाली ठेवावे.''

'' नका डॉक्टर. तेवढ नका करु. तसा माझ्यापासून कोणालाही धोका नाही. मी वीणाची मान आवळण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. त्यावेळी माझ्या समोर भूतकाळातील जानकीबाई होत्या. खरेच सांगतो तुम्हाला.  या औषधाच्या प्रभावाखाली तुम्ही खरेच भूतकाळातील व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करु शकता. ''

'' असेल असेल. तसेही असेल. पण मला वाटते की तुम्ही हॉस्पीटल मध्ये जाणे

ठीक

राहील''

'' नको डॉक्टर. तेवढे नका करु. मी तुम्ही सांगाल तसे वागण्याचे तुम्हांला वचन देतो. पुनः ते औषध घेण्याच प्रश्नच उरला नाही. कारण अगदी शेवटा डोस तुम्ही बरोबर घेतला आहेत.''

'' ठीक आहे तर मग. आता मी असे करतो. प्रथम तुम्हाला जालीम सेडेटीव्ह देऊन विश्रांती मिळेल असे करतो आणि हे औषध मुंबईला तपासण्यासाठी पाठवून देतो. त्याचा रिपोर्ट आला की औषध योजना करिता येईल. तशी तुमच्या करिता वेगळी खोली आहे ना?''

'' हो. माधव करिता राखून ठेवलेली खोली तयारच आहे. ''

'' ठीक आहे. चला तर मग तिकडे. पुढचे काही दिवस तुमचा मुक्काम याच खोलीत रहाणार आहे. ''

कपडे बदलून अंथरुणावर पडल्यानंतर डॉक्टरांनी झोपेची इंजेक्क्षन दिले. त्यांच्याशी इकडतिकडच्या गप्पा मारतांना मला झोप केव्हा लागली ते कळलेच नाही. पुढचे काही दिवस काय चालले आहे हे मला समजत नव्हते. कधी डोळे उघडले तर डॉक्टर वाकून तपासताना दिसत तर कधी वीणा शेजारच्या खुर्चित बसलेली दिसे. किती दिवसानंतर कोण जाणे पण माझी जाणीव पूर्ण जागृत झाली तेंव्हा मी आरामखुर्चित पडलेला होतो आणि शेजारच्या खुर्चित बसून वीणा काहीतर वीणत बसली होती. डॉक्टर खिडकीकडे पाठ करुन उभे होते. थोडा थकवा सोडला तर मला अगदी बरे वाटत होते.

'' डाक्टर किती दिवस मी असा पडून आहे?''

'' आजचा दहावा दिवस आहे. मधल्या काळात रावजीचे आणि इंदुमतीचे काय झाले याची तुम्हाला काळजी लागली असेल नाही?''

'' म्हणजे! काय काय बडबडलो मी?''

'' जवळपास सर्वच. रोगाचा निपटारा होताना सर्व गोष्टी बाहेर येणारच. पण घाबरु नका तुम्ही जे काही बडबडलात ते सर्व अगदी गुप्त राहील. कोणाला पण कळणार नाही. आणि मुंबईहून रावांनी कळवले आहे की तुम्ही जे औषध घेत होतात ते एक प्रकारचे गुंगी आणणारे जालीम औषध होते.त्याच्या सतत सेवनाने कायमचे अपंगत्व येऊ शकते. योग्य वेळे त उपचार झाले म्हणून तुम्ही वाचलात'' चटकन मी हात पाय हालवून पाहिले. . सगळे काही ठीक होते.

हसतहसत डॉक्टर म्हणाले '' आता तसा काही धोका नाही. वेळीच सावरला गेलात तुम्ही. पण तुमची ही हकीकत इतर कुणाला कळली असती तर कमीतकमी ६ महिने मेंटल हॉस्पीटल मध्ये काढावे लागले असते.असो. आता तुमची तब्बेत खूपच सुधारली आहे.पण पूर्ण सुधारण्यासाठी तुम्ही रावजी, इंदुमती यांचा वावर आहे अशा ठिकाणापासून दूर राहीले पाहिजे. थोडक्यात तुम्ही काही दिवसाकरिता येथून बाहेर कुठेतरी जावे हे बरे. ''

'' केंव्हा जाऊ शकतो आम्ही? आणि कुठे?''

'' मला वाटते उद्या सकाळी तुम्ही लवकर निघालात तर १०-१२ वाजेपर्यंत जुहुला पोहोचाल. तुम्हाला लगेच पुढे बडोद्याला जावयाला विमान मिळेल. तुमचे मेहुणे तिथेच आहेत. छान मन रमेल तुमचे . ''

वीणाशी बोलून सगळा बेत आधीच ठरलेला दिसत होता. त्यामुळे डॉक्टरांच्या बोलण्याला मान तुकवण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

'' छान. मग मी वीणाताईंना तिकीटे काढावयाला सांगतो. तुम्ही आता आराम करा. '' असे म्हणून डॉक्टर वीणाच्या खोलीत गेले. थोड्यावेळाने वीणा खोलीत आली. माझा हात हातात घेऊन म्हणाली '' डॉक्टरांनी मला सगळे समजावून सांगीतले आहे. तुम्ही मनात कसलीच खंत बाळगु नका. आणि तुमचा तरी काय दोष? तुमच्या मित्राने तुमचा असा गैरफायदा घ्यावा हे मात्र मला मुळीच आवडले नाही. अर्थात मृत माणसाब- ल वाईट बोलु नये. पण त्यांचे असे वागणे बरोबर नव्हते हे मात्र खरे. थोडक्यात निभावले हे देवाचे उपकारच. उद्या सकाळी लवकर निघायचे ना?''

'' हो. मुले काय म्हणातात?''

''काही नाही. त्यांच्या समोर पण तुम्हाला संकोच वाटण्याचे काही कारण नाही. असे करते ना, त्यांनाच तुमचे सामान आवरावयाला पाठवून देते.''

दारात मोठा उभाच होता. '' अरे ये ना. गेले १० दिवस तू घरातला अगदी मोठा माणूस झाला होतासा. तसा आता तू मोठा झालासच आहे म्हणा. ''

'' तसे काही फारसे करावे लागले नाही. आई म्हणाली की तुम्हाला आवरा आवर करावयाला मदत करा म्हणून''

'' हो का! छान, मग असे कर, कपाटातील माझी सुटकेस काढ आणि त्यात कपडे भरावयाला सुरवात कर. '' मोठा कपाट उघडावयाला गेला. कोपऱ्यातच माधवची काठी ठेवली

होती. उंच उचलून मोठा म्हणाला '' बाबा ही काठीपण नेणार का तुम्ही?'' बोटावरच काठीचा तोल संभाळत तो खोलीत चकरा मारु लागला. माझा जीव वरखाली होऊ लागला. कारण माधवने त्या काठीच्या मुठीत औषधाची शिशी ठेवली होती. आणि काठी पडली असती तर नसता गोंधळ झाला असता. या प्रकरणाचा शेवट करण्याची ती माझी अगदी अखेरची संधी होती.

'' अरे गाढवा पडेल ना ती काठी. दे ती माझ्याकडे. मूर्ख कुठला'' जीव तोडून मी ओरडलो.

'' पहा बाबा! आई म्हणाली होती तेच खरे. तुम्ही अजून पूर्ण बरे झालेच नाहीत. नाहीतर या दिडदमडीच्या काठीकरता इतके काही माझ्यावर ओरडले नसता. घ्या तुमची काठी'' असे म्हणून त्याने काठी माझ्याकडे फेकली. जीवाच्या आकांताने मी ती वरच्यावर झेलली. पण काठी झेलताना माझी उडालेली तारांबळ पाहुन मोठा टाळ्या वाजवत हसु लागला. माझे तिकडे लक्षच नव्हते. अचानक पणे या प्रकरणाचा शेवट करण्याची मला एक अखेरची संधी मिळाली होती. मी बाटलीतला शेवटचा डोस काठीतील शिशीत भरून ठेवला आहे हे माझ्या लक्षातच नव्हते. एवढे सगळ रामायण घडून गेल्यावर देखील पुनः मी औौषध घेण्याचा विचार करावा हा माधवचा माझ्यावर असेलेल्या प्रभावाचा आणि आमचा भूतकाळाशी असलेल्या संबंधाचा पुरावा होता. आलेली संधी मी सोडणार नव्हतो.

**प्रकरण तेरावे.**

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही गाडी करून १० वाजता जुहुला पोहोचलो. विमान सुटावयाला बराच वेळ होता. पुनः पुनः आमच्या त्याच गोष्टी सुरु होत्या. शेवटी प्रवाशानां बोडोद्याला जाणाऱ्या विमानाच्या गेट वर जाण्याची सुचना झाली. मी चटकन वीणाला म्हणालो '' हे बघ! तू मुलांना घेऊन समोर हो. मी जरा बाथरुमला जाऊन येतो''

'' काहीतरीच तुमचे. इतका वेळ तुसते बसून होता आणि आता विमानात बसावयाची वेळ झाली तर बाथरुमला जाऊन येतो म्हणता. काही नाही. विमानात सगळी सोय असते.''

'' तसे नाही. विमान आकाशात स्थीर झाल्याशिवाय प्रवाशांना जागेवरून उठु देत नाहीत. तू काळजी करु नकोस. तुम्ही आत जाऊन बसून घ्या. मी आलोच लगेच'' आणि मी स्वच्छतालयाकडे पळालो. समजा माझी अनुपस्थिती हवाईसुंदरीच्या लक्षात आली तर माझ्या नांवाची घोषणा होणार आणि मग मला विमानात बसण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. मी छातीवर हात ठेऊन विमानाचे दार बंद होण्याची वाट पाहु लागलो. माझे नशीब जोरावर होते. विमानाचे दार बंद झाले आणि ते जोरात धावपट्टीवरून धावु लागले. तरी पण मला खात्री वाटत नव्हती. मी विमानात नाही हे वीणाच्या लक्षात आले तर विमान थांबु शकत होते. पण सुदैवाने तसे काही झाले नाही आणि विमान धावपट्टीवरून बडोद्याकडे झेपावले.मी स्वच्छाता गृहाचे बाहेर आलो आणि  गाडीतून वेगाने कळवण कडे सुटलो. आयष्यात या प्रकारणाचा शेवट करण्याची ही अखेरची संधी होती. आता निदान काही तास

तरी कोणीही माझ्याशी संपर्क साधु शकणार नव्हते. वीणा बडोद्याला पोहोचल्यावर नक्कीच डॉक्टरांना फोन करणार. पण ते आज घरीच नव्हते. घरातील सगळी मंडळी पिकनिकला जाणार होती. डॉक्टर फोनवर नाही भेटले तर वीणा घरी फोन करणार. कालिंदीबाई अजून घरीच होत्या. माझा विचार जुन्या स्वयंपाक घरात जाऊन औषध घेण्याचा होता. पण ते आता शक्य नव्हते. मी जोरात गाडी कळवण कडे पळवत होतो. मंदिराजवळच्या रस्त्याला लागून मी गाडी पार्क केली.ंदाराजवळच एक उद्यान होते. तीथल्या एका बाकावर बसून मी काठीची मुठ उघडली. शिशी उघडून मी औषध घेणार तोच माझे लक्ष झाडाखाली मानेखाली हात घेऊन झोपलेल्या एका व्यक्तीकडे गेले. डॉक्टरच होते ते. अच्छा म्हणजे पिकनिक करता ते याच उद्यानात आले होते तर. मी कसलीच तमा न बाळगता शिशीतला डोस घेतला आणि परिणामाची वाट पाहु लागलो. मी बेडरपणे डॉक्टरांपुढे जाऊन उभा राहीलो. मला पहाताच ते चकित होऊन एकदम उठून बसले.'' अरे तुम्ही बडोद्याला जाणार होतात ना? ''

'' वीणाला आणि मुलांना दिले पाठवून. पण तुम्ही इथे कसे? अगदी पिकनिक करता हेच उद्यान निवडले? आणि ते सुद्धा अगदी एकटेच? ''

'' म्हणजे वीणाने तुम्हाला सावध केलेले दिसते आहे? ''

'' तुमच्या मिसेसचा यात काय संबंध?''

आता आश्चर्य करण्याची पाळी माझ्यावर होती.'' मग तुम्ही इथे माझेवर पाळत ठेवल्या सारखे हजर कसे?''

'' म्हणजे माझा अंदाज खरा ठरला तर. विमान सुटल्याचे मला कळले. पण विमानात तुम्ही असालच याची मला खात्री नव्हती. तुम्ही पुनः औषध घेणार आणि ते पण कळवणच्या जुन्या स्वयंपाक घरात घेणार  याची मला पक्की खात्री होती. पण तुम्ही मला भेटलेल्या वेड्यांपेक्षा जास्त हुशार निघालात. तुम्ही कसे तरी करून वीणाबाईंना चकवणार आणि स्वयंपाकघराकडे जाणार हे मी गृहित धरले होते. तुम्हाला तिकडे पोहचु द्यावे आणि मग वेळीच तुम्हाला अडवावे असा माझा बेत होता. पण तुम्ही माझा स्वयंपाक घराचा अंदाज खोटा ठरवलेला दिसतो'' माझ्याकडे निरखून पाहत डॉक्टर म्हणाले.

'' डॉक्टर हा वेडेपणाचा वगैरे काही प्रकार नाही. या औषधामुळे खरेच तुम्ही भूतकाळात जाऊ शकता. ''

'' अस्स. तुम्हाला माहित आहे त्या औषधाने कायमचे अपंगत्व येऊ शकते. फारच जालीम औषध आहे ते. ''

'' काय प्रकार आहे ते नीट सांगा ना''

'' तुम्हाला सांगितले ते पुरेसे नाही का ?'' मान हालवीत डॉक्टर म्हणाले. पण आता तेथे डॉक्टर नव्हते. मी गढीच्या दिवाणखान्यात होतो. दर्शनी भिंतीवरच एक तसबीर लागली होती. इंदुमतीची होती ती. जन्म १२८० मृत्यु १३२४ असे खाली लिहले होते. मी सुन्न होऊन भिंतिला टेकून उभा राहीलो. दारातून कोणीतरी आत  आले. प्रथम मला हिरोजीच वाटला तो. पण हिरोजी तर मागेच गेला. म्हणजे भूतकाळात पण उलटापालट होत

होती का? नाही हिरोजीचा मुलगा होता तो. दाराशी जाऊन त्याने कोणाला तरी हाक मारली. रामजी आत आला. खुपच मोठा झाला होता तो. '' घरी जातोस म्हणतो?''

'' हो महाराज. आज ५ दिवस मी इथेच आहे. रावजी घरी पडून आहे. या साथीने फारसे  लोक शिल्लक राहीले नाहीत. ''

'' नाही तर काय? इथे पण मोजकीच माणसे उरली आहेत. ठीक आहे. जा तू. पण जरा खबरदारीने जा. आजकाल हमरस्ते देखील सुरक्षीत  राहीले नाहीत. ''

मुजरा करून रामजी पागेकडे गेला. घोड्यावरून तो रावजीच्या घराकडे जाऊ लागला. मी मागोमाग होतोच. झोपडीत शुकशुकाट होता. रामजीने रावजीच्या नांवाने हाका मारावयाला सुरवात केली. माळवदावरून कण्हण्याचा आवाज आला. आम्ही घाईघाईने शिडी चढून माळवदावर गेलो. कोपऱ्यात रावजी अंगावर पांघरूण घेऊन पडला होता. फारच दशा झाली होती बिचाऱ्याची.

'' दादा ! तुम्ही इथे का येऊन पडला? काय घाबरलो होतो मी''

'' हे बघ मी आता काही वाचत नाही. उगीच माझ्या संसर्गाने खालचा भाग दुषित व्हावयाला नको म्हणून येथे येऊन पडलो. प्राण केंव्हाचा जाण्याच्या मार्गावर  आहे. पण जाण्यापूर्वी आपल्या पापाची कबुली कोणाजवळ तरी द्यावी म्हणून घुटमळतो आहे. ''

'' असे बोलु नका दादा. तुम्ही अगदी बरे व्हाल. मी खाली जाऊन थोडे दुध गरम करून आणतो.''

'' ठीक आहे. तुझ्या मनासारखे होऊ  दे. ''

रामजी पटकन खाली पळाला. मी समोर सरकून रावजी जवळ गेलो. माझ्या डोळ्यात रोखून पहात रावजी पुटपुटु लागला'' देवा! मी जे काय केले ते सगळे चांगल्याच हेतुने केले. बाईसाहेबांना इथून जबरदस्तिने मठात नेणार होते. अचानक मठात नेण्याचे आदल्या दिवशी त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांचा अंत झाला. पण या सर्व प्रकाराला मी कारणीभूत होतो. देवा ! मी जर खरोखर पाप केले असेल तर मला क्षमा कर'' रावजीच्या ओठाची हालचाल सुरु होती. माझ्या डोळ्यात रोखून पहात तो कसली तरी वाट पहात होता. मी लगबगीने उठलो. परसदारी जाऊन तुळशीची पाने व पाणी आणले. रावजीच्या तोंडात तुळशीची पाने घालुन मी पाण्याची धार त्याचे तोंडात ओतु लागलो. रावजीने समाधानाने डोळे मिटले. मी जुन्या स्वयंपाकघरात जमीनीवर गुडघे टेकून बसलो होतो. डॉक्टर माझ्याकडे कुतुहुलाने पहात  कट्ट्याला टेकून उभे होते.

मी डॉक्टरांकडे पाहुन ओशाळवाणे हासलो. '' डॉक्टर रागाऊ नका. संपले एकदा सगळे. मी लगेच वीणाला फोन करतो आणि दुसऱ्या विमानाने बडोद्याला पोहोचतो असे कळवतो. मी फोन उचलून नंबर फिरवू लागलो. पण मला फोन धरता येत नव्हता. हातातली सर्व शक्ती गेली होती. पाय पण लुळे पडत होते आणि मी धाडकन जमिनीवर कोसळलो.

समाप्त

## डॉफने ड्यु मॉरीयर यांचे अल्प चरित्र

डॉफने ड्यु मॉरीयर या सर गेराल्ड ड्यु मॉरीयर या प्रसिद्ध रंगकर्मी यांच्या कन्या. यांचे प्रारंभिक शिक्षण लंडन येथे व नंतर पॅरीस येथे झाले. १९३१ साली त्यांचे दी लविंग स्पीरिट हे पुस्तक प्रसिद्ध होण्याचे आधी त्यांनी तीन पुस्तके व आपल्या वडीलांचे  चरित्र लिहले होते. त्यांना १९३८ साली प्रसिद्ध झालेल्या रिबेका या कादंबरीने लेखक म्हणून इतकी प्रसिद्धी मिळाली की त्याचे त्यांना  स्वतःला पण आश्चर्य वाटले. जवळपास त्यांच्या १५ कादंबऱ्या लोकप्रीय झाल्या. त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्यावर चित्रपट निघाले. रिबेका या कादंबरीवर केलेल्या त्याच नांवाच्या चित्रपटात सर लॉरेन्स आलीवीयर यांनी काम करून अमाप लोकप्रियता मिळवली. गोष्टींच्या रुपात प्रसिद्ध झालेली त्यांची दी बर्डस् व डोन्ट लुक नाऊ ही देखील लोकप्रिय झाली.त्यांनी ब्रॅनवेल ब्रॉन्टे आणि आपल्या स्वतःच्या कुटुंबाचा ईतीहास पण लिहला आहे. वॅनिशिंग कॉर्नवेल हे त्याचे त्यांच्या आवडत्या कॉर्नवाल ब- ल लिहलेले वर्णनात्मक पुस्तक पण खूप गाजले.  डॉफने ड्यु मॉरीयर यांचा लेफ्टनंट जनरल सर फ्रेड्रीक ब्रॉउनिंग KCVO,DSO. यांच्याशी विवाह झाला. १९६९ साली त्यांना ब्रिटीश साम्राज्याचा DBE हा किताब मिळाला. त्यांचा मृत्यु १९८९ साली झाला. त्यांना श्रद्धांजली अर्पण करतांना मार्गारेट फॉरेस्टर यांनी  म्हंटले की " डॉफने ड्यु मॉरीयर यांच्या शिवाय

दुसऱ्या कोणत्याही लेखकाने इतक्या समर्थपणे समीक्षाकांनी लेखकांना रहस्यकथा लेखक,चरित्रकार, कादंबरीकार, लघुकथा लेखक असे शिक्के मारण्याची प्रथा मोडून पाडली. असे असून देखील त्यांनी उत्तम लेखनाचे निकष आणि लेखनाची लोकप्रियता अबाधित राखली''

## डॉफने ड्यु मॉरीयर यांची प्रसिद्ध पुस्तके

१. मेरी ॲन

२. माय कझिन रॅचेल

३. दी किंग्स जनरल.

४. आय वील नेव्हर बी यंग अगेन

५. रुल ब्रीटानिका.

६. दी लविंग स्पिरीट.

७. फ्रेंचमन्स क्रिक

८. रिबेका

९. जमेका इन

१० . दी बर्डस ॲंड अदर स्टोरीज

११. दी हॉऊस ऑन दी स्ट्रॅंड

१२. दी रेंडझेवोस ॲंड अदर्स

१३. गोल्डन लॅंडस्

१४. दी वायडिंग स्टेअर्स

१५. मायसेल्फ व्हेन यंग

१६. दी रिबेका नोटबुक ॲंड अदर मेमरीज

१७. वॅनिशिंग कॉर्नवाल

१८. दी इनफर्नल वर्ल्ड ऑफ ब्रॅनवेल ब्रांटे

# कड्यावरची गढी

डॉफने ड्यु मॉरीयर यांच्या

House On The Strand

या कादंबरीचा स्वैर अनुवाद

अनुवादकः परशुराम रामचंद्र गोखले

प्रकाशकः

मुद्रकः

© परशुराम रामचंद्र गोखले २००६
''स्पॅन '' १९०, एन.-१, बी सेक्टर,
सीडको, औरंगाबाद ४३१००३
फोन २४०-२४८६९३१